मासिक वार्तापत्र • अंक 31 • मार्च 2023 • सहयोग मूल्य : रु. 10 • 16 पाने



कामगार

# बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

आय.आय.टी. मध्ये पुन्हा एका दलित विद्यार्थ्याची आत्महत्या 3

हाथरस घटनेतील बलात्काऱ्यांची निर्दोष मुक्तता!! 5

14 मार्च, कार्ल मार्क्स यांच्या 140 व्या स्मृतिदिनानिमित्त 12

## मोदी सरकारचे अपयश, जनतेची दुर्दशा लपवण्यासाठी

## हिंदुत्ववाद्यांकडून महाराष्ट्रात “हिंदू जनआक्रोश” मोर्चे

## मालकांसाठी स्वस्तात तासन्तास राबा: हेच आहे हिंदुराष्ट्र

मोदी सरकारने “अच्छे दिन”चे स्वप्न 9 वर्षांपूर्वी दाखवले होते. आज भारतीय जनता पक्ष त्याचे नावही काढायला तयार नाही, कारण मुठभर उद्योगपतींचे “अच्छे दिन” आणि देशातील कोट्यवधी कामगार-कष्टकरी जनतेचे अत्यंत “बुरे दिन” या सरकारने आणले आहेत हे वास्तव आज लपलेले नाही. मोदी सरकारचे हे अपयश लपवण्यासाठी, जनतेची दुर्दशा लपवण्यासाठी, जनतेला भरकटवण्यासाठी पुन्हा एकदा हिंदुत्व फॅसिझमने धर्मवादाचे कार्ड खेळणे चालू केले आहे. गोवंशहत्या, लव्ह जिहाद, हिजाब, असे मुद्दे सतत उपस्थित केल्यानंतर आता महाराष्ट्रात जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये नोव्हेंबरपासून 50च्या वर “हिंदू जनआक्रोश मोर्चे” काढण्यात आले आणि मुस्लिमांच्या विरोधात सरळ गरळ ओकत धार्मिक ताणतणाव भडकावण्याचे काम केले गेले. या मोर्चांमागे भारतीय जनता पक्षाने पूर्ण ताकद लावली होती, भाजपचे मोठमोठे नेते या मोर्चांमध्ये सामील झाले, परंतु सवयीच्या संधीसाधूपणाने मोर्चांच्या आयोजनापासून भाजपने अंग चोरून औपचारिकरित्या मात्र तटस्थतेचा आव आणला आहे. 2024 च्या निवडणुकीकरिता पुन्हा एकदा धार्मिक तणावांची पेरणी करून, धार्मिक मतपेढीचे राजकारण करण्याचे हे कारस्थान आहे हे उघड आहे.

### हिंदू जनआक्रोश मोर्चांमध्ये विखारी वक्तव्ये: सरकार आणि पोलिसांची खुली साथ !

“सकल हिंदू समाज” असे नाव पुढे करून या मोर्चांचे आयोजन केले गेले आहे. या आयोजनामागे खुलेपणाने विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सारख्या संघटना सामील आहेत. या मोर्चांमध्ये स्पष्टपणे “इस्लामी आक्रमण”, “लव्ह-जिहाद”, “लँड-जिहाद” , आणि मुस्लिमांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याबद्दल भाषणे दिली गेली आहेत. या मोर्चांमध्ये भाजपचे

संपादक मंडळ

आमदार नितेश राणे, गणेश नाईक, मीरा भायंदरच्या आमदार गीता जैन, आमदार आशिष शेलार, प्रवीण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी व मनोज कोटक आणि प्रत्येकच ठिकाणी स्थानिक भाजप नेते खुलेपणाने सामील झाले आहेत. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) नेते आमदार राहुल पाटील सुद्धा परभणी मध्ये सामील झाले होते. भाजपने या मोर्चांच्या आयोजनाची जबाबदारी झटकत असे मात्र म्हटले आहे की हे सर्व नेते “हिंदू” म्हणून या मोर्चांमध्ये सामील झाले आहेत आणि हा भाजपचा “अजेंडा” नाही!

या मोर्चांमध्ये भाषणे देण्याकरिता संघपरिवारातील सर्वाधिक विखारी वक्तव्ये करणाऱ्या काजल शिंगला (उर्फ काजल हिंदुस्थानी), अभिजित धनंजय सारंग (उर्फ कालिपुत्र कालिचरण) , तेलंगणाचे भाजपतून निष्कासित आमदार टी. राजा सिंह यांना सर्वत्र निमंत्रित केले गेले. यापैकी कालिचरण आणि राजा सिंह यांच्यावर अगोदरच धार्मिक विद्वेषाच्या वक्तव्यांकरिता खटले दाखल आहेत.

वानगीदाखल यापैकी काजल शिंगला यांनी केलेली वक्तव्ये पहा. त्यांनी जाहीरपणे म्हटले की मुंबईमध्ये बांग्लादेशी (हा शब्द फक्त कायद्याला चकवा देण्यासाठी वापरला आहे) मुस्लिम मिळून लँड जिहाद (जमिनीचे धर्मयुद्ध) करत आहेत, त्यांनी आपले भाजी-फळ मार्केट व्यापले आहे, आणि आम्ही शपथ घेतली पाहिजे की त्यांच्यावर आर्थिक बहिष्कार टाकू. त्यांनी असेही म्हटले की मुस्लिमांनी विनापरवाना बेकायदेशीर दर्गे बांधले आहेत, मग विनापरवानगी त्यांना तोडून टाकले तर काय चूक आहे? पुढे त्यांनी आवाहन केले की सोसायट्यांनी नियम बनवावेत की त्या कोणत्याही गैरमूर्तीपूजक व्यक्तीला फ्लॅट भाड्याने देणार नाहीत वा विकणार नाहीत!

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या मोर्चांच्या संदर्भात पोलिसांना स्पष्ट निर्देश दिले होते की इथे भडकाऊ, द्वेषपूर्ण वक्तव्ये होणार नाहीत याची खबरदारी घेतली जावी. परंतु सर्व प्रकारची द्वेषपूर्ण भाषणे होऊनही आणि या भाषणांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेले असतानाही, पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. स्पष्ट आहे की हे सर्व मोदी-फडणवीस-

पान 6 वर

## आम आदमी पक्षाचा जनद्रोही इतिहास व भांडवल-धार्जिणे राजकारण : एक दृष्टिक्षेप

✎ **अमन**

मनिष सिसोदिया यांना झालेल्या अटकेनंतर 'आप' पक्षाचा भ्रष्टाचार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. भ्रष्टाचार-विरोध, चारित्रिक शुद्धता, नैतिकता, प्रामाणिकपणा इत्यादी सुश्राव्य शब्दावलीचे भांडवल करत असताना, वास्तवात मात्र जगभरातल्या मोठमोठ्या फंडिंग एजन्सीजकडून, आणि भांडवली व्यवस्था टिकवण्यासाठी दूरगामीरित्या नफाकेंद्रित व्यवस्थेची सेवा बजावणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडून, मिळवलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणग्यांवर उभ्या राहिलेल्या, ‘भ्रष्टाचारविरोधी’ ‘अण्णा’ आंदोलनाचे वैचारिक वंशज असलेल्या, आणि भारतातल्या उदारवादी, मानवतावादी, गांधीवादी इत्यादींच्या गळ्यातला ताईत बनलेल्या ‘आप’चा जो नैतिक, राजकीय व चारित्रिक बुरखा गळून पडला आहे, तसे होणे हे अनिवार्यच होते. ‘आम आदमी पक्षा’च्या इतिहासातून त्याचे भांडवली वर्गचरित्र, त्याचे हिंदुत्वधार्जिणे, लोकशाहीविरोधी, कामगार व जनताविरोधी चरित्र, जातीयवादी राजकारण, भ्रष्टाचार-विरोधाचे थोतांड, दिल्ली मॉडेलच्या नावाने मोफत वीज, नवीन शाळा व महाविद्यालये, मोहल्ला क्लिनिकच्या नावाने केलेला फसवा प्रचार आज उघडपणे सर्वांसमोर आले आहेत.

### अण्णा आंदोलन व आम आदमी पक्षाचा उदय

केजरीवाल अँड कंपनी ज्या हवाई दाव्यांना घेऊन संसदीय राजकारणात उतरले होते, आज मागे वळून पाहताना त्या दाव्यांचा फोलपणा आणि ‘आप’ची बेईमानीच (भांडवली पक्षांचं सर्वसाधारण नैतिक मूल्य!) उघडकीस येते. आम आदमी पक्षाच्या उदयामध्ये व त्याच्या राजकारणामध्ये आधीच त्याच्या या मार्गाची पाळेमुळे रुजलेली होती. आम आदमी पक्ष भारताच्या भांडवली राजकीय समीकरणांमध्ये एक ‘प्लेअर’ म्हणून तेव्हा समोर आला जेव्हा भ्रष्टाचारविरोधी अण्णा आंदोलनाने जोर धरला होता. घराघरांमध्ये केजरीवाल, अण्णा हजारे, प्रशांत भूषण, कुमार विश्वास आणि मनीष सिसोदिया ही नावे भ्रष्टाचारविरोधी ‘धर्मयोद्ध्यां’च्या रूपाने पोहोचली होती. या आंदोलनाने दिलेला राजकीय पर्याय—मग तो त्या वेळी या आंदोलनाप्रती सहानुभूती ठेवणाऱ्या ‘आदर्शवादी’ उदारमतवाद्यांना आज कितीही ओंगळवाणा अथवा किळसवाणा वाटो—असाच भ्रष्ट, कामगारविरोधी, भांडवलधार्जिणा, धर्मवादी, लोकशाही हक्कांचे दमन करणारा आणि जनताविरोधी असू शकत होता.

स्वतः हा पक्ष ज्या ‘अण्णा आंदोलना’चे पिल्लू आहे ते आंदोलन फोर्ड आणि इतर देशी विदेशी भांडवली

पान 14 वर

## एक विशेष आवाहन

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि जनतेच्या लुटीच्या विरोधात रोजगार, शिक्षण, आरोग्य-व्यवस्था, आवास आणि जनतेच्या झुंजार एकजुटीसाठी!**

# भगतसिंह जनअधिकार यात्रा

12 मार्च - 14 एप्रिल 2023

***"जर एखादे सरकार जनतेला तिच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवत असेल तर अशा सरकारला बदलवणे किंवा समाप्त करणे हा जनतेचा केवळ अधिकारच नव्हे तर कर्तव्य बनून जाते."***

***- शहीद भगतसिंह***

साथींनो,

देशातील जनता वाढती बेरोजगारी, कंबरतोड महागाई, लोकांच्या आवाक्याबाहेर होत चाललेले शिक्षण आणि आरोग्य अशा समस्यांशी झगडत असताना आम्ही 'भगतसिंह जनअधिकार यात्रा' काढत आहोत. एकीकडे महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गरिबी, उपासमार आणि शोषण यांनी सर्वसामान्य कष्टकरी जनतेचे कंबरडे मोडले आहे, तर दुसरीकडे त्यांना जीवनातील वास्तविक समस्यांपासून भरकटवण्यासाठी धार्मिक उन्माद पसरवून लोकांना एकमेकांशी भांडायला लावले जात आहे. जनतेचाच एक हिस्सा जनतेमध्ये खोटा शत्रू म्हणून प्रक्षेपित केला जात आहे, जेणेकरून आपण खऱ्या शत्रूला ओळखू नये. 'फोडा आणि राज्य करा' हे ब्रिटीशांचे धोरण सध्याचे सरकार जोमाने राबवत आहे. अशा वेळी सर्वसामान्य कष्टकरी जनतेमध्ये पोलादी एकता प्रस्थापित करून जनतेच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर जनतेला एकत्र आणण्याच्या कार्यात सहभागी व्हायला हवे, अन्यथा खूप उशीर होईल. म्हणून आम्ही सर्व न्यायप्रेमी नागरिक-विद्यार्थी-युवकांना 'भगतसिंह जन अधिकार यात्रे'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करत आहोत. देशभरातून ही यात्रा 12 मार्च ते 14 एप्रिल 2023 या कालावधीत दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, बिहार, उत्तराखंड, पंजाब, आंध्र प्रदेश, चंडीगड, राजस्थान आणि तेलंगणा या राज्यांतून वेगवेगळ्या जथ्यांद्वारे काढली जाणार आहे.

देशातील अनेक जनसंघटना मिळून या यात्रेचे आयोजन करत आहेत. कामगार बिगुलची टीम आणि तिच्यासोबत जोडलेला 'बिगुल मजदूर दस्ता' या मोहिमेचा भाग आहेत. आम्ही आपणास आवाहन करत आहोत की तुमच्या गावा/शहरामध्ये जिथे ही यात्रा पोहोचत असेल, तिच्यात सामील व्हा, व तिला जास्तीत जास्त सहयोग द्या.

**अधिक माहितीसाठी संपर्क: 095827 12837 (फोन/व्हॉट्सअॅप)**

जर तुम्ही यात्रेत सहभागी होऊ इच्छित असाल, वा इतर पद्धतींनी आमच्याशी जोडून घेऊ इच्छित असाल, तर खालील लिंक वर जाऊन फॉर्म भरावा. https://bit.ly/3n4UXT4

## 'कामगार बिगुल'चे सर्व वाचक आणि हितचिंतक यांना आवाहन

'कामगार बिगुल'च्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना आमचे आवाहन आहे की जर आपण या प्रकाशनाचे महत्त्व समजत असाल आणि जनतेचे प्रसारमाध्यम उभे करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक आवश्यक भाग मानत असाल, तर खालील मार्गांनी 'कामगार बिगुल' सुरू ठेवण्यात आम्हाला साथ द्या:

1. कामगार बिगुलची वार्षिक, पंचवार्षिक वा आजीवन सदस्यता घ्या.
2. जर तुमची सदस्यता संपली असेल, तर तिचे नुतनीकरण करा.
3. 'कामगार बिगुल' चे वितरक बना. याला जास्तीत जास्त संख्येने कामगार-कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात तुमची भूमिका बनवा.
4. 'कामगार बिगुल' करिता नियमित आर्थिक सहयोग द्या.

आम्ही जनतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो आणि आमच्या अनुभवाने सिद्ध केले आहे की कोणतीही तडजोड न करता, एका विचाराने जोडलेल्या लोकांची एकत्र मेहनत, आणि सहयोगाच्या जिवावर मोठी कामं होऊ शकतात. याच शक्तीच्या आधारावर गेली अनेक वर्षे कामगार बिगुल प्रकाशित होत आहे. तुम्ही साथ द्याल, याचा विश्वास नक्कीच आहे.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर : 74992 64646
- पुणे : 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

## बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा : 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# आय.आय.टी. मध्ये पुन्हा एका दलित विद्यार्थ्याची आत्महत्या

## आपल्या समाजाच्या पेरापेरात जातिवाद कसा भिनला आहे याची आणखी एक आठवण!

✎ शशांक




स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतर सुद्धा, जेव्हा भारत अमृत काळात प्रवेश करत असल्याच्या आणि विश्व गुरू बनण्याच्या अगदी जवळच असल्याच्या आणा भाका घेतल्या जात आहेत, आर्थिक सर्वेक्षण 2022-23 नुसार 18 ते 23 वयोगटातील प्रत्येकी 100 मुलांपैकी फक्त 27 मुलं उच्च शिक्षणासाठी (ज्यात आता डिप्लोमा सारख्या कोर्सेसचा सुद्धा समावेश केला जातो!) प्रवेश घेताना दिसतात. गुजरातमध्ये, ज्याची विकास कसा असावा याचं 'उदाहरण' म्हणून 'ख्याती' आहे, सकल नोंदणीचे प्रमाण 22 टक्के आहे. जनतेच्या मूलभूत गरजा देखील पूर्ण करण्यास सक्षम नसणाऱ्या ह्या नफाकेंद्री व्यवस्थेच्या सपशेल अपयशामुळे कामगार वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने ह्या शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडण्यास भाग पाडले जाते. जर कुणी कामगार वर्गीय दलित, आदिवासी, मुस्लिम किंवा इतर कुठल्या संरचनात्मक दमित पार्श्वभूमीतून येत असेल तर त्यांच्यासाठी शिक्षण घेणे हे अधिक आव्हानात्मक बनते. अशावेळी एका नामांकित शिक्षणसंस्थेत उच्च शिक्षणासाठी निवड झाल्यानंतर ह्या संस्थांमध्ये एक सामान्य बाब बनलेल्या जातिवादामुळे आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त केले जाणे हे फक्त दुःखद नाही तर अत्यंत संतापजनक आहे. 12 फेब्रुवारी रोजी आयआयटी बॉम्बेमध्ये आत्महत्येमुळे मृत्यू झालेल्या बी. टेक. प्रथम वर्षाचा विद्यार्थी असलेल्या दर्शन सोलंकी सोबत हेच घडले. 18 वर्षीय दर्शन, पहिल्या पिढीतील दलित विद्यार्थी, भारतातील नामवंत संस्थेत शिकत होता. त्याचे वडील रमेशभाई हे प्लंबर तर आई तारलिकाबेन मणिनगर, अहमदाबाद येथे घरकाम कामगार आहे. 2019 मध्ये घडलेल्या पायल तडवीप्रमाणेच दर्शनची आत्महत्या ही एक वैयक्तिक समस्या नसून संस्थात्मक हत्या आहे.

### उच्चभ्रू संस्थांमधील जातिवाद हा इतर काही नसून ह्या संस्थांबाहेर, समाजात असलेल्या जातिवादाचे प्रतिबिंब आहे!

वास्तवापासून तुटलेला एखादा व्यक्तीच हे म्हणू शकतो की भारतात कुठल्याही प्रकारे जातीय भेदभाव होत नाही. तुम्ही कोणत्या जागेवर राहता, तुमचे कोण मित्र बनतात, तुम्ही कोणत्या शाळेत जातात हे आजही मोठ्या प्रमाणात तुमच्या जात आणि वर्गाच्या आधारावर ठरते. 'सवर्ण शिक्षकांसाठी राखीव' पाण्याच्या मडक्यातून पाणी प्यायल्याने राजस्थान मधील जालौर जिल्ह्यातील 9 वर्षीय इंद्र मेघवालची त्याच्या शिक्षकाकडून झालेल्या हत्येला एक वर्षच उलटले आहे, आणि पुन्हा कुठल्यातरी शहरी गृहनिर्माण सोसायटी मध्ये राहणाऱ्यांना मुस्लिम आणि दलितांना घर न विकण्यासाठी सांगितले गेल्याची किंवा तरुण प्रेमी युगुलाला जातीचे बंधन तोडण्याची हिंमत केल्यामुळे जिवानिशी मारून टाकण्याची बातमी सतत आपल्यापर्यंत पोहचत आहे. उच्च शैक्षणिक संस्था ह्या काही समाजापासून वेगळ्या, एकांतात असलेले बेट नाहीत तर ह्यांना सुद्धा त्याच विषाने ग्रासलं आहे ज्याने संपूर्ण भारतीय समाजाला ग्रासलं आहे. काही अहवाल आणि संशोधन असं सांगतात की भारतातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये, विशेषतः वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात, जातिवाद फक्त प्रचलित नाहीये तर संस्थात्मकरित्या अस्तित्वात आहे. तथापि ह्या संस्था क्वचितच तेथे होणाऱ्या भेदभावाला स्विकारतात आणि हेतुपुरस्सर छुप्या आणि खुल्या दोन्ही प्रकारच्या जातिवादाकडे दुर्लक्ष करतात. दर्शन बाबत सुद्धा आयआयटी बॉम्बेने भेदभाव झाल्याच्या आरोपांना नाकारले आहे. संस्थेने जाहीर केलेल्या जबाबानुसार, "आयआयटी बॉम्बे काही बातम्यांच्या लेखातील दाव्यांचे जोरदारपणे खंडन करते जे असे सूचित करत आहेत की आत्महत्येचे कारण भेदभाव होते आणि ती एक 'संस्थात्मक हत्या' असल्याचे म्हणत आहेत. असे विधान करणे अत्यंत चुकीचे आहे जेव्हा की पोलीस अजूनही तपास करत आहेत. त्याच्या मित्रांकडून मिळालेल्या काही सुरुवातीच्या माहितीनुसार ह्या विद्यार्थ्याला अशा प्रकारे काही भेदभावाला सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले नाही." 2014 साली अनिकेत अंभोरे नामक आणखी एका विद्यार्थ्याचा आयआयटी बॉम्बे कॅम्पस मध्येच आत्महत्येने मृत्यू झाला होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे पालक संजय आणि सुनीता यांच्या मागणीमुळे त्याच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी कॅम्पसचे वातावरण अनुकूल करण्यासाठी लागू करण्याची आवश्यकता असलेल्या उपाययोजनांची चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली. समितीने 2015 साली अहवाल सादर केला आणि मान्य केले की त्याचा मृत्यू हा कॅम्पस मधील भेदभावपूर्ण वातावरणाचा परिणाम होता. संस्थेने जाणीवपूर्वक केलेली ही विस्मृती कुठली विसंगती नसून देशातील मध्य आणि उच्च मध्य वर्गातून येणाऱ्या 'जात आता अस्तित्वात नाही' ह्या युक्तिवादाचे प्रतिबिंब आहे.

**समितीने 2015 साली अहवाल सादर केला आणि मान्य केले की त्याचा मृत्यू हा कॅम्पस मधील भेदभावपूर्ण वातावरणाचा परिणाम होता.**

फॅसिस्ट संपूर्ण समाजात अस्तित्वमान जातीय पूर्वाग्रहांना बळ देतात आणि म्हणून अशा संस्थांमध्ये आधीच असलेल्या जातिवादाला फूस लावतात.

फॅसिस्ट भाजपा-रा.स्व.सं 2014 मध्ये सत्तेत आल्यापासून काही विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिल्लक असलेल्या मर्यादित लोकशाही अवकाशावर नियोजनबद्ध पद्धतीने हल्ले चढवले जात आहेत. अभ्यासक्रमातील बदल, रा.स्व.संघाच्या जवळ असणाऱ्यांना समित्यांवर नेमणे, नवीन शैक्षणिक धोरण 2020 (एन.ई.पी.), इत्यादी कृतींमार्फत मोदी सरकारला आणि त्याचे समर्थक असलेल्या भांडवलदार वर्गाला हेच हवे आहे की सर्व शिक्षणसंस्था निष्क्रिय, चिकित्सात्मक दृष्टीकोन नसलेल्या पुढच्या पिढ्या घडवणाऱ्या कारखाना बनाव्यात, त्या हिंदुत्वाच्या विचारधारेच्या वाहक बनाव्यात, असे नागरिक बनवणाऱ्या जे कुठल्याही सामाजिक-आर्थिक समस्येविरोधात (जसे की जातिवाद) त्यांचा आवाज उठविण्यास सक्षम नसतील, जे कधीही अशा समस्यांना मुळापासून उखडून फेकण्यासाठी होत असलेल्या संघर्षामध्ये सामील होण्यासाठी उत्सुक नसतील. जेव्हा 'लर्निंग आउटकम बेस्ड करिक्युलम फ्रेमवर्क (एल.ओ.सी.एफ.): बी.ए. इतिहास, पदवीपूर्व कार्यक्रम 2021' विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे (यू.जी.सी.)सादर केला गेला तेव्हा नवीन अभ्यासक्रमातून वर्ण-जात व्यवस्थेची उत्पत्ती यांसारखे विषय काढून टाकण्यात आले. सर्व पुराणमतवादी मतांचे 'भारतीय संस्कृतीच्या' नावाखाली जतन करणाऱ्या फॅसिस्टांना कशा प्रकारे जातीव्यवस्थेचे सुदृढीकरण करायचे आहे याचे हे फक्त एक उदाहरण आहे. 2014 पासून दलितविरोधी अत्याचारांत तर लक्षणीय वाढ झाली आहे. 2016 मध्ये घडलेल्या उना घटनेत जेव्हा स्वयंघोषित गौरक्षकांनी एका दलित कुटुंबातील 7 जणांना जाहीरपणे फटके मारले किंवा 2020 मध्ये 19 वर्षांच्या दलित मुलीवर हाथरस येथे झालेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेला आपण कसे विसरू शकतो? जेव्हा आपल्याकडे भांडवलदार वर्गाचा पूर्ण पाठिंबा असलेला कट्टर प्रतिगामी पक्ष आहे तेव्हा देशातील पुराणमतवादी गटांना जे हवे ते करण्याचे प्रोत्साहन मिळणे साहजिकच आहे. हेच शैक्षणिक संस्थांना देखील लागू आहे, विशेषत: अभियांत्रिकी आणि वैद्यकीय संस्था, जेथे या प्रतिगामी सामाजिक चळवळीचा (फॅसिझम) प्रतिकार करण्यासाठी कोणतीही प्रगतीशील राजकीय चळवळ पूर्णतः अनुपस्थित आहे.

### सुधारवादाने नाही तर फक्त क्रांतिकारी समाज परिवर्तनानेच जातिवाद संपुष्टात येईल

प्रत्येक वेळी जेव्हा अशी दुःखद घटना घडते, तेव्हा उच्च शैक्षणिक संस्थांमधील विविधतेबाबत वाद निर्माण होतात. ही वस्तुस्थिती आहे की ह्या सर्व संस्थांमध्ये समाजातील उपेक्षित समुदायांतून आलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या अत्यंत कमी असते, ज्यामागे संरचनात्मक करणे आहेत. 'सर्वांसाठी समान आणि मोफत शिक्षण आणि काम करण्यास सक्षम असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला रोजगार' ह्यासाठी असलेला संघर्ष निश्चितपणे घट्ट रोवलेल्या जातीय उतरंडीला कमकुवत करेल, आणि त्यात काही मधले टप्पे देखील असतील, जसे की जागा वाढवण्यासाठीचा तात्कालिक संघर्ष, फी कमी करण्यासाठी आणि बेरोजगारी भत्त्यासाठीचा संघर्ष. परंतु सोबतच आपल्याला हे देखील लक्षात घ्यावे लागेल की शिक्षणाला बाजारात विकला जाणारा एक माल बनवणाऱ्या भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत कुठल्याही सवलतीची, हक्काची मागणी ही दलित आणि इतर मागासवर्गीय समुदायांच्या जीवनात, ज्यातील बहुसंख्य कामगार वर्गातील आहेत, थोडका सोडून कुठलाही मूलभूत बदल घडवून आणणार नाही. प्रथमतः कारण त्यांना हा शिक्षणरूपी माल विकत घेणे शक्य नाही आणि दुसरे म्हणजे ही व्यवस्था संरचनात्मकरित्याच अशा गरजांची पूर्ती करण्यासाठी अक्षम आहे, विशेषतः आत्ता जेव्हा ती संकटात आहे. म्हणून आपल्याला अशा व्यवस्थेतच पर्याय शोधणं थांबवावं लागेल जी स्वतःच जातिवादाला जन्म देते. जातीभेद, विषमता आणि पृथक्करणाच्या निरंतर अस्तित्वाला आज भांडवली उत्पादन पद्धतीच कारणीभूत आहे, कारण जनतेला अशाप्रकारे विभाजित ठेवूनच तिची वर्गचेतना बोथट करवली जाऊ शकते. अशावेळी देशातील न्यायप्रिय विद्यार्थी आणि युवकांचे जातीय भेदभाव, पृथक्करण, दडपशाही, आणि भांडवलशाही विरोधात संघटित होत लढा उभारणे हे अनिवार्य कर्तव्य आहे. आज भांडवलशाही संकटात असताना, भांडवलदार वर्गाने आपला पूर्ण पाठिंबा प्रतिगामी ब्राह्मणी विचारधारेच्या फॅसिझमकडे वळवला असताना, फक्त अशी भांडवलशाहीच्या विरोधातील व्यापक कामगार वर्गीय संघर्षाशी जोडलेली मूलगामी विद्यार्थी-युवक चळवळच अस्तित्त्वमान व्यवस्थेला नष्ट करत त्याजागी जातिवादाच्या विळख्यापासून मुक्त असलेली, समता आणि न्याय यांवर आधारित नवीन व्यवस्थेची पायाभरणी करू शकते. जेव्हा आपण जातीभेदाच्या विचारधारेला, तिला पुनरुत्पादित करणाऱ्या व्यवस्थेसकट आपल्या शैक्षणिक संस्थांच्या चार भिंतींबाहेर नष्ट करू, फक्त तेव्हाच आपल्या संस्था जातिवादापासून मुक्त होतील. ह्या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी आपल्याला आणखी एका रोहित, पायल, अनिकेत किंवा दर्शनला गमावणे परवडणार नाही.

# नेल्ली हत्याकांडाच्या चाळीस वर्षांनंतर इतिहासातील ते मढे आजही जिवंत आहे!

✍ कात्यायनी

नेल्ली हत्याकांडाला चाळीस वर्षे पूर्ण झाली आहेत. पण नेल्लीचे मढे अजूनही जिवंत आहे आणि केवळ जिवंतच नाही तर वेगवेगळ्या वेषात ते देशभर घिरट्या घालत आहे. हे सत्य सरकार आणि भांडवलदार माध्यमांनी खूप प्रयत्न करूनही लपून राहू शकले नाही.

18 फेब्रुवारी 1983 रोजी मध्य आसामच्या नौगाव जिल्ह्यातील (आजचे मोरीगाव) नेल्ली शहर आणि जवळपास चौदा गावांमध्ये पूर्व पाकिस्तान/बांगलादेशातून विस्थापित झालेल्या मुस्लिम लोकसंख्येला लक्ष्य करत 6 तास अखंड पाशवी हत्याकांड घडले. सरकारच्या म्हणण्यानुसार, या भीषण हत्याकांडात मारल्या गेलेल्या लोकांची संख्या दोन हजार होती, परंतु प्रत्यक्षदर्शी आणि नंतर या भागाला भेट दिलेल्या पत्रकारांच्या मते, ठार झालेल्या लोकांची संख्या 7,000 ते 10,000 होती, आणि काहींच्या मते आकडा दहा हजारांच्या वर होता. 'इंडियन एक्स्प्रेस'चे पत्रकार हेमेंद्र नारायण आणि 'आसाम ट्रिब्यून'चे बेदब्रत लहकर हे या घटनेचे प्रत्यक्षदर्शी होते. नंतर अरुण शौरी (जे नंतर भाजपचे नेते बनले) यांनी 'इंडिया टुडे'मध्ये या संपूर्ण घटनेचा वस्तुनिष्ठपणे तथ्य तपासलेला अहवाल प्रकाशित केला. नेल्ली हत्याकांडाच्या तीस वर्षांनंतर, जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील संशोधन अभ्यासक जपानी समाजशास्त्रज्ञ माकिको किमुरा, यांनी 1983 मध्ये 'द नेल्ली मॅसेकर: एजन्सी ऑफ रॉयटर्स' प्रकाशित केले, जे या घटनेचे आणि तिच्या राजकीय पार्श्वभूमीचे सर्वात तपशीलवार आणि तथ्यात्मक वर्णन प्रस्तुत करते. या ऐतिहासिक शोकांतिकेवर एकाही भारतीय समाजशास्त्रज्ञाचे पुस्तक नाही आणि समकालीन राजकारणावर लिहितानाही नेल्लीची आठवण क्वचितच कुणाला येते, ही सुद्धा कमी लाजिरवाणी बाब नाही!

नेल्ली हत्याकांड हे स्वातंत्र्यानंतर झालेले भारतातील पहिले एवढे मोठे हत्याकांड होते. ही दंगल नव्हती, तर एक नियोजित हत्याकांड होते ज्यात चौदा मुस्लिम गावांमधील लहान मुले आणि महिलांसह नि:शस्त्र मुस्लिम लोकसंख्येला संघटित सशस्त्र जमावाने भाजीपाल्यासारखे कापले होते. यानंतर घडलेले दुसरे मोठे हत्याकांड म्हणजे 1984 मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेले देशभरातील शीखांचे हत्याकांड. तिसरे मोठे हत्याकांड 'गुजरात-2002'चे होते. 1989 मध्ये अडवाणींच्या रथयात्रेच्या काळापासून आजतागायत संपूर्ण देशात मुस्लीम जनतेवर हल्ले होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, सर्व दंगलींमध्ये त्यांना प्रामुख्याने लक्ष्य करण्यात आले आहे आणि हे सांगण्याची गरज नाही की सरकारी यंत्रणा सुद्धा त्यांना नेहमीच बळीचा बकरा बनवत आली आहे.

नेल्लीची घटना घडली तेव्हा आसाम आंदोलन शिगेला पोहोचले होते. आसाम गण परिषद (एजीपी) आणि ऑल आसाम स्टुडंट्स युनियन (एएएसयू, आसू) यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. निवडणुकीपूर्वी कथित बांगलादेशी घुसखोरांची नावे मतदार यादीतून वगळण्यात यावीत, अशी त्यांची मागणी होती. निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी त्या वेळी आसाममध्ये केंद्रीय निमलष्करी दलाच्या 400 कंपन्या आणि लष्कराच्या 11 ब्रिगेडची अभूतपूर्व तैनाती करण्यात आली होती. कुख्यात के.पी.एस. गिल हे त्यावेळी आसामचे पोलीस प्रमुख होते. राज्याच्या विविध भागातून, विशेषत: नौगाव जिल्ह्यातून अशी बातमी आली होती की बंगाली मुस्लिम लोकसंख्येच्या गावांवर सशस्त्र हल्ले होण्याची शक्यता आहे. परंतु अडचण अशी होती की या केंद्रीय सशस्त्र दलांना स्थानिक पोलिसांच्या मदतीनेच दुर्गम भागात पोहोचणे शक्य होते आणि राज्य पोलिसांची आसामच्या चळवळीला उघड सहानुभूती होती. या साऱ्या परिस्थितीत आग लावण्याचे काम अटलबिहारी वाजपेयींच्या एका भाषणाने केले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून आसाममध्ये प्रचार करताना वाजपेयींनी अत्यंत दाहक भाषण केले. त्यात ते म्हणाले, "परदेशी इथे आले आहेत आणि सरकार काहीच करत नाही. ते पंजाबमध्ये आले असते तर काय झाले असते? लोकांनी त्यांचे तुकडे करून फेकले असते."

भारतात एक समस्या सर्वत्र आहे ती म्हणजे मुस्लिम विरोधी जातीय पूर्वग्रह, जे केंद्रीय सशस्त्र दलांमध्येही खोलवर रुजले आहेत. याबद्दल डझनभर अहवाल आहेत. हा घटक आसाममध्येही होताच. राज्य यंत्रणेला आठवडाभरापासून सातत्याने माहिती मिळत होती की, नेल्लीच्या आजूबाजूला विध्वंसक शक्ती काहीतरी मोठे करण्याच्या तयारीत आहेत. मुस्लिम बांगलादेशी आपल्या गावांवर हल्ला करणार आहेत असा प्रचार करून काही संघटित टोळ्या जवळच्या तिवा व कोच जमातीमध्ये आणि हिंदू लोकसंख्येच्या गावांमध्ये आठवड्यांपासून दहशतीचे वातावरण निर्माण करत होत्या. त्या संघटित टोळ्या कोणाच्या आहेत हे शासन-यंत्रणेने कधीच उघड केले नाही. अशा प्रकारे 'संभाव्य हल्लेखोरांना' धडा शिकवण्यासाठी जमाव आधीच तयार केला जात होता. याहून लाजिरवाणी बाब म्हणजे या भीषण हत्याकांडातील एकाही आरोपीला शिक्षा झाली नाही. एकूण 688 खटले दाखल झाले, त्यापैकी 378 पुरावे आणि ' बंद करण्यात आले. उर्वरित 310 प्रकरणे प्रलंबित होती, जी राजीव गांधी आणि आसाम चळवळीचे नेतृत्व यांच्यात झालेल्या करारानंतर 1985 मध्ये बंद झाली. सरकारच्या मृतांच्या यादीनुसार, त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 5 हजार रुपये आणि जखमींना प्रत्येकी 2 हजार रुपये देण्यात आले. नेल्ली हत्याकांडाच्या चौकशीसाठी सरकारने तिवारी आयोगाची स्थापना केली होती. परंतु त्या आयोगाचा 600 पानांचा अहवाल आजपर्यंत "वर्गीकृत दस्तऐवज" या श्रेणीत टाकून सार्वजनिक होण्यापासून दूर ठेवण्यात आला आहे.

नेलीच्या घटनेसाठी काही एका वर्षात जमीन तयार झाली नाही. भारताची फाळणी करण्याचे वसाहतवादी कारस्थान आणि निवडणूकबाज पक्षांचे मतपेढीचे राजकारण, आसामी अंधराष्ट्रवादी लाटेचा उदय आणि जातीयवादी शक्तींच्या सततच्या सक्रियतेचा हा एक दशकापासून वाढत गेलेला फोड होता. फाळणीनंतर पूर्व पाकिस्तानातून मोठ्या प्रमाणात स्थलांतरित आसाममध्ये आले आणि त्यात मुस्लीमही होते. तत्पूर्वी, ब्रिटीश राजवटीतही पूर, दुष्काळ आणि गरिबीचे बळी झालेले लोक बंगालच्या सीमावर्ती भागातून आसाममध्ये स्थायिक झाले होते, ज्यात बहुसंख्य मुस्लीम होते. त्यानंतरच्या दशकांमध्येही, पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी सापत्न वागणूक आणि दडपशाहीमुळे, पूर्व पाकिस्तानातील लोक भारतात येत राहिले आणि त्यापैकी बहुतेक आसाममध्येच स्थायिक झाले. 1971 चे भारत-पाकिस्तान युद्ध आणि बांगलादेशच्या निर्मितीदरम्यान भारतात जे लाखो निर्वासित आले, त्यांचा मोठा भाग आसाममध्ये येऊन स्थायिक झाला. आसाममधील हिंदू लोकसंख्या आणि आदिवासी लोकसंख्येसोबत या विस्थापित लोकांचे सांस्कृतिक-भाषिक वेगळेपण होते, परंतु त्यांच्यामध्ये कोणतेही वैर नव्हते.

1960 च्या उत्तरार्धात जेव्हा देशात भांडवली व्यवस्थेचे संकट गडद होऊ लागले तेव्हा संपूर्ण देशातील जनता महागाई आणि बेरोजगारीच्या वाढत्या दबावाने हैराण झाली होती. कोणताही संघटित क्रांतिकारी पर्याय समोर नसल्यामुळे, भांडवली व्यवस्थेच्या परिघातील पर्याय म्हणून बिगर-काँग्रेसवादाच्या बुर्झ्वा संसदीय राजकारणाने आपला पाया देशभर विस्तारला. आसामसह ईशान्येकडील राज्यांतील लोकांनी स्वत:च्या वाढत्या दुर्दशेचे कारण केंद्राने आधीच सुरू ठेवलेल्या दुर्लक्षाच्या धोरणाच्या निरंतरतेत व विस्तारात पाहिले, जरी आसामची स्थिती ईशान्येकडील इतर राज्यांपेक्षा वेगळी होती. संपूर्ण देशाप्रमाणेच आसामच्या राजकीय पटलावर पर्यायाच्या रूपात अशी कोणतीही संघटित क्रांतिकारी डावी शक्ती नव्हती, जी केंद्र आणि राज्यातील भांडवलदार वर्गाच्या संपूर्ण सत्तेच्या विरोधात जनतेला एकत्र आणू शकेल. त्यामुळे आसामी राष्ट्रातील भांडवलदार वर्गाने याचा पुरेपूर फायदा घेतला आणि नवोदित आसाम गणसंग्राम परिषद व ऑल आसाम स्टुडंट्स युनियनच्या (आसू) आंदोलनाला आसामी भांडवलदार वर्गाच्या मोठ्या भागाचे समर्थन मिळाले. या आसामी राष्ट्रीय चळवळीने लवकरच केवळ अंधराष्ट्रवादीच नव्हे तर धर्मवादी रूपही धारण केले आणि केंद्राने केलेल्या दुर्लक्षाविरुद्धच्या निषेधाचे सर्व मुद्दे इथे आणून सोडले की बांगलादेशी स्थलांतरितांना नागरिकत्व देऊन आसाममध्ये स्थायिक करू नये, बेकायदेशीर स्थलांतरितांना हुडकून बाहेर काढावे आणि आत्तापर्यंत दिलेल्या नागरिकत्वाचाही आढावा घ्यावा... वगैरे वगैरे! म्हणजेच केंद्र सरकारऐवजी आता हल्ल्याचे लक्ष्य बांगलादेशी स्थलांतरित झाले आणि मुख्य मुद्दाही बदलला. या स्थलांतरितांपैकी एक मोठा भाग मुस्लीम असल्याने, वास्तवात धार्मिक द्वेष आणि विवादही वाढले.

अनेक सामाजिक शास्त्रज्ञांनी हे सत्य अधोरेखित केले आहे की हा तो काळ होता जेव्हा आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ख्रिश्चन चर्च आणि मिशनरींना विरोध करत तळागाळातील हिंदूंशिवाय विविध आदिवासी समुदायांमध्ये आपल्या कार्याची व्याप्ती आणि सक्रियता वेगाने वाढवली होती. नेल्ली हत्याकांडावरील आपल्या अहवालात, अरुण शौरी यांनी हे देखील कबूल केले की जातीय द्वेषाच्या त्या रानटी उद्रेकामागे आरएसएस मुख्य घटक नसला तरीही त्यांची महत्त्वाची भूमिका होती. केंद्रीय स्तरावर संघ आसाम आंदोलनाच्या मुद्द्यावर उघडपणे भूमिका घेत नव्हता, पण आसाममध्ये तो एजीपी आणि आसूला पूर्ण पाठिंबा देत होता आणि बांगलादेशी मुस्लिमांविरुद्ध द्वेष भडकवण्याचे काम पद्धतशीरपणे करत होता. नेल्लीच्या जवळपास प्रक्षोभक प्रचार करणाऱ्या संघटित संशयास्पद टोळ्यांबद्दल आम्ही आधीच बोललो आहोत. आसामच्या आजच्या राजकीय पटलावर हिंदुत्व फॅसिझमच्या उदयाची घटना समजून घेण्यासाठी ही ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. एजीपी आणि आसू यांच्या नेतृत्वाखालील आसामी संकुचित अंधराष्ट्रवादी चळवळीचा एक मोठा भाग मोठ्या भांडवलदार पक्षांच्या राजकारणात विलीन झाला कारण उदयोन्मुख आसामी भांडवलदार वर्गही भारतीय बड्या भांडवलदार वर्गासोबत कनिष्ठ भागीदार म्हणून समाविष्ट झाला आणि पुढे गेला. त्यातील एका उपविभागाने 'उल्फा'च्या अतिरेकी अंधराष्ट्रवादी गटाचे रूप धारण केले, ज्याचा सामाजिक पाया पंजाबच्या खलिस्तानी चळवळीसारखाच अतिशय संकुचित होता आणि तो आज नामशेष झाला आहे. आज, हिंदुत्व फॅसिझमने आसाम चळवळीच्या कट्टरवादी, मुस्लीम स्थलांतरित विरोधी, धर्मवादी स्वराला स्वत:मध्ये सामावून घेतले आहे. आसामच्या राजकारणात संघाच्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट राजकारणाच्या प्रभावाच्या विस्तारामागे हेच प्रमुख कारण आहे.

आसाममधील बांगलादेशी स्थलांतरितांच्या समस्येला मुस्लीम "घुसखोरांची", जे कालांतराने आसाममधील हिंदू आणि आदिवासींना अल्पसंख्याक बनवून त्यांची दडपशाही सुरू करतील, "धोकादायक" समस्या म्हणून कायम मांडत राहणे, आणि हा खोटा प्रचार सुरू ठेवणे की हे स्थलांतरित लोक त्यांच्या बेरोजगारी आणि



पान 11 वर

# हाथरस घटनेतील बलात्काऱ्यांची निर्दोष मुक्तता!!

## गुन्हेगारांना पाठीशी घालण्याची मालिका सुरूच! हेच संघाचे हिंदुराष्ट्र!!

✎अश्विनी

सप्टेंबर 2020 मध्ये उत्तर प्रदेशमधील हाथरस गावात 19 वर्षीय मुलीवर झालेल्या सामूहिक बलात्कारातील 4 आरोपी, ज्यांच्यावर सीबीआय तपासणीनंतर बलात्कारासहीत हत्येचे गंभीर आरोप होते आणि ज्या आरोपांखाली चारही आरोपी गेली अडीच वर्षे तुरुंगात होते, गेल्या 2 मार्च रोजी कोर्टाने त्यातील तिघांची तुरुंगातून मुक्तता केली आहे आणि संदीप नामक चौथ्या आरोपीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा कायम ठेवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सीबीआय तपासणी, मुलीचं मरणाआधीचं वक्तव्य, सर्व पुरावे समोर असून देखील बलात्कारच झाला नाही हा निर्णय कोणाच्या दबावात दिला गेला? कोणाच्या सरकारमध्ये हे सगळे घडले, तर अर्थातच महिला सशक्तीकरणाचे ढोल बडवणाऱ्या भाजपच्या योगी सरकारमध्ये. भाजपचेच योगी आदित्यनाथ हे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री. जन्मापासून मरेपर्यंत स्त्रीवर पुरुषाचे बंधन असावे, तिच्या शक्तीला, तिच्या भावनेला नियंत्रित केले पाहिजे अन्यथा ते विनाशाकडे घेऊन जाते असा महिलाविरोधी दृष्टिकोन असणाऱ्या भाजपच्या योगी सरकारचे गुन्हेगारी, स्त्रीविरोधी चारित्र्य पुन्हा एकदा समोर आले आहे.

14 सप्टेंबर 2020 रोजी उत्तरप्रदेश मधील हाथरस या एका लहानशा गावी आईसोबत चारा गोळा करण्यासाठी घराजवळच्या शेतात गेलेल्या 19 वर्षीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाला. सवर्ण जातीतून येणारे चारही तरुण बलात्कार करून तेवढ्यावर थांबले नाहीत, तर तरुणीची जीभ हासडून काढली तिच्या मानेचा मणका तोडून तिला पूर्ण अधू केले. तरुणीला शोधत तिची आई त्या जागी पोचली असता रक्ताच्या थारोळ्यातच पडलेली मुलगी तिला सापडली. लगेच तिला अलिगढच्या इस्पितळात नेण्यात आले. परंतु तिकडे फारशी सुविधा नसल्याने दिल्लीच्या सफदरजंग इस्पितळात मुलीला हलवण्यात आले. 9 दिवसानंतर मुलगी शुद्धीत आली आणि झालेल्या घटनेबद्दल तिने पोलिसांना माहिती दिली, चारही आरोपींची नावे घेऊन त्यांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला ह्याची देखील नोंद पोलिसांकडे केली. 15 दिवस प्राणांशी झुंज देत शेवटी 29 सप्टेंबरला तिचा मृत्यू झाला.

पीडितेच्या मृत्यूनंतर घरच्यांच्या कुठल्याही उपस्थिती शिवाय मध्यरात्री अडीच वाजता पोलिसांनी परस्पर तिच्या प्रेताला अग्नी दिला. इतकेच नाही तर एफआयआर दाखल करून घ्यायलाही पोलिसांनी 9 दिवस लावले. यातच दिसून येते की पोलिस यंत्रणा आरोपींना वाचवण्यासाठी किती आटोकाट प्रयत्न करत होती. घटनेपासूनच्या संपूर्ण कालावधीत उत्तर प्रदेश पोलिस यंत्रणेच्या कामाने तर देशभरात खळबळ माजवली. घटनास्थळापासून मीडियाला पुरेपूर दूर ठेवण्याचे काम चोखपणे पोलीस यंत्रणेने बजावलं ज्याचे अनेक व्हिडिओज सोशल मीडिया वर बघायला मिळतील. सिद्दिक कप्पन ह्या केरळच्या पत्रकाराला हाथरस घटनेच्यावेळी बातमी प्रसारित करण्यासंदर्भात अटक करून तुरुंगात टाकले. 2 वर्षे तुरुंगात सडवल्यावर जामिनावर सोडण्यात आले. घटनेच्या 67 दिवसानंतर 18 डिसेंबर रोजी एससी एसटी विशेष कोर्टात घटनेची चार्जशीट दाखल झाली आणि सीबीआय ने 104 लोकांना साक्षीदार बनवले. चारही आरोपींना अटक करून तुरुंगात टाकले गेले. परंतु आता अडीच वर्षानंतर पुन्हा तिघा आरोपींना गुन्ह्यातून मुक्त करवून, महिला अत्याचाराला मजबूत करण्याचंच काम भाजपशासित उत्तर प्रदेश सरकार करत आहे. मानवतेच्या सगळ्या सीमा पार करणारं असं हे क्रूर कृत्य करताना आरोपींना कोणाचीही भीती असू नये? सत्ताधाऱ्यांचा वरदहस्त आणि समाजाच्या पेरापेरात उच्चवर्णीय ब्राम्हणवादी मानसिकता रुजलेली असताना अशा जातीयवादी-बलात्काऱ्यांना भीती कशाला वाटेल? भीती घातली जाते ती फक्त देशातील बहुसंख्यांक कामगार कष्टकऱ्यांना, ज्यांच्या भीतीच्या आधारावरच ही शोषणकारी-दमनकारी व्यवस्था चालत रहाते.

### भाजपच्या सवर्ण गुंडांना न्यायालयाकडून निर्भिड पाठिंबा



सवर्ण जातीतील म्हणजेच गावच्या ठाकुरांकडून दलित मुलीवर केला गेलेला अत्याचार आणि त्यात तिचा झालेला मृत्यू, उत्तर प्रदेश पोलिसांची तपासात हयगय ह्या सर्व गोष्टींमुळे फक्त हाथरस नाही तर संपूर्ण उत्तर प्रदेशसहीत भारतभर ह्या घटनेविरोधात निदर्शने झाली. त्याचा परिणाम म्हणून "रामराज्य" आणू पाहणाऱ्या योगी सरकारने एसआयटी ( विशेष तपासणी खाते) कडे घटनेचा तपास सोपवला. त्यानेही उपयोग नाही झाला तेव्हा सीबीआय ( केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग ) कडे तपास सोपवला. त्या तपासानुसारच बलात्कार आणि खूनाच्या गंभीर कलमांखाली आरोपींना अटक केली गेली.

घटनेला वर्ष उलटून गेल्यावर सुद्धा उच्च न्यायालयाच्या तपासणी विभागाने तडकाफडकी अंत्यसंस्कार केल्याबद्दल एकही अहवाल सादर केलेला नाही. तसेच सीबीआयच्या बलात्कार झाल्याच्या स्पष्ट अहवालानंतर सुद्धा बलात्कार झाल्याचा कुठलाही पुरावा मिळाला नाही असे स्पष्टीकरण उच्च न्यायालयाकडून देण्यात आले. आज अडीच वर्षानंतर आरोपींना दोषमुक्त करताना बलात्कार आणि खुनाची गंभीर कलमे काढून टाकणे दाखवून देत आहे की सत्ताधाऱ्यांच्या दबावात असलेल्या न्यायव्यवस्थेकडून निःपक्षपाती न्यायाची अपेक्षा केलीच जाऊ शकत नाही. आता तर असेही म्हटले जाते की न्यायालय निर्णय देण्यासाठी आहे, न्याय देण्यासाठी नव्हे. सोशल मीडियावरील एका विडिओनुसार मृत तरुणीच्या वहिनीने मीडियाला सांगितले की, 2 मार्च ला कोर्टाकडून येणाऱ्या निर्णयाची सर्वजण आशा लावून बसले होते, निर्णय होण्याच्या अगोदर आरोपीच्या वकिलांकडून कानी आलेले बोलणे असे होते "एका भंगी मुलीसाठी चौघांचा बळी देणं देशाला परवडणार नाही", ब्राम्हणवादी मानसिकता अधोरेखित करणारे हे अजून एक उदाहरण. बलात्कार आणि हत्या झाल्याच्या बाबतीत पीडित व्यक्तीचे मरणाआधीचे वक्तव्यच पुरावा म्हणून वापरले जाईल हा सुप्रीम कोर्टाचाच निर्णय असून आज तोदेखील जाणूनबुजून दुर्लक्षित केला जातोय.

आज हाथरस घटनेला 3 वर्ष होत आहेत परंतु मुलीच्या कुटुंबियांवर सतत संरक्षणाच्या नावाखाली पोलिसी पहारा आहे. मुलीच्या हत्येबद्दल 25 लाखाची कुटुंबीयांना भरपाई आणि घरातील एकाला सरकारी नोकरी अशी आश्वासने उत्तर प्रदेश सरकारकडून दिली गेलीत, परंतु आज तीन वर्षाखाली त्यातले एकही आश्वासन पूर्ण केले गेले नाही.

### फॅसिस्ट भाजपाचे ब्राह्मणवादी आणि स्त्रीविरोधी चरित्र

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात गुजरात गोध्रा दंगलीतील बिल्कीस बानो सामूहिक बलात्कारातील आरोपींना शिक्षा पूर्ण होण्याआधीच तुरुंगातून मुक्त केले. त्यानंतर भाजपच्याच नेत्यांनी हार तुरे देऊन त्यांचा सत्कार करत म्हटले की "गुन्हेगार ब्राम्हण घरातून येतात, आणि ब्राम्हण चांगल्या संस्कारांचे असतात. त्यांना तुरुंगात ठेवणे म्हणजे देशाचे नुकसान आहे."

हाथरस हत्याकांड झाल्यानंतर 4 ऑक्टोबर 2020 रोजी भाजपचेच माजी आमदार राजवीर सिंग पहिलवान यांनी आरोपीच्या समर्थनात रॅली काढली. 2017 मध्ये झालेल्या उन्नावमधील अल्पवयीन मुलीच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या कुलदीप सिंह सेंगर ह्या भाजप नेत्यांच्या समर्थनार्थ हिंदुत्ववाद्यांनी रॅली काढली होती. तर जम्मू मधील कठुआ येथे झालेल्या अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या आरोपीच्या समर्थनात मोर्चे काढले गेले.

याची मुळं हिंदुत्वाच्या विचारधारेतच आहेत. तथाकथित 'स्वातंत्र्यवीर', हिंदुत्ववाद्यांचे दैवत असलेले सावरकर, इंग्रजांना माफीनामे लिहीण्याबद्दल जे प्रसिद्ध आहेत, त्यांनी आपल्या 'भारताच्या इतिहासातील सहा सुवर्णोध्याय' ह्या पुस्तकात 'हिंदू विजेत्यानी मुस्लिम महिलांवर बलात्कार करणे म्हणजे राजकीय हत्यार आहे' या घृणास्पद गोष्टीचे समर्थन केले आहे. योगी आदित्यनाथ यांचे तर सत्तेवर आल्यापासून रोज नवीन महिलाविरोधी विचार बघायला ऐकायला मिळतात. "पुरुषांनी स्त्रियासारखे गुण आत्मसात केले तर ते देव बनतात पण जेव्हा स्त्रिया पुरुषांसारखे गुण आत्मसात करतात तेव्हा त्या राक्षसीसारख्या होतात." हे योगींचेच वक्तव्य आहे. पितृसत्तात्मक विचार ठासून भरलेले हे नेते, तशाच विचारांची पेरणी समाजात करत असतात. स्त्री विरोधी गुन्ह्यांची यादी बनवायला गेल्यास गुन्हेगारांच्या संख्येत भाजपचे नेते पहिली बाजी मारतील अशी परिस्थिती आहे. बलात्कारासारख्या गोष्टीला सत्ताधाऱ्यांचं समर्थन, पैशांची ताकद हे मोठं पाठबळ आहे, म्हणूनच संघी फॅसिस्ट सरकार सत्तेत असेपर्यंत महिलाविरोधी अत्याचार कमी होण्याची कुठलीही चिन्हे दिसत नाहीत. एका बाजूला लाल किल्ल्यावर महिला सशक्तीकरणाचे ढोल बडवणारे आणि दुसरीकडे बलात्कारातील आरोपींना पाठिंबा देणारे असे दुहेरी चेहरे दाखवणाऱ्या मोदी सरकारचे खरे चरित्र काय हे वेगळ्याने सांगण्याची गरज नाही.

### भारतीय न्यायव्यवस्थेचे भांडवली चरित्र

हाथरस असो वा अशी अनेक प्रकरणे, भारतात कामगार-कष्टकऱ्यांना न्याय मिळणे हे फक्त एक मिथक आहे. याचे कारण असलेले भारतीय न्यायव्यवस्थेचे भांडवली चरित्र जाणून घेणे आज महत्वाचे आहे. आज देशातील बहुतांश कारागृहे क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांनी ठासून भरली आहेत. कारण 70-75 टक्के केसेसमध्ये न्यायालयात खटले चालवले जात नाहीत किंवा आरोपींना बेल मिळू शकत नाही. त्यामुळे गुन्हा सिद्ध झाल्याचे प्रमाण खूप कमी असताना त्याशिवायच कारागृहात खितपत पडलेल्या आरोपींची संख्या प्रचंड प्रमाणात आहे. मुंबईतील सर्वात मोठ्या असलेल्या आर्थर रोड तुरुंगात 800 कैद्यांची जागा असताना सुमारे 3000 कैदी कोंबून भरले आहेत. इतर तुरुंगाची अवस्थाही ह्याच प्रकारे आहे. खोट्या गुन्ह्यांखाली अटक केलेली, कामगार कष्टकरी वर्गातून येणारी जनता पैशाच्या अभावी जामीनही मिळू न शकल्याने वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडून असतात. तर दुसरीकडे अक्षम्य गुन्हा करणारे धनाढ्य आरोपी मोठमोठे वकिल करून लगेच जामिनही मिळवू शकतात व त्यांच्याकरिता तातडीने सुनावण्याही होतात (उदा: आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा आरोप असलेला पत्रकार अर्णब गोस्वामी), आणि कायद्याचे छक्केपंजे खेळून ते गुन्ह्यांमधून निर्दोषही सुटतात (उदा. रस्त्यावर झोपलेल्या कामगारांचे खून करणारा सलमान खान), आणि शिक्षा झालीच तर तुरुंगात त्यांची आलिशान सोय केली जाते (उदा. लालूप्रसाद यादव वा असे सर्वच मोठे राजकारणी), त्यांना पॅरोल दिले जातात, आणि लवकर सुटकाही केली जाते (उदा. बिल्किस बानोचे बलात्कारी).

दुसरीकडे गुन्ह्यांचे तपासही होत नाहीत, गुन्हेगार मोकळे फिरत राहतात आणि त्याचवेळी जनपक्षधर कार्यकर्त्यांना मात्र दमनकारी कायदे वापरून प्रताडित केले जाते. अतिशय दमनकारी आणि लोकशाही विरोधी असणारे युएपीए सारखे कलम लावून कित्येक राजकीय कैद्यांना कुठलाही गुन्हा सिद्ध झालेला नसताना तुरुंगात सडावे लागत आहे. दाभोळकर-पानसरे यांच्या हत्यांना 9 वर्षे उलटून सुद्धा फासिस्ट खून्यांच्या शोधत दिरंगाई केली जात आहे. फादर स्टान स्वामी ह्या भीमा कोरेगाव हिंसेप्रकरणी खोटा आरोप लावून यूएपीए खाली अटक केलेल्या 84 वर्षीय कार्यकर्त्यांचा, बेल मिळू न दिल्यामुळे, पार्किन्सन आजार असताना तब्येत बिघडल्यामुळे तुरुंगातच मृत्यू झाला.

देशात न्यायाची पायमल्ली नेहमीच होत आली आहे. याला जबाबदार आहे राज्यसत्तेचे स्त्रीविरोधी, भांडवली चरित्र. सरकार असो वा न्यायव्यवस्था सर्रास संपत्तीधारक वर्गाची सेवा करताना दिसतात. अशातच फॅसिस्ट भाजप सरकारने तर आता स्त्रीविरोधी अत्याचारांना न्याय्य रूप देण्याचेच काम चालवले आहे. तेव्हा महिलाविरोधी, पितृसत्ताक, जातीवादी, ब्राम्हणवादी, फॅसिस्ट भाजप सरकारचे इरादे पूर्ण होऊ न देणे, त्यांना वर्गीय एकजूट करून विरोध करणे हे कष्टकरी जनतेसमोरील सर्वात मोठे काम आहे आणि त्यासाठीच सतत संघर्षरत असण्याची गरजदेखील आहे.

# मालकांसाठी स्वस्तात तासन्तास राबा: हेच आहे हिंदुराष्ट्र

पान 1 वरून

शिंदे यांच्या सरकारांच्या पाठिंब्याने होत आहे.

आज देशातील अनेक राज्यांमध्ये आणि केंद्रातही भाजपचेच सरकार आहे, ज्याला संघपरिवारातील लोक खुलेपणाने हिंदूंचे सरकार म्हणतात; परंतु हा मुद्दा त्यांच्यासाठी गैरलागू आहे की "हिंदूचे" सरकार असतानाही हिंदू असुरक्षित कसे? या मोर्चांचे आयोजन करणारे सर्व आणि त्यात सामील होणारे अनेक यांना याची चांगली जाणीव आहे की हे मोर्चे देशाच्या खऱ्या स्थितीला लपवण्यासाठी, धार्मिक ताण-तणाव निर्माण करण्यासाठीच काढले जात आहेत.

नुकतेच संघपरिवारातील लोकांतर्फे तामिळनाडू मध्ये हिंदी भाषिक कामगारांवर हल्ले झाल्याच्या अफवा पसरवल्या गेल्या. अशाप्रकारे हिंदू-मुस्लिम सोबतच उत्तर-दक्षिण भारतीय तेढ निर्माण करणे हे सुद्धा याच 'फोडा आणि राज्य करा'च्या धोरणाचा एक हिस्सा आहे.

## जनतेची दुर्दशा : अत्युच्च बेरोजगारी

मोदी सरकारच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीनंतर आज जनतेची कधी नव्हे अशी दुर्दशा झालेली आहे, आणि मोदी सरकारने मतं मिळवण्यासाठी केलेल्या सर्व जुमलेबाजीचे सत्यही समोर आहे. "बहुत हुई महंगाई की मार, अब की बार मोदी सरकार", "प्रत्येक वर्षी दोन कोटी रोजगार देणार" अशा सर्व घोषणांचे सत्य आज समोर आहे.

कंत्राटीकरण, खाजगीकरणाचे धोरण मोदी सरकारने काँग्रेसपेक्षाही वेगाने पुढे ढकलले आहे, आणि परिणामी भांडवलदारांना स्वस्तात राबणारे कामगार पुरवण्याचे काम इमाने-एतबारे पुढे नेले आहे. सरकारी नोकऱ्या तर आता लुप्तप्रायच झाल्या आहेत. नवीन कामगार कायद्यांनी तर हे काम अत्यंत सोपे केले आहे, आणि कामगारांना कधीही काढून टाकणे, कारखानाच बंद करणे, कोर्टापर्यंतची पोहोचच कमी करणे, हे सर्व शक्य करवले आहे.

दरवर्षी दोन कोटी रोजगार देण्याचे आश्वासन देणाऱ्या मोदी सरकारने बेरोजगारीचे उच्चांक गाठले आहेत. जुलै 2022 मध्ये केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत सांगितले की, मोदी सरकारच्या 8 वर्षांच्या कार्यकाळात सुमारे 22 कोटी लोकांनी नोकऱ्यांसाठी अर्ज केले होते, त्यापैकी केवळ 7.22 लाख लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या! रेल्वेच्या 90,000 जागांकरिता आलेले 2.8 कोटी अर्ज असोत, वा बंगालमध्ये ग्रुप डीच्या 6,000 जागांसाठी आलेले 25 लाख अर्ज असोत, देशातील बेरोजगारीच्या स्थितीचे क्रूर चित्र समोर उभे करतात.

कंत्राटीकरणाचा कहर तर इतका की आता लष्करात 'अग्निवीर' या नावाने कंत्राटी पद्धतीने सैनिक भरती करण्याची योजना राबवली जात आहे आणि निर्लज्जपणाचा कळस तर इतका की बेरोजगारांनी "भजी तळावीत" आणि "रोज 200 रुपये कमावणे सुद्धा रोजगार आहे" अशासारखी गलिच्छ वक्तव्ये सुद्धा मोदींच्या मंत्र्यांनी केली आहेत. नैराश्यापोटी 2017 ते 2021 या चार वर्षात 7,20,611 लोकांनी आत्महत्या केल्या आहेत, ज्यामध्ये रोजंदारीवर काम करणारे मजूर आणि शेतमजूर, गरीब शेतकरी, विद्यार्थी-युवक आणि छोटे "स्वयं रोजगार" करणारे लोक बहुसंख्येने आहेत.

महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकारने 14 मार्च रोजी एक सरकारी आदेश (जी.आर.) काढला, ज्याद्वारे येत्या 5 वर्षांसाठी 9 खाजगी कंपन्यांना सरकारला लागेल तेव्हा कामासाठी माणसे पुरवण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. यामध्ये प्रकल्प समन्वयक, इंजिनिअर, शिक्षक, कंटेंट लेखक, कारकून, लायब्ररीयन, टेलिफोन ऑपरेटर, ड्रायव्हर ,सुतार, माळी, लिफ्ट ऑपरेटर, झाडूवाला, शिपाय अशा अनेक कुशल, अर्ध-कुशल, अकुशल, अशा सर्व प्रकारच्या कामांचा समावेश आहे. अशाप्रकारे सरकार आता जाणीवपूर्वक दोन प्रकारच्या सरकारी काम करणाऱ्या नोकरांची निर्मिती करत आहे, एक जे सरकारी कर्मचारी म्हणवले जातील, संख्येने कमी असतील, ज्यांना चांगले पगार आणि सुविधा मिळतील आणि दुसरे, जे कंत्राटी पद्धतीने काम करतील, ज्यांना सरकारी कर्मचारी म्हटले जाणार नाही, ज्यांना कोणतीही सुरक्षितता आणि सुविधा नसतील, आणि जे किमान वेतनात कमाल राबवले जातील.

महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण 2022-23 नुसार राज्यामध्ये एकूण सरकारी पदांपैकी 2,37,000 जागा रिकाम्या आहेत. यापैकी जवळपास 1,92,000 जागा या तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कामांच्या आहेत. हे निश्चित आहे की येत्या काळात या सर्व जागांचे कंत्राटीकरण करण्याचेच सरकारचे धोरण आहे. महाराष्ट्रात आत्ताच 2,36,000 कर्मचारी कंत्राटी पद्धतीने सरकारी काम करत आहेत. देशात जवळपास 10 कोटी रोजंदारी कामगार, आणि 5 कोटी पगारदार कामगार कोणत्याही लेखी कराराशिवाय काम करत आहेत.

त्याच वेळी, युवकांना नवउद्यमी (आंतरप्रेन्युर) होण्याची दिवास्वप्ने दाखवली जात आहेत. जेव्हा की, वास्तवात 95 टक्के नव-उद्यमी कंपन्या (स्टार्टअप) वर्षभरात गाशा गुंडाळत आहेत, आणि 85 टक्के स्टार्टअप रू. 10,000 पेक्षाही कमी कमावत आहेत. भांडवली बाजारी अर्थव्यवस्था आज भयंकर आर्थिक संकटात आहे, आणि अशाप्रकारे कण्हत कुथतच ती चालू शकते हे स्पष्ट आहे.

## जनतेची दुर्दशा : भयावह महागाई

एकीकडे रोजगाराचा, नियमित व चांगल्या उत्पन्नाचा पत्ता नाही, आणि दुसरीकडे 2014 पासून सर्व वस्तूंचे भाव जवळपास दुपटीने वाढले आहेत. गॅस सिलेंडर 410 रुपयांवरून 1130 रुपयांवर, पेट्रोल 70 रुपयांवरून 105 रुपयांवर, गोडतेल 90 रुपयांवरून 200 रुपयांवर, दूध 35 रुपयांवरून 60 रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. परिणामी सामान्य माणसाच्या ताटातून एकेक वस्तू गायब होत चालली आहे!

महागाई वाढण्याचे कारण आहे मेहनत करणाऱ्यांच्या उत्पन्नात झालेली प्रचंड घट, धनाढ्यांना, भांडवलदार वर्गाला प्रचंड सवलती, साठेबाजी-सट्टेबाजीला दिलेले प्रोत्साहन, जनतेवर प्रचंड अप्रत्यक्ष करांचा बोजा आणि भांडवली अर्थव्यवस्थेची अराजकता.

नुकत्याच आलेल्या ऑक्सफॅमच्या अहवालानुसार देशातील सर्वात वरच्या 1 टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीपैकी 40 टक्के संपत्ती आहे, तर खालच्या 50 टक्के लोकांकडे फक्त 3 टक्के आहे. देशातील तीन चतुर्थांश लोक दररोज 30 ते 40 रुपयांवर जगतात. ऑक्टोबर 2022 मध्ये समोर आलेल्या जागतिक भूक निर्देशांकाच्या (ग्लोबल हंगर इंडेक्स) अहवालानुसार भारत जगातील 114 देशांपैकी 107 व्या क्रमांकावर आहे आणि भारताची स्थिती आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक गरीब देशांपेक्षाही वाईट आहे.

त्याचवेळी गेल्या दहा वर्षांत देशातील भांडवलदार घराण्यांना बेलआउट पॅकेज आणि करातील सुटींच्या मार्गाने 2.10 लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. जवळपास 10 लाख कोटी रुपयांचे कर्ज मोदी सरकारने बुडीत खात्यात टाकले आहेत आणि, आणि अशी कर्जे बुडवणाऱ्या नीरव मोदी, विजय माल्या, मेहुल चोक्सी सारख्या 40 पेक्षा जास्त उद्योगपतींना देश सोडून पळून जाण्याची मुभाही दिली आहे.

सरकारी नोकऱ्यांकरिता पैसे नाहीत अस ओरडा चालतो, परंतु उच्च पदांवर बसलेले सरकारी अधिकारी, नगरसेवक-आमदार-खासदार-मंत्री यांचे गलेलठ्ठ पगार आणि पेंशनकरिता मात्र सरकारकडे कोणतीही निधीची कमतरता नाही!

एकीकडे जनतेला उत्पन्न अत्यल्प, आणि दुसरीकडे प्रत्येक वस्तूवर प्रचंड अप्रत्यक्ष कर (जी.एस.टी, सेल्स टॅक्स, इत्यादी) लावला आहे, ज्यामुळे प्रत्येक वस्तू महागली आहे. गरजेच्या वस्तूंवरही जी.एस.टी. चे दर 18 टक्क्यांपर्यंत आहेत. पेट्रोल-डिझेल वर तर किमतीच्या निम्मी रक्कम तर करच आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेच्या उत्पन्नाचा 53 टक्के हिस्सा जीवनावश्यक वस्तूंवर खर्च होत आहे.

एकीकडे मोदी सरकार सर्वांना गॅस पुरवण्याच्या जाहिराती सर्वत्र करत आहे, पण वास्तवात मात्र जनतेच्या का हिश्श्यावर शहरात राहून चुली पेटवण्याची परिस्थिती उद्भवली आहे. या पेटणाऱ्या चुलींनी जनतेचा आक्रोश भडकवू नये, म्हणूनच आज लव्ह जिहाद, लँड जिहाद सारखे मुद्दे घेऊन भाजप-संघपरिवार धार्मिक तणाव वाढवत आहे!

## स्वस्तात राबा: हेच आहे हिंदूराष्ट्र !

संघ परिवार हिंदूराष्ट्राच्या गमजा मारण्यात थकत नाही. अयोध्येमध्ये राम मंदिर बांधून आता "रामराज्य" आले आहे असेही बोलले जात आहे. परंतु हिंदुराष्ट्र म्हणजे काय? मुस्लिमांना विरोध, त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनवणे, गैर-हिंदूंचे अधिकार काढून घेणे अशा मुद्यांवर भाजप-संघपरिवार सतत हिंदूराष्ट्राबद्दल भ्रम निर्माण करत असतो, आणि नैराश्याने घेरलेल्या कामगार-कष्टकरी वर्गाच्या एका हिश्श्यात व निम्न-भांडवलदार वर्गाच्या मनात सतत एक आभासी अभिमानाची निर्मिती करत राहतो. परंतु हा फक्त आभास आहे!

हिंदुराष्ट्र म्हणजे अजून काही नसून उद्योगपती, भांडवलदारांकरिता बहुसंख्यांक कामगार-कष्टकऱ्यांनी 12-14 तास स्वस्तात राबत राहणे, आणि मालकांना अधिकाधिक श्रीमंत करत जाणे आहे! उगीचच नाही भाजप आज भांडवलदारांचा लाडका पक्ष! भांडवलदारांनी भाजपला सतत देणग्या देऊन त्याची संपत्ती 4,000 कोटीं रुपयांच्या वर नेली आहे, आणि इतर सर्व पक्षांना मिळून दिलेल्या देणग्यांपेक्षाही जास्त देणग्या दरवर्षी भाजपला दिल्या आहेत.

या भांडवलदारांच्या राज्याकरिताच चालू आहे अभूतपूर्व असे कंत्राटीकरण जेणेकरून नोकरीतील सर्व शाश्वती संपवली जावी आणि तुम्हा-आम्हाला मालकांच्या मर्जीने कितीही तास राबवण्याची मोकळीक मिळावी! या भांडवलदारांच्या तुंबड्या भरण्यासाठीच चालू आहे त्यांना कर्जमाफी, आणि तुम्हा-आम्हावर करांचा प्रचंड बोजा! या भांडवलदारांचा नफा वाढावा याकरिताच चालू आहे रेल्वे, रस्ते, विमानतळ, खाणी, एल.आय.सी, बँका, वीज, शाळा, कॉलेज, दवाखाने, कारखाने अशा सर्व सार्वजनिक संपत्तीची खाजगीकरणाद्वारे कवडीमोल भावाने विक्री! याकरिताच टाकली जात आहेत कामगार कायद्यांमध्ये बदल करणारी पावले, जेणेकरून कामगारांना काहीच अधिकार शिल्लक राहू नयेत! याकरिताच चालू आहे शिक्षण-आरोग्य-घरांसारख्या सर्व गोष्टींमध्ये खाजगी भांडवलाला मुक्त वाव, जेणेकरून तुम्ही काय शिकावे, तुमचा इलाज व्हावा की नाही आणि तुमच्या डोक्यावर छत असावे की नाही याचा निर्णय सुद्धा मोठमोठे बिल्डर-उद्योगपती-भांडवलदारच घेऊ शकतील आणि विकासाच्या संधी फक्त मूठभरांपर्यंतच मर्यादित राहतील! या भांडवलदारांच्या राज्याकरिताच चालू आहे सतत हिंदू-मुस्लिम, उत्तर-दक्षिण भारतीय असे वाद जेणेकरून तुम्ही-आम्ही या मुद्यांमध्येच अडकून रहावे.

हिंदुराष्ट्र म्हणजे मक्तेदार भांडवलदार वर्गाची सेवा करणारी एक फॅसिस्ट हुकूमशाही सत्ता आहे, जिच्यामध्ये तुम्ही-आम्ही, महिला, पुरुष, हिंदू-मुस्लिम-शीख-ख्रिश्चन, आदिवासी, दलित, सर्वांनी 12-14 तास चुपचाप मेहनत करावी, आणि अन्न-शिक्षण-आरोग्याच्या अभावी तडफडत जीवन जगावे! धर्माच्या राजकारणाचे औषध पिऊन सर्वांनी स्मशान शांतता बाळगावी आणि सरकार करत असलेल्या भांडवलदारांच्या सेवेमध्ये विघ्न आणू नये! हिंदुराष्ट्र हे हिंदूंचे राज्य नाही, ते भांडवलदारांची नागडी हुकूमशाही आहे! हे सुद्धा विसरता कामा नये की ओवेसी असो वा अम्रितपाल, यांच्याद्वारे मुस्लीम वा शीख धर्मांच्या आधारावर, हिंदुराष्ट्राच्या विरोधात होणारे ध्रुवीकरण हे हिंदुत्ववाद्यांच्या पथ्यावर पडणारेच आहे, कारण ते सतत धार्मिक-जातीय तणावांना खतपाणीच घालण्याचे काम करते.

देश आर्थिक संकटाच्या तोंडावर उभा आहे. जगाच्या स्तरावर मंदीचे वादळ घोंघावत आहे. भांडवली व्यवस्थेच्या अंतर्गत नियमानुसारच नफ्याचा दर घसरत आहे, आणि तो टिकवण्यासाठी कामगार वर्गाचे वाढते शोषण हाच एकमेव मार्ग भांडवलदार वर्गासमोर आहे. त्यामुळेच भाजप सारख्या फॅसिस्ट पक्षांमागे ते एकमताने उभे आहेत, जेणेकरून "लोहपुरुषा"मार्फत त्यांची नग्न हुकूमशाही लागू करता यावी आणि जनतेला जात-धर्माच्या गुंगीचे औषधही पाजले जावे. तेव्हा आज कामगार-कष्टकरी वर्गाने, हिंदू-मुस्लीम-शीख अशा कोणत्याही धार्मिक प्रचाराला बळी न पडता, भांडवली व्यवस्थेविरोधात आपली वर्गजाणीव मजबूत करत संघटित होणे आणि समाजवादी समाजाच्या निर्मितीकरिता क्रांतिकारी संघर्ष उभे करणे हाच एकमेव मार्ग आहे.

# एस.टी कामगार आजही न्यायापासून वंचित का?

✎ बबन

एस.टी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण व्हावे या न्याय्य मागणीला घेऊन महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात व्यापक आणि 6 महिन्यापेक्षा जास्त दीर्घकाळ चाललेल्या एस.टी कामगारांच्या ऐतिहासिक संपाला 11 महिने पूर्ण होऊन देखील एस.टी कामगारांच्या पदरी निराशाच पडली असल्याची सार्वत्रिक स्थिती पाहायला मिळत आहे. या संबंधाने 'कामगार बिगुल' मध्ये आम्ही या अगोदर देखील वेळोवेळी दिलेले इशारे खरे ठरले आहेत. सरकारी समितीचा अहवाल विरोधातच येणार हा पहिला इशारा होता, न्यायालयाकडून विलीनीकरण मिळणार नाही हा दुसरा इशारा, तर भांडवली पक्षाच्या दावणीला बांधलेल्या युनियन्स आणि सदावर्तेसारखे भाजप-संघप्रणित व्यक्तिकेंद्री भांडवली नेतृत्व कामगारांना न्याय मिळवून देणार नाही हा तिसरा इशारा होता. हे तिन्ही इशारे तर खरे झालेच, सोबतच महाविकास आघाडी सरकारने (मविआ) चालवलेल्या आंदोलनाच्या दमनातून पुन्हा एकदा सिद्ध झाले होते की, कामगारांच्या दमनात शिवसेना-राष्ट्रवादी-कॉंग्रेस सुद्धा भाजपा किंवा 'आप' सारख्या पक्षांच्या मागे नाहीत! आता सदावर्तेचे पाठीराखे भाजप सरकार सत्तेत आल्यानंतरही कामगारांच्या पदरी निराशाच असणार आहे, कारण सदावर्तेच्या माध्यमातून फक्त निवडणुकीत मविआ विरोधात नाराजी बनवण्याचे भाजपचे उद्दिष्ट होते, जे साध्य झाले आहे.

प्रचंड त्याग आणि धैर्याने लढलेल्या या लढाईनंतरही पदरी पडलेल्या अपेक्षाभंगामागे कारण आहे सुरुवातीपासून आजपर्यंत चुकीची कार्यदिशा, योग्य राजकीय समजदारीचा अभाव, अलोकशाही प्रवृत्तीद्वारे नेतृत्व, इतर भांडवली पक्ष व भाजपबद्दलचे भ्रम, न्यायव्यवस्थेबद्दल अंधविश्वास.

एस.टी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण व्हावे या मागणीला घेऊन काम बंद आंदोलनाची घोषणा होताच महामंडळातील अठ्ठावीस भांडवली कामगार संघटनांनी माघार घेतल्यावर कामगारांनी स्वत:स्फूर्तपणे आंदोलन चालूच ठेवले. यानंतर आझाद मैदानातून 20 दिवसानंतर भाजपचे दुसऱ्या फळीतील आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी आंदोलनाला हातात घेण्याच्या प्रयत्नात अपयश आल्यावर काढला पाय घेतला. त्यानंतर अजय गुज्जर यांच्या कनिष्ट वेतन श्रेणी कामगार संघटनेने दिलेल्या पूर्वसूचना पत्रावरून आझाद मैदान येथे आंदोलन सुरू राहिले होते. त्यामुळे आंदोलनाचे नेतृत्व अनौपचारिकरित्या अजय गुज्जर यांच्याकडे आले. पुढे दीड महिन्याच्या संपानंतर सरकारच्या दबावाला बळी पडत व्यक्तिकेंद्रित नेतृत्व असलेल्या अजय गुज्जर यांनी दिल्ली येथे जाऊन शरद पवार यांची भेट घेतल्यावर आंदोलनातून माघार घेतली. याच काळात अजय गुज्जर यांच्या सांगण्यावरून आंदोलनाचे वकीलपत्र घेतलेल्या वकील गुणरत्न सदावर्ते यांच्याकडे आंदोलनाचे नेतृत्व आले. पुढे या आंदोलनाला संपवण्याचे काम करताना वकील गुणरत्न सदावर्ते यांनी निष्क्रियतेची कार्यदिशा लागू करत, "संपा"ला दुखवटा म्हणत कामगारांच्या हातातील संप करण्याच्या अधिकाराचे कामगार वर्गीय राजकीय हत्यार काढून घेतले. त्यांनी न्यायालयातून विलीनीकरण मिळवून देतो असे सांगत कामगारांना न्यायालयाच्या भरवशावर बसवून ठेवले आणि आंदोलनाला धार न आणता, सरकारचे नाक दाबण्याकडे न नेता, उलट भजन-कीर्तनात आणि निष्क्रियतेत अडकवले. न्यायालयाच्या निर्णयानंतर जेव्हा आझाद मैदानासह महाराष्ट्रभरातील कामगार मानसिक खच्चीकरणाच्या स्थितीतून जात होते त्या वेळेस आपले अपयश लपविण्यासाठी काही मुठभर कामगारांना शरद पवारांच्या घरासमोर निदर्शने करायला लावून सरकारला आंदोलनाचे पोलीसी दमन करण्याची संधी देत, संप मोडीत काढला व कामगारांना तुरुंगात जाण्यास भाग पाडले. अशाप्रकारे सदावर्तेंनी कामगारांच्या स्वत:स्फूर्त एकतेला भाजपचे राजकीय हत्यार म्हणून वापरले आणि आंदोलनाला खड्ड्यात घातले.

आता या आंदोलनाच्या अपयशांचा योग्य लेखा-जोखा मांडल्याशिवाय भविष्यात योग्य लढा उभारणे शक्य नाही.

## न्यायालयाबद्दल भ्रम

न्यायपालिकेचे काम ठरवून दिलेल्या कायद्याचे म्हणजे प्रस्थापित चौकटीचे रक्षण करणे हेच असते. विलीनीकरण हा मुद्दा मुळातच कायदे मंडळ आणि कार्यकारी मंडळाचा असल्यामुळे तो सरकारचा धोरणात्मक निर्णयच असू शकतो. अशावेळी न्यायालयाकडून ठेवलेली अपेक्षा फोल ठरणार व न्यायालयाने नेमून दिलेल्या सरकारच्या अखत्यारीतील समितीचा अहवाल देखील सरकारच्या बाजूने म्हणजे खाजगीकरणाच्या बाजूने येणार हे स्पष्टच होते. खरेतर विलीनीकरण व्हावे किंवा नाही हा प्रश्न न्यायालयासमोर कधी नव्हताच. कामगारांनी या बाबीकडे दुर्लक्ष केले व सदावर्तेसारख्या नेतृत्वाने देखील कामगारांना फसवण्याचे काम केले. आज पर्यंत न्यायालयाने कामगारांच्या हितामध्ये निर्णय दिल्याची उदाहरणे अपवादात्मकच आहेत. 1991 मध्ये लागू झालेल्या खाउजा धोरणानंतर तर अशी उदाहरणे सापडणे अधिकच मुश्किल असल्याचे दिसून येते. ज्या काळात न्यायालयाने कामगार धार्जिणे निकाल दिले आहेत, ते निकाल देखील कामगार चळवळीच्या दबाव आणि जनरेट्यामुळे देण्यात आले आहेत.

त्यामुळे एकंदरीतच वकील गुणरत्न सदावर्तेनी कामगारांना न्यायालयाबद्दल भ्रमात ठेवणे, खोटे बोलणे, संपाला दुखवट्यात बदलवणे, नेतृत्व म्हणून ठोस कार्यदिशा न लागू करता निष्क्रियतेची कार्य दिशा लागू करणे, आंदोलनाला कमजोर करणे, अप्रत्यक्षपणे भाजपचे समर्थन करत, चळवळीला पंगू बनवण्याचे काम केले आहे.

## एस.टी कामगार आंदोलनाने मूळ समस्या म्हणजे खाजगीकरण आणि भांडवलशाहीला ओळखलेच नाही

भांडवली आर्थिक व्यवस्था म्हणजे बाजाराची, माल खरेदी-विक्रीची अर्थव्यवस्था आहे, जिच्यामध्ये कामगाराची श्रमशक्ती सुद्धा माल बनून विक्रीस उपलब्ध केली जाते, आणि कामगारांना श्रमशक्तीच्या बदल्यात मजुरी दिली जाते. कामगारांच्या श्रमशक्तीच्या वापरातूनच श्रम निर्माण होते आणि श्रमातूनच सर्व मालांचे उत्पादन होते. या उत्पादनाचा एक छोटा वाटा कामगारांना मजुरीच्या रूपाने देऊन भांडवलदार-मालक वर्ग मोठा वाटा नफ्याच्या रूपाने खिशात घालतो. ही व्यवस्था अशीच चालू शकते. श्रमाच्या लुटीतूनच भांडवल जमा होते. तेव्हा भांडवलदार आणि कामगारांचे हित एक होऊच शकत नाही. अशा व्यवस्थेमध्ये कायदे आणि सरकार मिळून भांडवलदार वर्गाच्या समाईक हितांचे रक्षण करतात.

देश स्वतंत्र झाला तेव्हा देशातील भांडवलदार वर्गाकडे भांडवलाची क्षमता नगण्य होती, त्यामुळे नेहरूंच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसने जनतेच्या पैशातून "सार्वजनिक क्षेत्रात" मोठ्या गुंतवणुकीचे उद्योग उभे करण्याचे धोरण राबवले, जी देशामध्ये औद्योगिक विकासाचा पाया रचण्यासाठी भांडवलदार वर्गाचीच गरज होती. याच काळात जनतेच्या बचतीतून व कराच्या पैशातून एस. टी. सारख्या अनेक उच्च गुंतवणुकीच्या सार्वजनिक सेवा आणि उद्योग उभे केले गेले. मात्र जनतेच्या बचतीच्या पैशातून घेतलेल्या कर्जाच्या जिवावर आणि कामगारांच्या श्रमाच्या लुटीतून मोठया झालेल्या देशी भांडवलदार वर्गाला श्रमाची व नैसर्गिक साधनसंपत्तीची खुली लूट करण्याची सूट देण्यासाठी 1991 पासून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले गेले. तेव्हापासून सत्तेत आलेल्या सर्वच भांडवली पक्षांनी सार्वजनिक व्यवसाय-उद्योग-संपत्तीचे खाजगीकरण सुरू ठेवले आहे. यातून एका बाजूला सार्वजनिक क्षेत्रातील कामगार उद्ध्वस्त होत गेले तर दुसऱ्या बाजूला देशातील इतर कामगार-कष्टकऱ्यांच्या बहुसंख्येला पोषण, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, वाहतूक ह्या सुविधांपासून वंचित केले गेले आहे.

अशात एस.टी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण व्हावे ही मागणी खरेतर खातरीशीर रोजगाराची मागणी, सरकारने रोजगाराची जबाबदारी घेण्याची मागणी आहे तसेच सामान्य जनतेला माफक दरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करवण्याची मागणी आहे. याच कारणामुळे एस.टी. कामगारांचे आंदोलन हे कंत्राटीकरण, खाजगीकरणाच्या प्रस्थापित धोरणांच्या विरोधातले आंदोलन आहे.

एस.टी. ची सुविधा ही सार्वजनिक सुविधा असल्यामुळे एस. टी. चा खर्च सरकारने टॅक्सच्या पैशातूनच केला पाहिजे, आणि येथे देवाणघेवाण, नफा-तोटा अशा बाजाराच्या व्यवस्थेच्या तर्काला जागा नसली पाहिजे. परंतु बाजाराच्या व्यवस्थेच्या तर्काला बळी पडून अनेक एस.टी. कामगार संघटना सरकारचाच तर्क पुढे करत राहतात की जर एस. टी. महामंडळ अमुक इतके पैसे सरकारला कमावून देत असेल तर एस.टी. कामगारांना जास्त पगार का नकोत? असे म्हणून एकीकडे ते एस. टी. महामंडळाला नफेखोर पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या व्यवस्थेच्या रूपाने समोर आणतात, आणि दुसरीकडे इतर कामगारांच्या नियमित रोजगाराच्या अधिकाराच्या विरोधात उभे राहतात.

## धंदेबाज, भांडवली नेतृत्वाची परंपरा

कामगारांनी आजवर ज्या युनियन्सकडे आशेने पाहिले, त्यापैकी एकही युनियन खऱ्या अर्थाने कामगार वर्गीय जाणीव वाढवणारी, योग्य कामगार वर्गीय कार्यदिशा लागू करणारी नव्हती आणि या ना त्या भांडवली पक्षाच्या दावणीला बांधलेली होती. अशा युनियन्सचे वर्गचरित्र, नेतृत्वाची राजकीय आणि वैचारिक बांधिलकी न समजता, बाजारी अर्थव्यवस्थेच्या नफ्या-तोट्याच्या तर्काला बळी पडून आणि भांडवलधार्जिण्या मागण्या पुढे करून, खाजगीकरणाच्या विरोधात कोणताही निर्णायक लढा न उभारून कामगारांनी नेहमीच नेतृत्वावर अंधविश्वास ठेवला आणि वेळोवेळी धोकेबाजीलाच समोर जावे लागले. सदावर्तेच्या बाबतीतही हाच भक्तिभाव कामगारांना महाग पडला. भाजपधार्जिण्या भूमिका घेणाऱ्या परंतु स्वत:ची अराजकीय प्रतिमा बनवू पाहणाऱ्या, जय श्रीराम, एक मराठा लाख मराठा, आणि जयभीम सारखे विरोधाभासी नारे एकत्र देत कामगारांना फक्त अस्मितावादी प्रतीकांमध्ये अडकवू पाहणाऱ्या, राणा भीमदेवी घोषणा आणि अति-आत्मविश्वासपूर्वक छातीठोक भाषणे करत असताना कामगारांना तथ्य आणि तर्काच्या आधारावर कधीच शिक्षित न करणाऱ्या, एकतर्फी निर्णय घेत लोकशाही प्रक्रिया न पाळणाऱ्या या वकिलांना आंदोलनाचे नेतृत्व देणे ही त्याच जुन्या चुकांची पुनरावृत्ती होती. आज कामगारांचा एक गट या फसवणुकीला समजू लागलेला असला, तरी भाजपाई-संघी विचारधारेला बळी पडलेल्या आणि स्वत:च्याच वर्गहिताविरोधात वागणाऱ्या, तसेच अजूनही वास्तवाचे भान न आलेल्या कामगारांची एक संख्या अजूनही सदावर्तेवर अंधविश्वास ठेवून आहे.

दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्रातील एका गटाकडून बनवण्यात आलेल्या 'सेवा, शक्ती, संघर्ष एस.टी कर्मचारी संघ' या संघटनेने देखील चुकीच्या नेतृत्वाच्या परंपरेत भरच घातली आहे. ही संघटना भाजपच्या दुसऱ्या फळीतील आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वात बनली आहे, आणि त्यामुळेच खाजगीकरणाचे, भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या भाजपच्या या नेत्यांकडून कोणतीही आशा ठेवणे ही फक्त स्वत:ची फसवणूक आहे.

## भाजपचे सरकार आहे मग विलीनीकरण का नाही?

एस. टी. कामगार आंदोलनात सुरुवातीला भाजपच्या दुसऱ्या फळीतील आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत हे आझाद मैदान येथे तळ ठोकून बसले होते. जेव्हा सरकारकडून वाटाघाटीसाठी प्रस्ताव आला त्यावेळी यांच्या पुढाकाराने अंतरिम पगारवाढ देण्याचे ठरले होते, पण कामगारांनी अंतरिम पगारवाढ नाकारत विलीनीकरणाच्या मुद्द्यावर संप ठामपणे चालू ठेवला. विलीनीकरण ही मागणी वरवर पाहता जरी आर्थिक मागणी वाटत असली तरी मुळातच ही मागणी सरकारच्या धोरणांना आव्हान देणारी होती. ही बाब लक्षात येताच आंदोलनाला थोडक्या आर्थिक मागण्यावर फसवून राजकीय श्रेय घेऊ पाहणाऱ्या या दोन्ही आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी काढता पाय घेत मैदानावरून पळ काढला होता. संप काळात काळात विधीमंडळाच्या अधिवेशनात देखील त्रिसदस्यीय अहवाल नकारात्मक का आला? असा कोणताच प्रश्न विरोधी पक्षात असलेल्या भाजपने उचलला नव्हता. भाजप विरोधी पक्षात किंवा सत्तेत असताना अजून देखील जाहीर करत नाही की, आम्ही एस.टी. चे राज्यशासनात विलीनीकरण करू किंवा सातवा वेतन आयोग लागू करू. यावरून ही स्पष्ट होते की विरोधी पक्ष आणि सत्ताधारी या दोघांची देखील विलीनीकरण किंवा सातवा वेतन आयोग मान्य करायचा नाही हीच भूमिका राहिली आहे.

## एस.टी कामगार आंदोलनाने सर्वच भांडवली पक्षाचे चरित्र पुन्हा एकदा उघड झाले

एस.टी कामगारांच्या संपानिमित्त सर्वच भांडवली पक्षांचे खरे चरित्र पुन्हा एकदा उघडे पडल्याचे दिसून आले होते. या संपादरम्यान भाजप, कॉंग्रेस, शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी या पक्षांनी केलेले वक्तव्य आणि घेतलेल्या आणि "न घेतलेल्या" भूमिका लक्षात घेता या बाबीला स्पष्ट करण्यासाठी पुरेशा आहेत की, सर्वच भांडवली पक्ष हे सापनाथ-नागनाथ आहेत. ह्यांचे दाखवायचे दात वेगळे पण खायचे विषारी दात वेगळे आहेत. सर्वात अगोदर हे लक्षात

पान 10 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका -3

## काही मूलभूत संकल्पना ज्या समजून घेणे आवश्यक आहे -2

अभिनव

गेल्या वेळी आपण काही मूलभूत संकल्पना समजून घेण्यापासून सुरुवात केली जसे की उत्पादक शक्ती, उत्पादन संबंध, मूलाधार किंवा आर्थिक पाया, अधिरचना इत्यादी. सोबतच आपण हे सुद्धा जाणून घेतले की आर्थिक पायामधील मूलभूत अंतर्विरोध काय आहे, अधिरचनेमध्ये मूलभूत अंतर्विरोध काय आहे तसेच आर्थिक पाया आणि अधिरचना यांच्यातील अंतर्विरोध संपूर्ण मानवी समाजाच्या गतीला कसा व्याख्यायित करतो. आपण हे सुद्धा समजून घेतले की आर्थिक आधारामध्ये अंतर्भूत असलेला आर्थिक अंतर्विरोध हा समाजाचा मूलभूत अंतर्विरोध आहे आणि या अंतर्विरोधाच्या स्वरूपावरूनच समाजाचे चरित्र निर्धारित होते आणि हा मूलभूत अंतर्विरोध जेव्हा स्वतःला वर्गीय स्वरूपात अभिव्यक्त करतो तेव्हा तो वर्गसंघर्षाच्या स्वरूपात प्रकट होतो आणि तीच इतिहास किंवा समाजाला गती देणारी तत्काळ प्रेरक शक्ती आहे. या वेळी आपण निसर्ग आणि समाजाबद्दल मानवी ज्ञान कसे विकसित होते हे समजून घेण्याचा प्रयत्न करू.

हे समजून घेणे का महत्त्वाचे आहे? हे समजून घेणे महत्त्वाचे आहे कारण गोष्टी बदलण्यासाठी गोष्टी समजून घेणे आवश्यक असते. कामगार-कष्टकरी लोकांच्या शोषण आणि अत्याचारावर आधारित समाज बदलायचा असेल तर विद्यमान समाज समजून घ्यावा लागेल, त्याच्या इतिहासाचे ज्ञान मिळवावे लागेल. निसर्गाला बदलण्यासाठी सुद्धा ही बाब लागू होते. त्याचप्रमाणे समाज आणि निसर्ग बदलण्याचा प्रयत्न केल्याशिवाय, त्याच्याशी थेट भिडल्याशिवाय त्याला जाणून घेता येऊ शकत नाही. म्हणूनच, निसर्गाच्या क्रांतिकारी परिवर्तनाचा प्रश्न असो किंवा समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाचा प्रश्न असो, त्याबद्दलच्या आपल्या ज्ञानाच्या विकासाची प्रक्रिया सखोलपणे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. यावेळी आपण याच विषयावर चर्चा करणार आहोत.

### ज्ञानाकडे बघण्याचा कामगार वर्गाचा वैज्ञानिक दृष्टीकोन

माणसाचे ज्ञान निसर्गाविषयी असू शकते, ते समाजाबद्दल असू शकते किंवा विचारांबद्दल असू शकते. समाज हा निसर्गाचाच विस्तार आहे. निसर्गाच्या विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावरच जीवनाचा विकास झाला. जीवसृष्टीच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतच मानवी प्रजातींची उत्पत्ती आणि उत्क्रांती झाली. माणसाच्या विकासाबरोबरच विचारही प्रगत अवस्थेपर्यंत विकसित झाला. अशाप्रकारे निसर्ग, समाज आणि विचारांच्या क्षेत्राच्या विकासात सामान्यपणे निसर्गाचा पैलू मूलभूत आहे. आपल्या समोरील अस्तित्वात असलेल्या संपूर्ण भौतिक जगाचे किंवा वास्तवाचे हे तीनच भाग आहेत: निसर्ग, त्याचा विस्तार म्हणून समाज आणि या दोन्हींच्या विस्ताराच्या स्वरूपात विचार. आपले संपूर्ण वास्तव या तीन भागांमध्येच आहे. त्यामुळे आपले ज्ञानसुद्धा या तीन पैलूंच्या संदर्भातच विकसित होते.

आम्ही वर म्हटले आहे की गोष्टी बदलण्यासाठी गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. पण गोष्टींना कसे समजले जाते? विद्वान माणसे त्यांच्या अभ्यास कक्षात निसर्ग आणि समाज तसेच विचारविश्वाचे ज्ञान निर्माण करतात का? ज्ञान आकाशातून टपकते का? म्हणजेच, ज्ञानाला जन्म देणारी या भौतिक जगताच्या वर कोणती दैवी शक्ती आहे का? काही लोकांचा असा विश्वास होता की ज्ञानाची निर्मिती माणसाच्या मनातून होते. ह्या लोकांचा असा विश्वास होता की ज्ञानाचा जन्म माणसाच्या मेंदूत होतो. इतरांचा असा विश्वास आहे की जग हे खरे तर देवाचे किंवा कुठल्यातरी दैवी कल्पनेचेच प्रकटीकरण आहे आणि प्रत्येक गोष्टीबद्दलचे ज्ञान हे कुठल्यातरी दैवी कायद्याने पूर्वनिर्धारित आहे आणि आपल्याला फक्त ते धार्मिक किंवा आध्यात्मिक नियम समजून घेणे आवश्यक आहे आणि नंतर आपण प्रत्येक गोष्टीबद्दल ज्ञान प्राप्त करू शकतो. जे ज्ञानाला मानवी मेंदूची उत्पत्ती मानतात त्यांना 'मनोगत भाववादी' म्हणतात. जे ज्ञानाचा स्रोत कुठल्यातरी अशा दैवी किंवा आध्यात्मिक सत्तेला मानतात जी या भौतिक जगाच्या आधीपासून आणि त्याच्यापलीकडे अस्तित्वात होती त्यांना 'वस्तुनिष्ठ भाववादी' म्हणतात. हे दोघेही भाववादी विचारसरणीवर विश्वास ठेवतात: म्हणजेच ते भौतिक वास्तवाला मूलभूत आणि प्राथमिक मानत नाहीत, परंतु कल्पनांना प्राथमिक मानतात. पहिला या विचाराचा उगम माणसाच्या मेंदूला मानतो, तर दुसरा या विचाराचा उगम ईश्वर किंवा अध्यात्मात बघतो.

ज्ञानाचा जन्म कुठून आणि कसा होतो हे भाववादी विचारसरणी सांगू शकत नाही. कामगार वर्गाचा दृष्टीकोन भौतिकवादी आहे. भौतिकवादी दृष्टिकोन हाच योग्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. ज्ञानाचा भौतिकवादी दृष्टिकोन काय आहे?

भौतिकवादी दृष्टिकोन स्पष्टपणे सांगतो की विचार हे भौतिक पदार्थापासून वेगळे आणि त्यापासून स्वतंत्र अस्तित्वात नसतात. याउलट, विचार हा पदार्थाच्या विकासाच्याच प्रगत अवस्थेचा एक गुण आहे, म्हणजेच तो मेंदूचा एक गुण आहे. या मेंदूचा जन्म होण्यापूर्वी विचारांचे कुठलेही अस्तित्व नव्हते. भौतिक वास्तव चेतनेच्या बाहेर आणि स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे आणि चेतना हे याच भौतिक वास्तवाचे प्रतिबिंब किंवा सावली असते (खरे किंवा खोटे, किंवा अंशतः खरे किंवा खोटे). उदाहरणार्थ, तुम्ही सिंह पाहिला नसला तरीही सिंहाचे अस्तित्व आहे! सिंह तुम्ही पाहता म्हणून जन्माला येत नाही, तर सिंह असतो म्हणून तुम्ही त्याला बघू शकता आणि त्याबाबत तुमचे ज्ञान जन्माला येते!

पण कामगार वर्ग हा ज्ञानाबाबत केवळ भौतिकवादी नसून तो द्वंद्ववादीही आहे. याचा अर्थ काय?

याचा अर्थ हा आहे की जग जाणून घेणे आणि बदलणे हे एकमेकांशी निगडीत आहे. जग बदलल्याशिवाय जग ओळखले जाऊ शकत नाही आणि त्याला जाणून घेतल्याशिवाय योजनाबद्धपणे त्याला बदलताही येत नाही. काही लोकांचा असा विश्वास आहे की जगाचे म्हणजेच भौतिक वास्तवाचे विचारांपासून स्वतंत्र अस्तित्व तर आहे, परंतु ते जाणून घेणे शक्य नाही कारण आपले डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा इत्यादी इंद्रिये आपल्याला जगाबद्दल अचूकपणे सांगत आहेत की नाही याची खात्री करण्याचा काही मार्ग नाही. अशा लोकांना अज्ञेयवादी म्हणतात. त्यांना अस्तित्व आणि चेतनेचे ऐक्य समजत नाही. 'अज्ञेय' म्हणजे जे जाणता येत नाही असे. परंतु कामगार वर्गाचे तत्त्वज्ञान अज्ञेयवादाला विरोध करते आणि जगाला जाणून घेता येते असे सांगते. जगाविषयीचे आपले ज्ञान बरोबर आहे की नाही याची कसोटीही व्यवहारच असते. एका अज्ञेयवादी तत्त्ववेत्त्याने विचारले: "माझे डोळे मला सांगतात की माझ्यासमोर एक सफरचंद आहे, पण ते सफरचंदच आहे हे मी खात्रीशीरपणे कसे मानू? माझे इंद्रिय म्हणजे डोळे मला बरोबर सांगत आहेत याची खात्री काय? कामगार वर्गाच्या तत्त्वज्ञानाने उत्तर दिले: "सफरचंद खा आणि त्याचा आकार बदला, तुम्हाला कळून जाईल की ते सफरचंद आहे की नाही!" कामगार वर्ग अज्ञेयवादाच्या विपरीत, जग ओळखले जाऊ शकते असा विश्वास ठेवतो. पण कामगार वर्गाचा असाही विश्वास आहे की जग सतत गतिमान आहे आणि ते पाहण्यासाठी आपल्या इंद्रियांच्यासुद्धा काही मर्यादा आहेत. त्यामुळे आपले ज्ञान नेहमीच अपूर्ण, सापेक्ष आणि सतत गतिमान असते हे कामगार वर्ग जाणतो. म्हणून निरपेक्ष ज्ञान वेगळे काही नसून केवळ सापेक्ष ज्ञानांची अनंत मालिका असते. अज्ञेयवादी लोक भौतिक जग आणि त्याबद्दलचे ज्ञान यांच्यातील संबंध तोडून टाकतात, त्यांची एकता समजून घेत नाहीत.

त्याच वेळी, असेही काही लोक आहेत जे मुळात जगाला अपरिवर्तनीय मानतात. ते मानतात की जगातील सर्व बदल संख्यात्मक आहेत, म्हणजेच ते वाढण्याच्या किंवा कमी होण्याच्या रूपात किंवा फक्त त्यांच्या स्थितीतील बदलाच्या रूपात घडतात. ज्याअर्थी त्यांच्यासाठी पदार्थात काही गुणात्मक बदल होत नाहीत त्यामुळे जग त्यांच्यासाठी गतिमान नसते आणि त्याबद्दलचे ज्ञानही गतिमान नसते. अशा लोकांना अधिभूतवादी (metaphysical) म्हणतात. म्हणजेच ते लोक जे गुणात्मक बदल आणि गतिमानतेवर विश्वास ठेवत नाहीत आणि संख्यात्मक परिवर्तनालासुद्धा ते गोष्टींमधील अंतर्गत विरोधाभासाऐवजी बाह्य शक्तींना जबाबदार मानतात.

पण सत्य हे आहे की जगातील प्रत्येक गोष्ट तिच्यामधील आंतरिक अंतर्विरोधाने बनलेली आहे आणि त्या आंतरिक अंतर्विरोधाने सतत गतिमान आहे. आणि त्याचप्रमाणे सर्व गोष्टींबद्दलचे ज्ञान देखील सतत गतिमान आहे, स्थिर नव्हे. आपण कोणत्याही गोष्टीबद्दल कुठलेही अंतिम निरपेक्ष सत्य शोधू शकत नाही आणि जर काही अंतिम निरपेक्ष सत्य असेलच तर ते फक्त हेच की सर्व काही गतीमध्ये आहे आणि त्याबद्दल मानवी ज्ञान देखील सतत गतिमान आहे.

आता आपल्या मूळ प्रश्नाकडे परत येऊ: शेवटी मानवी ज्ञान कसे विकसित होते? जसे आम्ही आधी म्हटले आहे की जर काही बदलायचे असेल तर ते जाणून घेणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, कामगार वर्गाच्या शोषणावर आधारित विद्यमान भांडवली समाज बदलायचा असेल तर तो समजून घेतला पाहिजे. पण समजून घेण्याचे काम अभ्यासखोलीत बसून करता येत नाही, जरी जाणून घेण्याच्या प्रक्रियेत अभ्यासाचे महत्त्वही खूप मूलभूत आहे. पुढे आपण बघूयात, का आणि कसे?

गोष्टी जाणून घेण्यासाठी त्यांच्या संपर्कात येणे आवश्यक आहे. निश्चितच आज आपल्याला जगातील विविध गोष्टींबद्दल, लोकांबद्दल, ठिकाणांबद्दल सर्व माहिती पुस्तकांतून, दूरचित्रवाणीवरून, रेडिओवरून, वर्तमानपत्रांमधून (जरी भांडवलदार वर्गाच्या ताब्यातील मीडियाची ही विविध रूपे ज्ञानापेक्षा जास्त अज्ञानच पसरवणारी आहेत) मिळू शकते. आपल्यासाठी हे अप्रत्यक्ष ज्ञान आहे. परंतु आपल्यासाठी जे अप्रत्यक्ष ज्ञान आहे, म्हणजेच जे आपल्याला या गोष्टी, लोक, ठिकाणे इत्यादींच्या संपर्कात आल्याने मिळालेले नाही, ते देखील कुणाचेतरी प्रत्यक्ष ज्ञानच आहे. असे कोणतेही ज्ञान असू शकत नाही जे एखाद्याचे प्रत्यक्ष ज्ञान नसेल, मग ते वस्तूंचे असो, व्यक्तींचे असो अथवा ठिकाणांचे असो. खरं तर, कोणत्याही वस्तू किंवा प्रक्रियेबद्दल कोणतेही ज्ञान हे मुळात प्रत्यक्ष ज्ञानच असते, जरी ते विविध माध्यमांद्वारे आपल्यापर्यंत अप्रत्यक्षपणे पोहोचले असले तरीही. म्हणूनच ज्ञानाचा स्रोत हा सामाजिक व्यवहार आहे. जेव्हा मनुष्य आपल्या जीवनासाठीच्या उत्पादन आणि पुनरुत्पादनासाठी निसर्गाच्या संपर्कात येतो, जेव्हा तो समाजाच्या वर्गसंघर्षात जाणीवपूर्वक किंवा नकळत सहभागी होतो आणि जेव्हा तो विचारांतील परिवर्तनासाठी वैज्ञानिक प्रयोग करतो तेव्हाच तो निसर्ग, समाज आणि विचार जगताबद्दल आपले ज्ञान निर्माण आणि विकसित करू शकतो. याशिवाय जग जाणून घेण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

जेव्हा मनुष्य आपल्या जीवनाच्या उत्पादन आणि पुनरुत्पादनाच्या भौतिक गरजा आणि पूर्वअटी पूर्ण करण्यासाठी निसर्गात परिवर्तन करतो (कारण उत्पादन हे मुळात निसर्गाच्या परिवर्तनानेच शक्य आहे) तेव्हा तो निसर्गाबद्दलचे त्याचे ज्ञान टप्प्याटप्प्याने विकसित करत जातो. शेतीविषयीच्या ज्ञानाची सुरुवात शेतीपासून होते, शेतीविषयी लिहिलेल्या पुस्तकांतून नव्हे! सर्व वस्तू बनवण्याचे ज्ञान देखील उत्पादनाच्या प्रक्रियेतून म्हणजेच निसर्गासोबत आंतरक्रियेच्या प्रक्रियेतून जन्माला येते, मग त्या वस्तू धातू, लाकूड, खनिजे अथवा रसायने इत्यादी कशानेही बनलेल्या असू द्या, कारण प्रत्येक उत्पादनाच्या निर्मितीसाठी कच्चा माल आपल्याला निसर्गापासूनच मिळतो. आजच्या युगात काही अशी उत्पादने बनवली जात आहेत, जी काही उपयुक्त सेवा किंवा परिणामाच्या रूपात आहेत आणि ज्यांना स्पर्श करता येत नाही, त्यांचे उत्पादनही निसर्गाशी आंतरक्रिया साधल्याशिवाय शक्य नाही, जरी ते प्रत्यक्षपणे तसे दिसत नसले तरीही. उदाहरणार्थ, संगणक सॉफ्टवेअर. परंतु संगणक सॉफ्टवेअर बनवण्यासाठी संगणक हार्डवेअर देखील आवश्यक असते, ज्याच्या निर्मितीसाठी विविध स्वरूपाचा कच्चा माल आवश्यक असतो, जो मुळात निसर्गाकडूनच प्राप्त केला जातो. जसजसे उत्पादन विकसित होते, तसतसे माणसाचे निसर्गाबद्दलचे ज्ञान विकसित होते. त्यामुळेच भौतिक वास्तवाच्या मूलभूत पैलूचे, म्हणजेच निसर्गाबद्दलचे मनुष्याचे ज्ञान सामाजिक व्यवहाराच्या मूलभूत स्वरूपातून, म्हणजे उत्पादनासाठीच्या संघर्षातून तयार होते आणि विकसित होते.

परंतु उत्पादनाच्या विकासासोबत समाजही नवीन टप्प्यात प्रवेश करतो. जेव्हा उत्पादन कमी प्रमाणात विकसित होते आणि आदिम जमाती शिकार करून आणि कंदमुळे गोळा करून आणि थोडीशी लागवड करून जमातीच्या सर्व सदस्यांसाठी जेमतेम पुरेल एवढेच अन्न तयार करू शकत होत्या, तेव्हा त्यांच्यामध्ये कोणतेही वर्ग जन्माला येऊ शकत नव्हते. काही लोक उत्पादनाच्या मोठ्या हिश्श्यावर ताबा तेव्हाच घेऊ शकतात जेव्हा सामाजिक वरकड (अधिशेष) निर्माण होण्याइतपत उत्पादन होत असेल. सामाजिक वरकड म्हणजे उत्पादनाची ती मात्रा जी उत्पादन साधनांच्या

पान 9 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका -3

पान 8 वरून

आणि श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी खर्च झाल्यानंतर शिल्लक राहते. अशा वेळी मुठभर लोक या अतिरिक्त उत्पादनावर त्यांचे नियंत्रण स्थापित करतात आणि नंतर मालकी स्थापित करतात आणि याच्या आधारावर कालांतराने ते उत्पादक श्रमापासून स्वतःला वेगळे करतात.

ज्यांचे सामाजिक अधिशेषावर म्हणजे वरकड उत्पादनावर नियंत्रण आहे ते हळूहळू उत्पादनाची साधने आणि जमिनीचेसुद्धा खाजगी मालमत्तेत रूपांतर करण्यात यशस्वी होतात. उत्पादन साधनांच्या मोठ्या हिश्श्यावर ज्यांचे नियंत्रण आणि मालकी असते आणि ज्यांच्याकडे सामाजिक अधिशेषाचा ताबा असतो तेच समाजात शासक वर्गाचे रूप घेतात. उर्वरित लोकसंख्या शासित लोकसंख्या असते, ज्यामध्ये प्रत्यक्ष उत्पादक वर्ग आणि मधले असे वर्ग समाविष्ट असतात जे प्रत्यक्ष शासक वर्गही नाहीत आणि प्रत्यक्ष उत्पादनातसुद्धा गुंतलेले नाहीत, परंतु बौद्धिक आणि इतर प्रकारच्या व्यवसायांमध्ये गुंतलेले आहेत किंवा ते शासक वर्गाचे सहायक आहेत. उत्पादक शक्तींच्या विकासासह अतिरिक्त उत्पादनाशिवाय समाजाचे वर्गांमध्ये विभाजन होणे शक्य नाही. जेव्हा समाजात वर्ग निर्माण होतात, तेव्हा शासक वर्गाला आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी एका साधनाची आवश्यकता असते, जे शासित वर्गांना जोरजबरदस्तीने आपल्या ताब्यात ठेऊ शकेल आणि त्याच वेळी त्यांच्यावर वैचारिक प्रभाव प्रस्थापित करण्याची भूमिका बजावेल. अशा पद्धतीने लष्कर, सशस्त्र दल, पोलीस, नोकरशाही, न्यायव्यवस्था इत्यादी अस्तित्वात येतात. या संस्थांना एकत्रितपणे राज्यसत्ता म्हणतात. म्हणून, उत्पादक वर्गाद्वारे निसर्गाच्या रूपांतरणासह उत्पादक शक्तींचा विकास जसजसा होतो आणि आणि जसजसे उत्पादन वाढते आणि सामाजिक अधिशेष निर्मितीच्या टप्प्यावर पोहोचते, तसतसे वर्गांच्या उदयाची प्रक्रिया सुरू होते, वर्ग समाज अस्तित्वात येतो, वर्ग संघर्ष सुरू होतो आणि राज्यसत्ता उदयास येते.

वर्गसंघर्षात सहभागी होऊन, शासक वर्ग आणि शासित वर्ग समाजाबद्दलचे त्यांचे ज्ञान विकसित करतात. स्पष्ट आहे की या ज्ञानाचे सरळ सरळ एक वर्ग चरित्र असते. शासक वर्गाचे "ज्ञान" खरेतर सत्य लपवण्याचे काम करते म्हणजे ते विचारधारात्मक असते, कारण त्यांचे हित शोषण, अत्याचार, अन्याय आणि असमानता यांना चालू ठेवण्यात आहे. याउलट, कामगार वर्गाचे समाजाबद्दलचे ज्ञान सत्याचे प्रतिनिधित्व करते कारण त्याचे हित शोषण, अत्याचार, अन्याय आणि विषमता संपवण्यात आहे आणि म्हणूनच ते वैज्ञानिक आहे. यामुळेच सर्वहारा वर्ग समाजाबाबत सुद्धा खऱ्या अर्थाने ज्ञानाची प्राप्ती वर्ग संघर्षाद्वारेच करतो. केवळ सर्वहारा वर्गच हे करू शकतो कारण तो उत्पादनाच्या सर्व साधनांपासून वंचित असतो, "दुहेरी अर्थाने मुक्त" (म्हणजे कोणत्याही भांडवलदाराला आपली श्रमशक्ती विकण्यास मुक्त आणि उत्पादनाच्या साधनांपासून मुक्त!) असतो, उन्नत औद्योगिक उत्पादनात लागलेला असतो, मोठ्या प्रमाणावरील सामाजिक उत्पादनात लागलेला असतो, आणि त्याच्यामध्ये संकुचित बौद्धिक सीमा ओलांडण्याची क्षमता असते. ज्याचे अतिरिक्त श्रम हडप करून भांडवलदार वर्ग नफा कमावतो तो सर्वहारा वर्गच असतो आणि हाच नफा भांडवलदार वर्ग आणि भांडवली समाजाचा आधार असतो. पण सर्वहारा वर्गाच्या पूर्वीही त्या त्या युगात आणि त्या त्या वर्गांच्या प्रकृतीच्या मर्यादांमध्ये शोषक आणि सत्ताधारी वर्गाविरुद्ध शोषित आणि दमित वर्गाचे बंड आणि त्यांच्या विरोधात त्यांचा वर्गसंघर्ष हाच समाजाबद्दल ज्ञानाचा स्रोत राहिला आहे.

सर्वहारा वर्ग हा, पहिल्या जागतिक आणि सर्वात गतिमान उत्पादन पद्धतीसह म्हणजेच, भांडवलशाहीसह अस्तित्वात येतो, आणि म्हणूनच तो इतिहासातील सर्वात क्रांतिकारी वर्ग आहे कारण सर्व प्रकारच्या खाजगी मालमत्तेपासून वंचित असल्याकारणाने त्याच्यात एक सार्वभौमिकता आहे आणि खाजगी मालमत्तेची व्यवस्था नष्ट करून सामूहिक मालकीवर आधारित एक जास्त वैज्ञानिक व्यवस्था म्हणजेच समाजवादाची स्थापना करण्यासाठी व्यापक कष्टकरी जनतेला नेतृत्व देण्याचे काम तोच करू शकतो. पण त्याआधी गुलाम, शेतकरी, कारागीर यांनी आपापल्या कालखंडात आणि एका युगात विशेषतः क्रांतिकारी भांडवलदार वर्गाच्या वर्गसंघर्षांनीही त्यांच्या कालखंडाच्या मर्यादेत ज्ञान विकसित केले. सर्वहारा वर्ग हा या संपूर्ण ज्ञानाचा खरा वारस आहे आणि तो वर्ग पूर्वाग्रह किंवा संकुचित मर्यादा नाकारून त्याचा अधिक विकास करू शकतो. आज भांडवलदार वर्गाने शासक आणि जुलमी वर्ग बनण्यासोबतच ती क्रांतिकारी भूमिका गमावलेली आहे जी त्याच्यामध्ये स्वतः एक शासित वर्ग असताना सरंजामशाहीशी लढेपर्यंत होती. जेव्हा तो स्वतःच सत्ताधारी वर्ग बनला तेव्हा तो स्वतःच एक अत्याचारी आणि अत्याचार करणारा वर्ग बनला आणि आता तो समाज आणि त्याबद्दलचे ज्ञान पुढे नेण्याचा अभिकर्ता (एजंट) राहिलेला नाही, तर यथास्थिती कायम ठेवणारा, म्हणजेच इतिहासाला मागे नेणारा बनलेला आहे, म्हणजेच तो एक प्रतिगामी शक्ती बनला आहे.

आज समाजाला आणि त्याबद्दलच्या ज्ञानाला विकसित करण्याचे कार्य इतिहासातील सर्वात क्रांतिकारी वर्ग म्हणजे सर्वहारा वर्गच त्याच्या वर्गसंघर्षातून करू शकतो. तथापि, इतके स्पष्ट आहे की ज्ञानाचा दुसरा सर्वात महत्त्वाचा स्रोत म्हणजे सामाजिक व्यवहाराचे हे दुसरे स्वरूप वर्ग संघर्ष होय. वर्गसंघर्ष हा केवळ आर्थिक स्वरूपातच घडत नाही, तर राजकीय आणि वैचारिक स्वरूपातही घडत असतो आणि वर्गसंघर्षाची ही तिन्ही रूपे एकमेकांशी नाळबध्द असली तरी समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनासाठी राजकीय आणि वैचारिक संघर्षाला विशेष महत्त्व असते. ज्ञानाचे हे स्वरूप समाजाच्या परिवर्तनासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षासोबतच विकसित होऊ शकते आणि पालटून हे ज्ञान समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाला मार्गदर्शन करू शकते आणि या प्रक्रियेत ते सतत उच्च स्तरावर विकसित होऊ शकते.

याशिवाय माणूस आपल्या वैज्ञानिक प्रयोगातून आपल्या विचारांच्या जगात क्रांती घडवून आणतो. हे वैज्ञानिक प्रयोग केवळ विज्ञान-प्रयोगशाळांमध्येच होत नाहीत, तर स्वतः उत्पादन प्रक्रियेत आणि वर्गसंघर्षातही होतात. वैज्ञानिक प्रयोग हे वास्तवात विचारांच्या क्रांतिकारी परिवर्तनासाठी असतात. उदाहरणार्थ, समाजवादी रशियामध्ये जेव्हा कामगारांची सत्ता प्रस्थापित झाली तेव्हा तेथील कामगारांनी भांडवली तज्ज्ञांच्या प्रयोग आणि उत्पादनाला तांत्रिक रूपाने विकसित करण्याच्या मक्तेदारीला आव्हान दिले आणि हे काम स्वतःच्या हातात घेतले. अशा प्रकारे कामगारांनी उत्पादनात अस्तित्वात असलेल्या भांडवली श्रम विभागणीवर आणि मानसिक आणि शारीरिक श्रमांच्या विभागणीवर हल्ला केला. उत्पादनासाठी सुरू असलेल्या संघर्षात हा एक वैज्ञानिक प्रयोग होता ज्याने कामगारांची चेतना उन्नत केली. चीनमध्येही चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या आणि विशेषत: माओच्या नेतृत्वाखाली कामगार वर्ग आणि गरीब शेतकऱ्यांनी उत्पादन प्रक्रियेत मोठे वैज्ञानिक प्रयोग केले आणि शेती आणि उद्योगाच्या उत्पादनात ताचाई आणि ताचिंगसारखे प्रयोग उभे केले. याने केवळ झपाट्याने उत्पादकता वाढवली एवढेच नाही तर प्रयोग आणि नवनिर्मिती यातील भांडवली तज्ञ आणि बुद्धिजीवी यांच्या मक्तेदारीवर हल्ला करून मानसिक आणि शारीरिक श्रमांच्या विभागणीवर हल्ला केला. त्याचप्रमाणे समाजात सुरू असलेल्या वर्गसंघर्षात सर्वहारा वर्गाने अनेक प्रयोग केले, त्यात कामगार समित्यांची स्थापना, सोव्हिएत संघटित करणे, कम्युनची स्थापना करणे इ. आहेत. वर्गसंघर्षातील या वैज्ञानिक प्रयोगांनी सर्वहारा वर्गाच्या विचारांमध्ये क्रांती घडवून आणली. समाजवादी समाजात, वैज्ञानिक प्रयोगांच्या प्रक्रियेत कामगार-कष्टकरी वर्गाचा सहभाग वाढतो आणि वैज्ञानिक प्रयोग हे जनसमुदायाच्या कक्षेत येतात, कारण आता कामगार वर्ग आणि कष्टकरी लोकांनाही वैज्ञानिक प्रयोगांमध्ये सहभागी होण्यासाठी वेळ उपलब्ध होतो. ते भांडवली शोषण, अत्याचार आणि भांडवलदारांच्या नफ्यासाठी 10-12 तास कंबरतोड मेहनत करण्यापासून मुक्त होतात. त्यांच्याकडे आता या वैज्ञानिक प्रयोगांसाठी वेळ, इच्छा आणि सर्जनशीलता असते. आता त्यांना हे माहीत असते की एक वर्ग म्हणून त्यांचा देशाच्या संपूर्ण संपत्तीवर सामूहिक अधिकार आहे आणि तो भांडवलदारांच्या हुकुमाच्या अधीन नाही.

पण भांडवलशाही समाजात एक वर्ग म्हणून कामगार वर्ग आणि एक समूह म्हणून संपूर्ण कष्टकरी जनता वैज्ञानिक प्रयोगांमध्ये सहभागी होऊ शकत नाही कारण भांडवलशाही समाजातील सामान्य कष्टकरी लोकसंख्येचे जीवन असे नसते की ते वैज्ञानिक प्रयोगांमध्ये सहभागी होऊ शकतील, ते मग उत्पादनाच्या प्रक्रियेतील असोत, वर्ग संघर्षातील असोत किंवा वैज्ञानिक प्रयोगशाळांमधील असोत. भांडवलशाही समाजात वैज्ञानिक प्रयोगामध्ये एकतर भांडवली आणि निम्न-भांडवली बुद्धिजीवी किंवा कामगार वर्गाचा पक्ष भागीदारी करतात. जेथपर्यंत भांडवली बुद्धिजीवींचा संबंध आहे, ते भांडवलदार वर्गाची सेवा करतात आणि वैज्ञानिक प्रयोगही ते भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच करतात आणि त्यांच्या पैशावर गुजराण करत करतात. जेथपर्यंत निम्न-भांडवली आणि मध्यमवर्गीय बुद्धिजीवींचा संबंध आहे, ते सामान्यतः व्यक्तिवादाचे शिकार आहेत. कामगार वर्गाची ताकद त्याची सामूहिकता असते. भांडवली समाजात वैयक्तिक कामगाराची कोणतीही शक्ती नसते आणि केवळ त्याच्या एकता आणि संघटनेच्या बळावरच तो भांडवलदार वर्ग आणि त्याच्या राज्यसत्तेवर विजय मिळवू शकतो. पण बुद्धिजीवी व्यक्तीचे जीवन असे असते की त्याला वाटते त्याच्या जीवनातील सर्वकाही तो त्याच्या वैयक्तिक प्रतिभा किंवा त्याच्या वैयक्तिक ज्ञानाच्या बळावर करतो. वरवर पाहता, जीवनातील कोणतीही कामगिरी किंवा स्थान तो त्याच्या वैयक्तिक क्षमतेच्या बळावर प्राप्त करतो. त्याचे अलिप्त राहणीमान त्याला क्वचितच हे समजून घेण्याची कुवत देते की त्याची क्षमता, त्याचे ज्ञान आणि त्याची प्रतिभा प्रामुख्याने समाजात निर्माण होते आणि कामगार वर्गाचे श्रम हाच त्याचा पाया आहे. त्याच्या भौतिक अस्तित्वाच्या सर्व गरजा देखील कामगार वर्गाकडून पूर्ण होतात आणि त्याच्या ज्ञानाचा स्रोत देखील सामाजिक व्यवहारच आहे. त्यामुळे अशा निम्न-भांडवली म्हणजेच मध्यमवर्गीय बुद्धिजीवींनी औपचारिकरित्या जरी मार्क्सवाद स्वीकारला, तरी त्यांना कामगार वर्गाची सामूहिकता स्विकारायला, संघटनेची शिस्त स्विकारायला आणि क्रांतीच्या गरजा लक्षात घेऊन स्वतःच्या वैयक्तिक आवडी-निवडीचा त्याग करायला कठीण जाते.

ज्यांनी खऱ्या अर्थाने मार्क्सवाद आणि सर्वहारा वर्गाचे ध्येय आत्मसात केले आहे आणि क्रांती व संघटनेचे हित सर्वोपरी ठेवत व्यक्तिवाद, अहंकार इत्यादी भांडवली विचारसरणीच्या विरोधात निर्दयीपणे संघर्ष केला आहे, असे मध्यमवर्गीय बुद्धिजीवीच केवळ खऱ्या अर्थाने सर्वहारा वर्गाचे क्रांतिकारी बुद्धिजीवी होऊ शकतात. सर्वहारा वर्गाच्या वर्गसंघर्षात सहभागी होणारे बुद्धिजीवीच हे करू शकतात. माओने सांगितल्याप्रमाणे मार्क्स, एंगल्स, स्टॅलिन आणि लेनिन हे सर्वहारा वर्गाचे क्रांतिकारी सिद्धांत यामुळेच विकसित करू शकले कारण त्यांनी सर्वहारा वर्गाच्या वर्गसंघर्षात भाग घेतला आणि स्वतःचे क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणले. तसेच, क्रांतिकारी संदर्भात बुद्धिजीवीचा आणखी एक अर्थ असू शकतो: ते उन्नत कामगार जे क्रांतीचे शास्त्र म्हणजे मार्क्सवाद वाचून-लिहून समजतात, त्याला लागू करतात आणि त्याला त्यांच्या जीवनाचे आणि कर्मांचे मार्गदर्शक तत्त्व बनवतात.

तथापि, भांडवली समाजात वैज्ञानिक प्रयोगांद्वारे विचारांच्या जगाचे क्रांतिकारी परिवर्तन करण्याचे काम पक्ष किंवा बुद्धिजीवी करतात. केवळ समाजवादी समाजातच वैज्ञानिक प्रयोगात लोकसहभाग वाढतो आणि तो व्यापक जनसामान्यांचा विषय बनतो, जरी हे केवळ एका पक्षाच्या रूपात संघटित सर्वहारा वर्गाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकते आणि समाजातून भांडवली श्रम विभाजनाच्या संपूर्ण निर्मूलनासह आणि अलिप्ततेच्या पूर्ण समाप्तीनंतरच पक्ष नेतृत्वाची गरज कमी होऊ शकते. वर्गहिन समाज म्हणजेच साम्यवादाकडे वाटचाल केल्यावरच हे शक्य होईल.

शेवटी, आपण असे म्हणू शकतो की निसर्ग आणि त्याचेच अंग आणि विस्तार असलेले समाज आणि विचारांच्या जगाचे रूपांतरण हे तीन प्रकारच्या सामाजिक व्यवहाराद्वारे होत असते: उत्पादनासाठी संघर्ष, वर्ग संघर्ष आणि वैज्ञानिक प्रयोग. उत्पादनाचा संघर्ष हा मूलभूत आहे कारण तो मानवी जीवनाच्या भौतिक उत्पादनासाठी आणि पुनरुत्पादनासाठी आवश्यक आहे आणि तो निसर्गाच्या रूपांतरणाशी जोडलेला आहे, जो सर्व भौतिक वास्तवाचा एक मूलभूत पैलू आहे. या संघर्षाचा सामाजिक पैलू स्वतःला उत्पादक शक्ती आणि उत्पादन संबंधांच्या संघर्षाच्या स्वरूपात व्यक्त करतो, जो समाजाच्या विकासाच्या विशिष्ट टप्प्यावर वर्ग संघर्षाच्या रूपात प्रकट होतो. वर्गसंघर्ष हा समाजाला गती देणारा मुख्य अंतर्विरोध असतो कारण तोच समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाची तात्कालिक प्रेरक शक्ती असतो. विचारांच्या जगाचे परिवर्तन वैज्ञानिक प्रयोगांद्वारे घडते, जे भांडवलशाही समाजात पक्ष आणि बुद्धिजीवी करतात आणि केवळ समाजवादी समाजात सर्वसाधारणपणे जनता वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भाग घेते आणि विचारांच्या जगाच्या

पान 11 वर

# एस.टी कामगार आजही न्यायापासून वंचित का?

पान 7 वरून

घेतले पाहिजे की वर्गीय बाजू नसलेला, एका वर्गाच्या बाजूने आणि दुसऱ्या वर्गाच्या विरोधात नसलेला राजकीय पक्ष असूच शकत नाही. "आम्ही सर्वांचे" म्हणणारे हे वास्तवात ढोंगी असतात, आपली खरी कामगार विरोधी बाजू लपवण्यासाठीच ते "आम्ही सर्वांचे" असल्याचे ढोंग करत असतात. कोणताही पक्ष अस्तित्वात असतो सत्तेकरिता आणि सत्तेला, कायदा बनवणाऱ्यांना, वर्गीय बाजू असतेच. याचे कारण आहे की कामगारवर्ग आणि कामगारांचे शोषण करणारा, त्यांनी निर्माण केलेला नफा खिशात घालणारा भांडवलदार-मालक वर्ग यांचे हितसंबंध एक असूच शकत नाहीत आणि म्हणूनच कोणत्याही सत्ताधाऱ्याला या दोन्हींपैकी एकाच वर्गाची बाजू घेणे शक्य आहे.

आज महाराष्ट्रात असलेल्या प्रमुख पक्षांपैकी भाजप, काँग्रेस, हे प्रामुख्याने देशातील मोठ्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाच्या विविध गटांचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे, वंचित बहुजन आघाडी, सारखे पक्ष ही प्रामुख्याने प्रादेशिक स्तरावरील भांडवलदार वर्गाच्या विविध गटांचे, जसे की बिल्डर, वाहतूक व्यावसायिक, छोटे-मध्यम उद्योगपती, इत्यादी, प्रतिनिधित्व करत असतात. एकूणच भांडवलदार वर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व हे लहान-मोठ्या स्तरावरील पक्ष करत असतात आणि त्यांच्याच निधीवर पोसले जात असतात. म्हणून हे सर्वच पक्ष खाजगीकरणाचे, कंत्राटीकरणाचे खंदे समर्थक आणि कामगार वर्गाचे विरोधक असतात. विरोधी पक्षात असताना हे पक्ष कामगारांचे समर्थक असल्याचे ढोंग करत असतात आणि कामगार जेव्हा आपल्या न्याय्य मागणीला घेऊन संघर्ष करत असताना मागे हटत नाहीत तेव्हा या पक्षांचे खरे रूप समोर येते. एस.टी कामगारांच्या या संपात देखील कामगारांनी हेच अनुभवले आहे. हे पक्ष इथेच थांबत नाहीत तर वेळ आल्यावर त्यांचा खरा चेहरा दाखवत कामगारांचे दमन करायला देखील अजिबात मागे पुढे पाहत नाहीत. हे इतिहासात अनेक वेळेला वेळोवेळी समोर आले आहे. हे पक्ष चालततच खाजगी वाहतूक उद्योगाच्या मालकांच्या पैशांवर, बिल्डर-उद्योगपती-ठेकेदारांच्या पैशांवर; या पक्षांचे नेते स्वत: उद्योगपती आहेत; याही पुढे सांगायचे झाल्यास या पक्षांची विचारधारा खुलेपणाने खाजगीकरण-कंत्राटीकरणाची नफ्याच्या व्यवस्थेची, भांडवलशाहीची समर्थक आहे व भांडवलदारांच्या हितासाठी अनेक झेंड्याच्या आणि चेहऱ्याच्या माध्यमातून काम करत असते. अशा पक्षांकडून कामगारांनी आशा लावणे म्हणजे फक्त स्वत:ची फसवणूक आहे.

त्यामुळेच एस.टी.च्या खाजगीकरणात या सर्व पक्षांचा पुढाकार राहिला आहे. खाजगी शिवनेरी-शिवशाही गाड्या असोत, वा रोजंदारी कर्मचाऱ्यांची मोठी भरती, तिकीट मशीन असोत, वा इतर अनेक कामांचे कंत्राट काढून खाजगी मालकांना फायदा पोहचवणे असो, एक ना अनेकविध मार्गांनी सर्वच पक्षांनी खाजगीकरण रेटले आहे. त्यासोबतच या पक्षांनी फाटाफुटीचे राजकारण करून कामगारांची संघटित शक्ती कमी करवली आहे आणि कामगारांची राजकीय चेतना कुंठित केली आहे व हेतुपुरस्सर कामगारांना राजकीय शिक्षण प्रशिक्षणापासून वंचित ठेवले आहे.

### एस.टी कामगारांनी कामगारवर्गीय राजकारणावर पुनर्संघटित होण्याची गरज

एस.टी कामगारांनी विलीनीकरणाच्या मार्गातील अडथळे आणि आव्हाने ओळखून आपली संघटित शक्ती सामूहिक नेतृत्वात उभी करत व्यक्तिकेंद्रित नेतृत्वाला बाजूला सारले पाहिजे व व्यापक जनसमुदाय आपल्या बरोबर घेऊन आपल्या लढ्याला खाजगीकरण, कंत्राटीकरण विरोधी संघर्षात बदलत, खातरीशीर रोजगाराच्या लढाईचा अविभाज्य भाग बनवत, सरकारी सेवा सुविधा सशक्तीकरणासाठीच्या संघर्षाचे रूप देणे आवश्यक आहे. ज्या आंदोलनात योग्य राजकीय कार्यदिशेचा अभाव असतो व व्यापक जनतेचा पाठिंबा मिळालेला नसतो अशा आंदोलनाला सरकार दडपून टाकू शकते; पण कामगारांची संघटित शक्ती, योग्य कामगारवर्गीय राजकीय कार्यदिशा, आणि व्यापक जनतेचे समर्थन असलेले आंदोलन कितीही मोठ्या शक्तीला शरणागती पत्करायला भाग पाडू शकते.

या सर्व राजकारणाला पाहून व्यथित झालेल्या कामगारांनी हे समजणे की राजकारण नव्हे तर भांडवली राजकारण आपले शत्रू आहे, आणि कामगार वर्गीय राजकारणच आपल्याला योग्य दिशा देऊ शकते, गरजेचे आहे. भांडवली पक्षांच्या दावणीला बांधलेल्या संघटनांनी दिलेल्या धोक्यामुळे कामगारांचा मोठा हिस्सा निराश होत आहे. नवीन बनलेल्या पण जुन्याच प्रवृत्तीवर काम करत असलेल्या भांडवली विचाराच्या युनियन्स ह्या देखील कामगारांना फसवण्याचेच काम करत आल्या आहेत. अशात हे विसरता कामा नये की भांडवली पक्षांच्या दावणीला बांधलेल्या संघटना आपल्या शत्रू आहेत आणि भांडवलशाही विरोधात उभी कामगार वर्गीय विचारांची संघटना ही आपल्या अस्तित्वाची गरज आहे.

# अदानी समूहाचा लाखो कोटी रुपयांचा घोटाळा!

पान 16 वरून

चीनमधून येत होती तरीही ती दुबई मधल्या अदानीच्याच कंपनीकडून जास्त किमतीला विकत घेतल्याच्या खोट्या पावत्या तयार करण्यात आल्या. याचा मुख्य उद्देश या पब्लिक लिमिटेड कंपन्यांमधला पैसा परदेशी वळवणे हा होता. या घोटाळ्यामध्ये सुद्धा महसूल गुप्तचर संचालनालयाने स्वतःच 2017 मध्ये हा तपास गुंडाळून ठेवला आणि सांगितले की अदानी समूहाविरुद्ध विभागाकडे काहीही पुरावा नाही!

### कोळसा आयात घोटाळा

2014 मध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने केलेल्या अजून एका तपासातून हे स्पष्ट झाले की अदानी समूहाच्या कंपन्या आणि इतर 35 कंपन्या इंडोनेशिया मधून आयात केलेल्या कोळशाची किंमत कृत्रिमरित्या वाढवत आहेत. या कंपन्यांनी कोळशाच्या किमती वास्तव किमतीपेक्षा दुपटीने किंमत वाढवल्या. यामध्ये सुद्धा पैसे परदेशी वळवले गेले आणि वाढलेल्या कोळशाच्या किमतीने शेवटी ग्राहकांनाच वाढलेल्या वीज बिलांचा भुर्दंड सहन करावा लागला. कोळशाचा दर्जा तपासणीचे अहवाल सुद्धा खोटे बनवले गेले. म्हणजे एकीकडे खराब माल पण दुप्पट किंमत. यामध्ये एका अंदाजानुसार 50,000 कोटींचा घोटाळा करण्यात आला. कोळसा आयातीमध्ये सुद्धा माल इंडोनेशिया मधून घेण्यात आला पण दुबई, सिंगापूर इथून घेतल्याच्या खोट्या पावत्या बनवण्यात आल्या. या घोटाळ्यामधला तपास कागदावर तरी अजून पूर्ण झालेला नाही. पण यातून काही निष्पन्न होईल याची अपेक्षा करणे म्हणजे आपलाच मूर्खपणा ठरेल.

### अदानीमुळे बँका धोक्यात

अदानी समूहाचे किराणा माल, खाणी, रेल्वे विमानतळ, बंदरं आणि वीज कंपन्या अशा अनेक क्षेत्रात उद्योगधंदे आहेत तसेच विमानतळं, सिमेंट, तांबे उद्योग, रिफायनरी, डेटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन, पेट्रोकेमिकल्स, रस्ते निर्माण आणि सौर उर्जा अशा क्षेत्रांमध्ये भरपूर गुंतवणूक केली आहे. त्यात लागलेला पैसा हा जनतेचा आहे जो बँकांमधून कर्जाच्या रूपात घेतला गेला आहे. अदानी समूहाच्या सर्व कंपन्यांवर 2.18 लाख कोटी रुपये कर्ज आहे. अदानी समूहाने 81 हजार कोटी रुपयांचे कर्ज भारतीय बँकांमधून घेतले आहे, ज्यात 21,000 कोटी रुपयांचे कर्ज हे स्टेट बँक ऑफ इंडियाने दिले आहे. भारतीय जीवन विमा निगमने (एल.आय.सी.) अदानी समूहात सर्वात जास्त गुंतवणूक केली आहे, तब्बल 36,474 कोटी रुपये. हे सर्व जनतेचे पैसे अदानीच्या घोटाळ्यामुळे संकटात आले आहेत. परंतु सरकार मात्र अशा उद्योगपतींवर सतत मेहेरबान आहे.

आरटीआयमधून मिळालेल्या माहितीनुसार, कोरोनाच्या केवळ 15 महिन्यांत भांडवलदारांचे 2,45,456 कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. रिझर्व्ह बँकेचे 2015 ते 2021 पर्यंतचे आकडे बघितले तर 11 लाख 19 हजार कोटींचे कर्ज बुडाले, तर वसुली केवळ 1 लाख कोटी रुपये आहे. म्हणजे 10 लाख कोटींचा ठावठिकाणा नाही. यामध्ये सर्वाधिक सहभाग सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा आहे, जिथून सुमारे साडेआठ लाख कोटी रुपयांची कर्जे माफ करण्यात आली आहेत. अदानी सुद्धा अशाच कर्जबुडव्या उद्योगपतींपैकी एक आहे, ज्याला मोदी सरकारचे पूर्ण संरक्षण आहे.

### भाजपचे जाणीवपूर्वक पूर्ण दुर्लक्ष

भाजप सरकारने हिंडनबर्ग रिपोर्टकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे. विरोधी पक्षांनी विचारलेल्या एकाही प्रश्नाचे उत्तर भाजपने दिलेले नाही. विमानतळ आणि बंदरांवर मक्तेदारी निर्माण करण्याची परवानगी फक्त अदानी उद्योग समूहालाच का देण्यात आली आहे? शेअर बाजारात फेरफार, हिरे व्यापारात घोटाळा असे विविध आरोप असूनही इतके दिवस अदानी उद्योग समूहाची गंभीर चौकशी का झाली नाही? जर भारताच्या शेअर बाजारात एवढा मोठा घोटाळा सुरू होता तर शेअर बाजारावर नजर ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली संस्था, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड (सेबी), काय करत होती? सरकारची सर्वात "कार्यक्षम" यंत्रणा अंमलबजावणी संचालनालय (ईडी) गप्प का बसली आहे? उलट आज, भांडवली मीडिया अदानीची बाजू घेताना दिसत आहे आणि हे संपूर्ण प्रकरण देशाविरुद्ध काहीतरी षडयंत्र असल्याचा खोटा दावा करत आहेत.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे अदानी हा प्रधानमंत्री मोदींचा जवळचा मित्र आहे, आपले प्रधानमंत्री अदानीच्या खाजगी जेट मधून प्रवास करतात, प्रधानमंत्री हे 'राष्ट्राच्या समृद्धीचा जनक' असे म्हणून अदानीची महिमा गातात. या दोघांची मैत्री जगापासून लपलेली नाही.

### गौतम अदानी यांचे टीकाकारांना उत्तर

"मी टीकेचं स्वागत करतो, प्रत्येक टीका मला स्वतः मध्ये सुधारणा करण्यास मदत करते" म्हणणारे गौतम अदानी वास्तवात मात्र याच्या अगदीच उलट वागतात.

2017 मध्ये परंजॉय गुहा ठाकुरता यांनी अदानी समूहावर लिहिलेल्या लेखांबद्दल त्यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला. यानंतर कच्छच्या कोर्टाने ठाकुरता यांच्या नावाचे अरेस्ट वॉरंट सुद्धा जारी केले. ठाकुरता यांनी इकॉनॉमिक ॲंड पोलिटिकल विकली या नियतकालिकात अदानी समूहाने कशा प्रकारे 1,000 कोटी रुपयांच्या कराची चोरी केली होती, ते मांडले होते. तसेच द वायर या न्यूज पोर्टलवर त्यांनी मोदी सरकारने कशा प्रकारे 500 कोटी अदानीच्या खिशात घातले यावर लेख लिहिला होता. आता या लेखांसाठी ठाकुरता यांना केव्हाही अटक सुद्धा होऊ शकते.

ऑस्ट्रेलियामधल्या अदानीच्या कंपनीला स्थानिक नागरिकांकडून पर्यावरणाच्या मुद्द्यावरून विरोध होत होता. त्यामुळे कंपनीचे काम सुरू व्हायला उशीर सुद्धा झाला. याच मुद्द्यावर आंदोलन आयोजित करणाऱ्या आयोजकाच्या घराची झडती घेण्याची कोर्टाकडे विनंती करण्यापर्यंत अदानीची मजल गेली.

हिंडनबर्गचा अहवाल जाहीर झाल्यानंतर हिंडनबर्गला सुद्धा कोर्टात खेचण्याची धमकी दिली. हिंडनबर्गने एकूण 88 प्रश्नांची यादी अदानी समूहाला पाठवली आहे. त्याचे उत्तर न देता आल्यामुळे तोंडघशी पडल्यानंतर हिंडनबर्गचा अदानीवरचा अहवाल हा भारतावर, भारताच्या संस्थांवर हल्ला आहे असे अदानी समूहाद्वारे सांगण्यात आले. ज्या अहवालातून अदानी समूहाचा भ्रष्टाचार, जनताविरोधी कारवाया उघड झाल्या तो अहवाल देशविरोधी कसा? या अहवालाने एक खुले गुपितच बाहेर आणले आहे.

### भांडवलदारांच्या श्रीमंतीचे रहस्य

गौतम अदानीने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत मांडले की त्यांनी मेहनत करून त्यांचा पैसा कमावला आहे. तसे तर कोणताही भांडवलदार कामगारांनी निर्माण केलेली संपत्ती खिशात घालूनच अधिकाधिक भांडवल जमा करत जातो. पण हा लेख वाचून हे स्पष्टच होते की अदानी यांनी इतर अनेक प्रकारची सुद्धा "मेहनत" करून कसे भांडवल जमवले आहे. भांडवलदार कामगारांच्या श्रमाची लूट करून, इतर भांडवलदारांना गळेकापू स्पर्धेत हरवूनच लहानाचे मोठे होत असतात. प्रत्येक भांडवलदाराचा इतिहास पहिला तर तो असाच लहानाचा मोठा होत असतो, मग ते टाटा, बजाज, बिर्ला, अंबानी, मित्तल कुणीही असो. गौतम अदानी एवढ्या विविध क्षेत्रात अनेक वर्षांपासून घोटाळे करतो आहे ते सर्व नोकरशाही, राजकीय पक्ष, सत्तेतील लोक यांना सोबत घेऊनच. जी व्यवस्था मुळातच नफ्यासाठी काम करते, जिथे अस्तित्व टिकवण्यासाठी स्पर्धा करणे अनिवार्य आहे त्या व्यवस्थेत अशा प्रकारचे घोटाळे होणे साहजिकच नाही तर व्यवस्थेच्या नियमाला धरूनच आहेत. आज कामगार–कष्टकऱ्यांसमोर महागाई, बेरोजगारी सारखे प्रश्न आ वासून उभे असताना दुसरीकडे अदानी सारखे भांडवलदार कामगार–कष्टकऱ्यांचे रक्त शोषून अधिकच गब्बर होत चालले आहेत. भांडवलदार वर्ग हा समाजाला लागलेली कीड आहे जो नफ्याच्या हव्यासापोटी कामगाराला, निसर्गाला ओरबाडण्याचे काम करतो. अदानी या वर्गाचाच एक हिस्सा आहे. लढाई फक्त अदानी विरोधात नाही, तर सर्व भांडवलदार वर्गाविरोधात आहे.

# भाजप-संघाच्या अफवा कारखान्याचे अजून एक कुंभांड फुटले

✎ कात्यायनी

अफवा पसरवणे हा सर्व फॅसिस्टांच्या रणनीतीचा मूलभूत भाग आहे आणि संघाची हिंदुत्ववादी यंत्रणा हे काम जुन्या फॅसिस्टांपेक्षा अधिक प्रभावीपणे, सरकारी प्रचार यंत्रणा आणि गोडी मीडियासोबतच सोशल मीडियावर आयटी सेलची भाडोत्री माणसे वापरून करत आहे. जातीय तणाव आणि दंगलीच्या प्रत्येक प्रकरणात त्यांची कटकारस्थानांची यंत्रणा महत्त्वाची भूमिका बजावते. अफवांचे हे कारखाने अहोरात्र काम करत असतात, सतत जातीयवादी प्रचार करतात आणि खोट्या बातम्या तयार करतात, मुस्लिम लोकसंख्येला लक्ष्य करतात, धार्मिक कट्टरतावादी उन्माद पसरवतात आणि अंधराष्ट्रवादाची लाट निर्माण करतात.

नुकतेच त्याचे असेच एक घृणास्पद कृत्य समोर आले आहे. भाजपच्या आयटी सेलने अलीकडे सोशल मीडियावर असेच पाच व्हिडिओ व्हायरल केले होते ज्यात उत्तर भारतातील कामगारांना तमिळनाडूमध्ये धमकावले जात आहे, शिवीगाळ केली जात आहे आणि मारहाण केली जात आहे हे दाखवण्यासाठी छायाचित्रे लबाडीने बदलण्यात आली होती. याला दुजोरा देण्यासाठी भाजपचे तामिळनाडू अध्यक्ष के. अण्णामलाई यांनीही द्रमुक नेत्याच्या जुन्या विधानाच्या आधारे ट्वीट केले. हास्यास्पद बाब म्हणजे वस्तुस्थिती न तपासता बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी यावर निवेदन सुद्धा प्रसिद्ध केले!

पण अल्ट-न्यूजचे प्रतीक सिन्हा आणि मुहम्मद जुबेर यांनी केलेल्या तपासणीनंतर पाचही व्हिडिओ बनावट असल्याचे आढळून आले. पत्रकार कलीम अहमद यांचा या संदर्भातील लेखही 2 मार्च रोजी 'अल्ट न्यूज'च्या वेबसाईटवर प्रसिद्ध झाला. चेन्नईच्या सायबर गुन्हे शाखेने तमिळनाडू भाजप अध्यक्षाविरुद्ध खोटा प्रचार करून तणाव आणि तेढ निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. खोट्या बातम्या पसरवल्याप्रकरणी भाजपच्या उत्तर प्रदेश युनिटच्या प्रवक्त्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'हिंदू-मुस्लीम' नंतर 'उत्तर-दक्षिण' मध्ये तणाव आणि भांडण भडकवण्यामागे संघी फॅसिस्टांचा हेतू काय आहे, हे समजणे फारसे अवघड नाही. खरे तर हे सर्व 2024च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा एक भाग आहे. काशी-मथुरासारखे मुद्दे, गोहत्या, मदरसे आदी ध्रुवीकरणाचे मुद्दे आणि निवडणुकीपूर्वी 'पाकिस्तान-पाकिस्तान'चा ओरडा करत राष्ट्रविरोधी लाट निर्माण करणे ही भाजपच्या भात्यातील हत्यारे आहेतच, पण आता महागाई आणि बेरोजगारीचा मारा सहन करत असलेल्या जनतेमध्ये ज्या प्रकारे "विकासपुरुषा"चे सर्व फुगे फुटत आहेत, ते पाहता भाजप आपला विजय निश्चित करण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार आहे. यानंतर जिथे गरज आणि शक्यता असेल तिथे ईव्हीएमचा वापर केला जाईल आणि मग निवडणुकीनंतर संसदीय घोडेबाजारात घोडे खरेदीसाठी कोट्यवधी रुपयांच्या पोत्यांची तोंडे उघडणे हाच शेवटचा पर्याय आहेच. तरी पण, शेवटचा पर्याय वापरण्या अगोदर इतर डावपेच तर खेळले जातीलच!

तामिळनाडूमध्ये उत्तर भारतीय मजुरांवर हल्ले झाल्याच्या अफवा पसरवणे हा त्याच विचारपूर्वक केलेल्या रणनीतीचा भाग आहे. भाजपला माहीत आहे की तामिळनाडूमध्ये आपली व्होटबँक नगण्य आहे आणि त्यामुळे निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी करणे किंवा भाजपचे दुसरे डावपेच वापरणे तेथे कठीण जाईल आणि तेथील निवडणूक निकालांवर त्याचा फारसा फरक पडणार नाही. पण होय, तिथल्या उत्तर भारतीयांवर हल्ल्यांच्या अफवा पसरवून 'उत्तर विरुद्ध दक्षिण' संघर्षाला खतपाणी घातलं, तर उत्तर भारत, विशेषतः यू.पी. आणि बिहारमध्ये मतांची चांगली बेगमी होऊ शकते.

आता या फॅसिस्ट गुंडगिरीचा पर्दाफाश झाला असला तरी मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि सोशल मीडियावर संघी फॅसिस्ट व्यवस्थेची पकड आणि त्याचा प्रचार घरोघरी पोहोचवण्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जाळे पाहता असे म्हणता येईल की ही अफवा जितक्या लोकांपर्यंत पोहोचेल तितक्या लोकांपर्यंत या खोट्या गोष्टीचा पर्दाफाश पोहोचणार नाही.

अशा प्रत्येक घटनेने अधिकच खोलवर जाणवते की फॅसिस्टांच्या अशा कारवायांना जनतेच्या क्रांतिकारी संघर्षांसोबत पर्यायी मीडिया निर्माण करूनच रोखता येईल. सोबतच, जेव्हा कामगार वर्गाच्या कॅडर आधारित क्रांतिकारी नेतृत्वकारी संघटनेच्या पुढाकाराने, आणि तिच्या नेतृत्वात, तळागाळातून कामगारांचे विविध प्रकारचे मंच, संस्था, आणि जनसंघटना उभ्या करून फॅसिस्टांविरोधात एका दीर्घकालिक निर्णायक संघर्षाची तयारी पुढे जाईल, तेव्हा घराघरांपर्यंत आपला आवाज पोहोचवण्यात कामगार वर्गाचा क्रांतिकारी पक्षसुद्धा प्रभावी बनेल, आणि तो फॅसिस्ट प्रचाराला सडेतोड उत्तर देऊ शकेल.

**अनुवाद:** राहुल

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका -3

**पान 9 वरून**

क्रांतिकारी परिवर्तनाला अभूतपूर्वपणे पुढे नेते.

निसर्ग, समाज आणि विचाराचे रूपांतरण आणि त्याच्याशी निगडित तीन सामाजिक व्यवहार हा मनुष्याच्या सर्व ज्ञानाचा स्रोत आहे. मानवी ज्ञानाचा इतर कुठला चौथा स्रोत नाही. सामाजिक व्यवहाराच्या या तिन्ही प्रकारांतून ज्ञान उत्पन्न होते आणि ते पालटून त्याची सेवा करते. जर निसर्गाविषयीचे ज्ञान पालटून निसर्गाच्या रूपांतरणाचे काम करत नसेल, तर ते ज्ञान निरुपयोगी आहे, तसेच ते ज्ञान मृत होईल. कारण ज्ञानाचा सतत विकास तेव्हाच होऊ शकतो जेव्हा ते पालटून व्यवहाराची सेवा करेल. ज्ञानाचा जन्म व्यवहारातून होतो आणि त्याला पुन्हा व्यवहाराकडे जावे लागते, त्याचे मार्गदर्शन करावे लागते आणि या प्रक्रियेत सतत स्वतःचा विकास करावा लागतो. जर समाजाविषयीच्या आपल्या ज्ञानाचा उपयोग समाज बदलण्यासाठी केला गेला नाही, तर ते ज्ञान त्याची जीवनशक्ती गमावून समाप्त होईल कारण ते त्याच्या उगमापासून तोडले जाईल. निश्चितपणे, सामाजिक व्यवहाराच्या अनुभवाचे अमूर्तन, सामान्यीकरण आणि सारांश करून वैज्ञानिक ज्ञान विकसित केल्याशिवाय व्यवहारसुद्धा आदिम अवस्थेत राहील. आणि जर ज्ञानाने व्यवहाराची सेवा केली नाही तर ते देखील नष्ट होईल. हीच व्यवहार आणि ज्ञानाची एकता आहे, हीच अस्तित्वाची आणि विचारांची एकता आहे आणि हाच त्यांचा अंतर्विरोधही आहे.

व्यवहार आणि ज्ञानाचे हे तत्व कामगार वर्गाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच त्याला समजेल की योग्य विचार 'आकाशातून खाली पडत नाहीत' किंवा त्या 'तेजस्वी विद्वानांच्या बुद्धीची उपज' नाहीत. ते केवळ आणि केवळ तीन प्रकारच्या सामाजिक व्यवहारांमधून निर्माण होतात: उत्पादनासाठी संघर्ष, वर्ग संघर्ष आणि वैज्ञानिक प्रयोग. व्यवहाराची ही रूपे सामाजिक आहेत कारण ते समाजातील कष्टकरी घटकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच शक्य झाले आहेत. या स्वरूपात, व्यापक जनतेचा सामाजिक व्यवहार हाच ज्ञानाचा स्रोत आहे. भांडवलशाही समाजात कष्टकरी जनतेच्या जीवनाची परिस्थिती अशी असते की ते स्वतःच वैज्ञानिक ज्ञानापासून म्हणजेच वैचारिक ज्ञानापासून दूर फेकले जातात. ज्ञान ही मुळात एक सामाजिक मालमत्ता आहे, परंतु भांडवलशाही समाजातील इतर सर्व गोष्टींप्रमाणे ती देखील खाजगी मालमत्ता बनविली जाते. केवळ समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाने, म्हणजेच समाजवादी समाज आणि कामगारांच्या सत्तेच्या स्थापनेद्वारेच, ज्ञानाला परत सामाजिक मालमत्तेचे स्वरूप प्राप्त होते, जेव्हाकी भांडवली समाजातही त्याचे मूळ सामाजिकच असते. स्वतः या क्रांतिकारी परिवर्तनासाठी कामगार वर्गाला विद्यमान समाज आणि राज्यव्यवस्था, त्याचे वर्ग चरित्र आणि स्वतःची शक्ती याबद्दल ज्ञान मिळवावे लागेल. हे तेव्हाच घडू शकते जेव्हा कामगार वर्गातील प्रगत घटक स्वतःला क्रांतिकारी पक्षाच्या रुपात संघटित करतील, कारण केवळ हा पक्षच कामगार वर्गाच्या ज्ञानाचे आणि संघर्षाचे मुख्यालय असू शकतो, कामगार वर्गाच्या अनुभवांचे अमूर्तीकरण, सामान्यीकरण आणि सारांश करून त्याच्या वैज्ञानिक ज्ञानाची निर्मिती करू शकतो आणि त्याला पद्धतशीर करू शकतो. आणि या वैज्ञानिक ज्ञानाच्या मार्गदर्शनाखाली कामगार वर्ग आणि व्यापक कष्टकरी जनतेचे नेतृत्व करत त्यांना क्रांतीच्या मार्गावर नेऊ शकतो.

या काही मूलभूत गोष्टी होत्या ज्या प्रत्येक कामगाराने आणि क्रांतिकारकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहेत. पुढच्या अंकात, आपण भांडवली समाजाच्या आर्थिक विश्लेषणाकडे जाऊ आणि टप्प्याटप्प्याने आणि पायरीपायरीने त्याचे सत्य उघड करू.

**अनुवाद:** जयवर्धन (मूळ लेख, मजदूर बिगुल, ऑगस्ट 2022 मध्ये प्रकाशित)

# नेल्ली हत्याकांडाच्या चाळीस वर्षांनंतर

**पान 4 वरून**

गरिबीसारख्या समस्यांना जबाबदार आहेत, हे भाजपच्या राजकारणासाठी आवश्यक आहे! असा हा संघी प्रचार आसाममध्ये रात्रंदिवस सुरू आहे. सीएए-एनआरसीचा फॅसिस्ट प्रयोग आसाममधूनच सुरू झाला आणि आजही भाजप पुन्हा ही मोहीम चालवण्याची चर्चा करत असतो. हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण जितके तीव्र होईल तितकाच आसाममध्ये संघी फॅसिझमचा पाया व्यापक आणि मजबूत असेल हे स्पष्ट आहे. भांडवलदार वर्गातील इतर सर्व पक्षांकडे यावर काही उत्तर असू शकत नाही कारण ते लोकांच्या मूलभूत समस्यांची कारणे दाखवू शकत नाहीत किंवा त्यावर उपायही मांडू शकत नाहीत. या व्यवस्थेच्या चौकटीतच संसदीय राजकारणाचा खेळ खेळणाऱ्या संसदीय डाव्या पक्षांचीही तीच अवस्था आहे. अशाप्रकारे इतिहासाची ही सामान्य मांडणी येथेही लागू केली जाऊ शकते की फॅसिझमच्या राजकारणाचा उदय हा देशाच्या आणि आसामच्या स्तरावर क्रांतिकारी डाव्या शक्तींच्या अपयशाचा परिणाम आहे. साहित्यिक भाषेत, क्रांतीच्या लाटेला गती देऊ न शकल्यामुळे कष्टकरी जनतेला मिळालेली ही ऐतिहासिक शिक्षा आहे.

केवळ कामगार वर्गाचे संघटित अग्रदलच आसामच्या लोकांना हे सत्य पटवून देऊ शकतो की त्यांच्या पूर्ण दुर्दशेचे कारण बांगलादेशी "बाहेरचे" किंवा मुस्लीम नाहीत, तर भांडवलशाही व्यवस्था आहे जी संपूर्ण भारतीय कष्टकरी जनतेची समान शत्रू आहे. क्रांतिकारी डाव्या राजकारणाच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया पुढे नेऊनच अंधराष्ट्रवाद आणि धर्मवादाच्या फॅसिस्ट राजकारणाला उत्तर देता येईल. येथे हा मुद्दाही समजणे आवश्यक आहे की, संपूर्ण देशाप्रमाणेच आसामच्या राजकारणातही बदरुद्दीन अजमलसारख्या लोकांचे मुस्लीम धर्मवादी राजकारण वेगळ्या पद्धतीने हिंदुत्ववादी राजकारणाला बळ देण्याचे काम करते. धार्मिक अल्पसंख्याक लोकसंख्या बहुसंख्य धार्मिक कट्टरवादाच्या विरोधात धार्मिक आधारावर संघटित होऊन कोणतीही लढाई जिंकू शकत नाही हे सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट आहे. उलट, यामुळे तिला आणखी भीषण संकटांना सामोरे जावे लागेल.

आसामच्या राजकारणात भाजपचा प्रभाव आणि आसामी समाजात संघाचा वाढता सामाजिक पाया यामुळे तेथे नेल्लीसारखी घटना घडण्याची भीती कायम राहील. आणि आता तर संपूर्ण सत्ता आणि संपूर्ण मीडिया अधिक प्रभावीपणे फॅसिस्ट मारेकऱ्यांच्या जमावासोबत उभे राहतील. हेही अगदी स्पष्ट आहे की जोपर्यंत ही भांडवली संसदीय व्यवस्था भारतात राहील, तोपर्यंत नेल्लीचे भूत आसाममध्येच नव्हे, तर संपूर्ण भारतात फिरत राहील!

गुजरात-2002 पासून मुझफ्फरनगर आणि दिल्ली दंगलीपर्यंत, संपूर्ण भारताच्या स्तरावर, अधिक 'प्रगत' आणि राज्य-प्रायोजित स्वरूपात नेल्लीचा विस्तार नवीन स्वरूपात सहज पाहता येईल. बुर्झ्वा प्रसारमाध्यमे आणि दळणवळणाच्या प्रणालीवर फॅसिस्टांनी पूर्णपणे प्रभुत्व मिळवल्यानंतर, आता लोकांना अशा घटनांची तीव्रता देखील लक्षात येत नाही, आणि अशा घटनांचे एक वेगळेच चित्र लोकांसमोर उभे केले जाते आणि नंतर असे देखील होते की लोक लगेचच वाईटातल्या वाईट गोष्टी विसरायला लागतात. जे सामान्य लोकांची शिकार करतात ते आठवणी आणि मानवी संवेदनांची सुद्धा शिकार करतात. विस्मरणाच्या सवयीविरुद्ध, अमानुष परिस्थिती आणि गोष्टींची सवय करून घेण्याच्या सवयीविरुद्ध, सद्यस्थितीची सवय झाल्यामुळे सामान्य लोकांच्या मानसिकतेचे जे अ-मानवीकरण होते त्या विरुद्ध लढणे हाही क्रांतिकारी परिवर्तनाच्या प्रकल्पाचाच एक भाग आहे.

**अनुवाद:** अभिजित (मूळ लेख: मजदूर बिगुल, मार्च 2023 मध्ये प्रकाशित)

# 14 मार्च, कार्ल मार्क्स यांच्या 140 व्या स्मृतिदिनानिमित्त

## कामगार राज्याच्या कल्पनेचा पाया रचणारा तत्त्वज्ञ, समाज वैज्ञानिक, कामगार वर्गाचा महान शिक्षक, नेता : कार्ल मार्क्स

✍पूजा

अडथळ्यांपासून मुक्त जीवन
माझ्यासाठी नाही,
नाही, माझ्या उत्स्फूर्त मनाला हे स्वीकार नाही
मला तर हवे आहे एक महान उत्तुंग लक्ष्य
आणि त्यासाठी आयुष्यभर
संघर्षाची एक अतूट साखळी!

- कार्ल मार्क्स


जगाला कामगारांच्या सत्ता स्थापनेचं एक उदात्त, महत्तम स्वप्न, एक घनगंभीर लक्ष्य देणारा आणि तिथपर्यंत पोहचण्यासाठी एक विज्ञाननिष्ठ रस्ता दाखवणारा व्यक्ती म्हणजे कार्ल मार्क्स! आज जगभरात कामगार वर्गीय बाजू निवडणारी, कष्टकऱ्यांची श्रम संस्कृती स्वतःत रुजविण्याचा प्रयत्न करणारी प्रत्येक व्यक्ती घट्ट मूठ वळून, पाठीचा कणा ताठ करून, हात वर उचलून तितक्याच जिद्दीने एक नारा देते जितक्या जिद्दीने मार्क्स हा नारा देत असे - 'जगातील कामगारांनो एक व्हा!' देशा-देशांतील, राज्या-राज्यांतील, जात, धर्म, लिंग, भाषा, वेष, खान-पान ह्या सगळ्यांच्या सीमा पार करून जगातील सर्व श्रमिकांमध्ये वर्गीय एकजूट निर्माण करण्याची जमीन तयार करण्यामध्ये मार्क्सचे योगदान अमूल्य आहे. मार्क्सचे सहयोगी आणि मित्र एंगल्सच्या शब्दांत सांगायचे तर, 'समाजवाद आणि वर्तमानकाळातील संपूर्ण कामगार आंदोलनाला वैज्ञानिक आधार मिळवून देणारी सर्वात पहिली व्यक्ती म्हणजे मार्क्स!' मार्क्सची बुद्धी, शरीर, मन हे सर्व काही सुईपासून जहाजपर्यंत सर्व काही बनवणाऱ्या, जगातील सर्व संपत्ती निर्माण करणाऱ्या, दिवस रात्र कष्टाचे डोंगर उपसणाऱ्या कामगार वर्गाप्रती समर्पित होते.

5 मे 1818 रोजी प्रशाच्या राईन क्षेत्रातील त्रियेर नावाच्या शहरात कार्ल मार्क्सचा जन्म एका समृद्ध परिवारात झाला. त्रियेरमध्ये हायस्कूल पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर मार्क्सने प्रथम बोन आणि बर्लिन मध्ये कायद्याचा अभ्यास केला आणि नंतर पूर्णपणे आपले लक्ष इतिहास आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासावर केंद्रित केले. इतिहास आणि राजकीय अर्थशास्त्राच्या सखोल अभ्यासाने मार्क्सला कम्युनिझमकडे वळवले. मार्क्सचं म्हणणं होतं की वैयक्तिक स्वार्थ साधण्याची मानसिकता आणि वर्गीय पूर्वाग्रहांची डोळ्यांवर असलेली पट्टी, यापासून मुक्त असलेली, पक्षपाती नसलेली व्यक्ती कम्युनिझमच्या विचारांपर्यंत पोहोचणे स्वाभाविक आहे.

### मार्क्सचे योगदान

जर्मन तत्त्वज्ञान, ब्रिटीश राजकीय अर्थशास्त्र आणि फ्रेंच समाजवादाच्या सर्वोत्तम परंपरांना पुढे विकसित करत, आणि त्यांची योगात्मक एकता स्थापित करत मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचे विज्ञान आणि द्वंद्वात्मक भौतिकवादाचे तत्त्वज्ञान विकसित केले, जगाकडे बघण्याचा वैज्ञानिक विश्व-दृष्टीकोन आणि अन्वेषण पद्धतीचा पाया घातला. इतिहासाच्या वैज्ञानिक, भौतिकवादी, समजदारीला मार्क्सने तीन महत्त्वाची योगदाने दिली:

ऐतिहासिक भौतिकवादाचे विज्ञान: उत्पादक शक्तींचा विकास आणि प्रस्थापित उत्पादनाचे संबंध यात असलेला अंतर्विरोध हा समाजाचा पायाभूत अंतर्विरोध आहे. वर्गसमाजांमध्ये हा अंतर्विरोध विकासाच्या विशिष्ट टप्प्यात वर्गसंघर्षांच्या रुपात प्रकट होतो, व तात्कालिक प्रेरक शक्ती बनतो.



भांडवलशाहीतील शोषणाचे मर्म: उत्पादक शक्तींचा विकास आणि उत्पादनाचे संबंध यातील अंतर्विरोध भांडवलशाहीत उत्पादनाचे सामाजिक चरित्र आणि वरकडाचे खाजगी हस्तगतीकरण या रुपांनी प्रकट होतो. भांडवली अर्थव्यवस्थेचे सर्व अंतर्विरोध तिच्या कोषिकेतून, म्हणजेच उपयोग मूल्य व विनिमय मूल्याचा अंतर्विरोध समाविष्ट करणाऱ्या 'माल' उत्पादनातून, विकसित होतात. भांडवली उत्पादन व्यवस्थेत कामगार मालकाला आपली श्रमशक्ती विकतो (श्रम नव्हे), त्याला मिळणारा मोबदला म्हणजेच त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य, आणि या मूल्याहून अधिक काम करून कामगारच अतिरिक्त मूल्य निर्माण करतो जे मालकांची संचित संपत्ती बनते. भांडवलशाहीत अंतर्भूत अंतर्विरोधामुळेच ती नफ्याच्या दराच्या घसरणीच्या प्रवृत्तीला जन्म देते आणि आर्थिक संकटे निर्माण करते.

आजच्या अन्याय्य व्यवस्थेच्या, म्हणजे भांडवलशाहीच्या विरोधात लढून समाजवाद प्रस्थापित करू शकणारी अग्रणी ताकद म्हणजे कामगारवर्ग, ज्याच्याकडे हरवण्यासाठी काही नाही मात्र जिंकण्यासाठी संपूर्ण जग आहे.

तत्कालिन नैसर्गिक आणि समाजविज्ञानातील सर्वोत्तम परंपरांना आत्मसात करत, मार्क्स-एंगल्सने द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वज्ञानाची मांडणी करत हेगेलच्या भाववादी द्वंद्ववादाला भौतिकवादाच्या आधारावर विकसित केले आणि "डोक्याऐवजी पायावर उभे केले". अंतर्विरोधांच्या एकतेचा नियम, निषेधाच्या निषेधाचा नियम आणि संख्यात्मक बदलांमधून गुणात्मक बदलांचा नियम या द्वंद्ववादाच्या नियमांना भौतिकवादी चौकटीत सर्व विज्ञानांचे सामान्यीकृत नियम म्हणून स्थापित केले, आणि अशाप्रकारे जगाकडे बघण्याचा एक विश्वदृष्टीकोन आणि अन्वेषण पद्धत स्थापित केली.

मार्क्स-एंगल्सने मांडलेले ऐतिहासिक भौतिकवादाचे विज्ञान आणि द्वंद्वात्मक भौतिकवादाचे तत्वज्ञान आजही जगातील क्रांतिकारी चळवळींचा मार्ग आलोकित करत आहे.

### मार्क्स आणि एंगल्सची मैत्री, क्रांतिकारी समाजवादाच्या पायाभरणीत अभूतपूर्व योगदान

मार्क्स आणि एंगल्सच्या लिखाणाने कामगारवर्गीय आंदोलनाला 'काल्पनिक समाजवादाच्या' भुलाव्यातून बाहेर काढत वैज्ञानिक समाजवादाकडे आणले. 'राईचे फ्रांजोसिस्शे यारबुखेर' ह्या पत्रिकेच्या कामासाठी, जिच्यात मार्क्सने स्वतःच्या समाजवादी लेखमालेला सुरुवात करत हेगेलच्या भाववादाची समीक्षा लिहिली, मार्क्स पॅरिसला गेले आणि तिथे एंगल्स आणि मार्क्सची घनिष्ठ मैत्री जुळली. दोघांनी मिळून 'पवित्र परिवार' ह्या पुस्तकात तरुण हेगेलवादी (यंग हेगेलियन) गटांवर टीका लिहिली. पुढे ह्याच पुस्तकाबद्दल रशियन कामगार क्रांतीचे नेते लेनिन म्हणतात की, 'ह्या लिखाणाने वैज्ञानिक क्रांतिकारी भौतिकवादी समाजवादाचा पाया घातला.' पॅरिसच्या क्रांतिकारी गटांमध्ये दोघांनी सक्रिय सहभाग घेतला आणि त्यायोगे जीवनात येणाऱ्या सर्व प्रकारच्या आव्हानांना देखील स्वीकारले. 1847 मध्ये प्रूधोंच्या मतांचे ('दारिद्र्याचे तत्त्वज्ञान' लेख) खंडन करत 'तत्वज्ञानाचे दारिद्र्य' हे पुस्तक लिहून निम्न-भांडवली समाजवादाच्या धारणांशी संघर्ष करत त्यांनी क्रांतिकारी कामगारवर्गीय समाजवादाच्या सिद्धांतांची आणि कार्यनितीची पायाभरणी केली. 1848च्या वसंत ऋतूत मार्क्स आणि एंगल्स कम्युनिस्ट लीग या भूमिगत संघटनेचे सदस्य झाले. कम्युनिस्ट लीगच्या दुसऱ्या काँग्रेसच्या निर्देशानुसार त्यांनी जगप्रसिद्ध पुस्तक 'कम्युनिस्ट पार्टीचे घोषणापत्र' लिहिले, जे फेब्रुवारी 1848ला प्रकाशित झाले. ह्या पुस्तकात त्यांनी कामगार वर्गाची विश्व ऐतिहासिक क्रांतिकारी भूमिका स्पष्ट करत कामगार वर्गीय आंदोलनाला वैज्ञानिक दिशा दिली, इतिहास-वर्तमान-भविष्याकडे बघण्याचा भौतिकवादी विश्व दृष्टिकोन दिला.

एक मित्र म्हणून एंगल्सची मार्क्सला वेळोवेळी साथ मिळाली. त्यांची मैत्री देखील कामगार राज्याच्या स्थापनेच्या ध्येयासाठी समर्पित होती आणि म्हणून इतकी घट्ट होती. निस्सीम मैत्रीचे एक उदाहरण दोघांनी जगासमोर ठेवले. मार्क्सच्या मृत्यूनंतर भांडवल ह्या ग्रंथाचे संपादन व प्रकाशन करण्याचे अत्यंत महत्वाचे काम एंगल्सने केले. 'भांडवल' ज्यात मार्क्सने दाखवून दिले की संपूर्ण जगातील संपत्ती कामगारवर्ग कसा निर्माण करतो आणि उत्पादन साधनांवर असलेल्या मालकीच्या जोरावर, कामगार वर्गानेच निर्माण केलेल्या वरकड मूल्यातून मालक नफा कसा कमावतो, आणि भांडवलशाहीच्या स्वत:च्याच अंतर्विरोधातून नफ्याच्या दराच्या घसरणीची प्रवृत्ती विद्यमान असते व ती आर्थिक संकटांना जन्म देत राहते. मार्क्सने शिकवले की कशा प्रकारे भांडवलशाहीमध्ये निर्माण होणारी मंदी, महागाई, बेरोजगारी, इत्यादी संकटांचे निराकरण हे भांडवली अर्थशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या भांडवली व्यवस्थेच्या चौकटीतील उपायांनी शक्य नाही, तर कामगारवर्गीय क्रांती, समाजवाद, हेच तिचे समाधान आहे, आणि पृथ्वीला भांडवली व्यवस्थेच्या विध्वंसापासून फक्त समाजवादच वाचवू शकतो. भांडवल ग्रंथावर मार्क्सने 40 वर्षे काम केले. डार्विनच्या लिखाणाने प्रस्थापित तत्त्वज्ञानाला, समजदारीला जे हादरे दिले, त्याच तोडीचे किंवा त्यापेक्षाही जास्त हादरे भांडवल ग्रंथाने दिले.

मार्क्सच्या एका सहयोगी मित्राच्या मुलीने लिहिले आहे की, 'मार्क्ससाठी मैत्री ही निस्सीम असे. एकदा एका मित्राने मार्क्सकडे एंगल्सबाबत मांडले की एंगल्सची आर्थिक परिस्थिती इतकी चांगली आहे की मार्क्सच्या आर्थिक प्रश्नांना सोडवण्यासाठी एंगल्स आणखी बरेच करू शकला असता. मार्क्सने काही शब्दांनीच त्या मित्राच्या विचारांतील कमीपणा दाखवून दिला, "माझे आणि एंगल्सचे नाते इतके जिव्हाळ्याचे आणि प्रेमाचे आहे की कुणालाही त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही." मार्क्स आणि एंगल्सने जर्मन विचारधारा, फायरबाखवर प्रबंध, राजकीय अर्थशास्त्राच्या टीकेची तोंडओळख, कम्युनिस्ट पार्टीचे घोषणापत्र, तत्वज्ञानाचे दारिद्र्य, फ्रान्समध्ये वर्गसंघर्ष, जर्मनीत क्रांती आणि प्रतिक्रांती, लुई नेपोलियनची अठरावी ब्रुमेर, जर्मनीत शेतकऱ्यांचे युद्ध, गोथा कार्यक्रमाची समीक्षा, समाजवाद: काल्पनिक आणि वैज्ञानिक सारख्या अनेक महान कृती दिल्यात ज्या आजही जगभरातील कामगार वर्गीय आंदोलनाला दिशा दाखवतात, समाजाच्या विकासाचे नियम शिकवतात, इतिहासाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन देतात, ऐतिहासिक भौतिकवादाचे विज्ञान आणि द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या तत्त्वज्ञानाची शिकवण देतात.

### क्रांतीच्या उद्दिष्टाला समर्पित मार्क्स; एक शिक्षक, एक अभ्यासक, एक साहित्यप्रेमी

कामगार राज्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आयुष्य समर्पित केलेल्या क्रांतिकारकांच्या जीवनात अनेक आव्हानं, त्याग, अप्रिय, दुःखी क्षण येतात, त्याला मार्क्सही अपवाद नव्हते. ह्या महत्तम ध्येयाच्या लक्ष्यपूर्तीची गरज त्यांना सतत प्रेरणा देत राहिली व अत्यंत कठीण जीवनस्थितीत त्यांनी कामगार वर्गीय आंदोलनात योगदान दिले. मार्क्स खूप मेहनती होते आणि स्वत:च्या शरीराकडून क्षमतेहून कितीतरी जास्त मेहनत ते करवून घेत असत. एका निर्वासिताचे (emigrant) जीवन जगताना दिवसा काम करण्यासाठी अनेक अडचणी येत, ज्यावर मात करण्यासाठी, शांतता मिळावी ह्या साठी मार्क्सला रात्रभर जागून काम करावे लागत असे. त्यांची कामाची खोली अत्यंत साधी असे. एक टेबल, पुस्तकांचे कपाट आणि सोफा! दिवसा काम करताना मार्क्स थोडावेळ सोफ्यावर झोप घेत असत. भुकेच्या कमतरतेने देखील त्यांना ग्रासलं होतं. एकूणच अभावांच्या जीवनस्थितीमुळे मार्क्सला पन्नाशी नंतर अनेक व्याधींची तक्रार सुरू झाली होती. त्यांना रात्री जागून काम न करण्याची, समुद्र किनारी निरोगी हवेत फिरण्याची, व्यायाम करण्याची डॉक्टरांकडून सक्ती करण्यात आली. काही दिवस सूचनांचं पालन केल्यानंतर मार्क्स पुन्हा लिखाण पूर्ण करण्यासाठी रात्री काम करणं सुरू करत असत. मार्क्स सकाळी फिरायला जाताना देखील स्वतःजवळ वही पेन काही महत्त्वाच्या नोंदी करायला जवळ ठेवत असत. त्यांचं काम कधीही वरवरचं नसे. गोष्टींच्या अगदी खोलात जाऊन त्यांची फेरतपासणी ते करत असत. अगदी लहानशा संदर्भासाठी देखील ते शंका निरसन होईपर्यंत तपशीलवार, मोठ-मोठ्या नोंदी घेत, कागदपत्रं, पुस्तकं वाचून काढत असत. मार्क्सला थकणे माहीत नव्हते. अगदी शारीरिक थकवा आल्यानंतर देखील ते थकवा आल्याचे कोणतेही लक्षण

पान 13 वर

# 14 मार्च, कार्ल मार्क्स यांच्या 140 व्या स्मृतिदिनानिमित्त

पान 12 वरून

दाखवत नसत. मार्क्स खोटी महानता, द्वेष, मत्सर, अहंकार, दिखावेबाजी यांच्या अत्यंत विरोधात होते. ते एक सच्चे मनुष्य होते.

कुणी जिज्ञासू व्यक्ती त्यांच्यापर्यंत आल्यास ते स्वतः त्याला वेळ देत, अध्ययनासाठी प्रोत्साहित करत असत. पण असे लक्षात आल्यास की कुणी व्यक्ती अभ्यासात आळस, टाळाटाळ करत आहे तर मार्क्स आपला वेळ तिथे खर्च करणं अपव्यय मानत व कटाक्षाने टाळत असत. मार्क्स तरुणांना जोशाने, उत्स्फूर्ततेने मार्गदर्शन करत कारण कम्युनिझमचा विचार जिवंत राहणे, प्रसार होत राहणे हे सर्वाधिक महत्त्वाचे त्यांना वाटे. मार्क्स नेहमी आंदोलनातील साथींना फक्त राजकीय अर्थशास्त्रातच नाही तर इतर अनेक गोष्टींत शिक्षित करण्याचे काम करत. त्यांना प्राचीन आणि आधुनिक भाषांचे उत्तम ज्ञान होते. व्याकरण, उच्चारण अचूकतेवर ते भर देत व इतरांनीही त्यावर भर द्यावा यासाठी आग्रही असत. मार्क्सने 1850 ते 1851 दरम्यान राजकीय अर्थशास्त्रावर व्याख्याने दिली. विस्तृत श्रोतावर्ग असलेल्या त्या व्याख्यानमालेत मार्क्सने ज्ञान प्रचाराची प्रतिभा कशी असावी हे दाखवून दिले. त्यांची शिकवण्याची तऱ्हा एका निपुण आणि हाडाच्या शिक्षकाप्रमाणे होती. कामगारांसमोर बोलताना त्यांना न समजणाऱ्या शाब्दिक अभिव्यक्ती टाळत ते संकल्पनेची विस्तृत व्याख्या करत ती समजावून सांगत असत. त्यानंतर ते श्रोत्यांना प्रश्न विचारण्यास सांगत. कुणीच प्रश्न नाही विचारला तर ते स्वतः फेरतपासणी करत. मुद्द्याच्या समजदारीमध्ये कोणतीही कमी, गैरसमज, अस्पष्टता त्यांच्या नजरेतून सुटत नसे. ब्रिटिश म्युझियमच्या वाचनालयात बसून मार्क्स वाचन करत असत, इतरांनाही वाचन करण्यास सांगत असत. तरुणांना ते तार्किक चिंतन आणि स्पष्ट अभिव्यक्तीच्या महत्त्वाबद्दल सांगत असत. मार्क्स एक प्रोत्साहित करणारे कठोर शिक्षक होते. ते सर्वांना आत्मटीका करण्यासाठी बाध्य करत असत, स्वतःच्या कामगिरीवर आत्मसंतुष्ट न राहण्यास सांगत असत.

सरळ, सच्चे, स्वच्छ पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे पारदर्शक असलेले मार्क्स त्यांच्या सर्व लिखित कृतींमधून तसेच समोर आलेत. परिश्रमपूर्वक लिहिलेल्या कुठल्याही सैद्धांतिक निष्कर्षाची निरुपयोगीता लक्षात आल्यास मार्क्स लगेच त्याचा त्याग करत असत. मार्क्सची लिखाणशैली ही मार्क्सच्या व्यक्तिमत्त्वास अनुरूप कणखर अशीच होती. भांडवल, अठरावी ब्रुमेर, श्रीमान फोगाट, इत्यादी त्यांच्या कृतींमध्ये त्यांची वैविध्यपूर्ण पण तरीही अचूकतेचा आग्रह असलेली लेखनशैली दिसून येते. भांडवल ग्रंथाच्या शैलीला कठीण मानले जाते, पण विज्ञानाचा कोणता साधा, सरळ मार्ग नसतो, त्याच्या शिखरावर पोहचण्यासाठी अथक परिश्रमांची गरज असते, असे मार्क्सनेच मांडले आहे. त्यामुळे भांडवल ग्रंथाची शैली त्याच्या विषयवस्तू प्रमाणेच स्पष्ट आणि सटीक असणे आवश्यक होते. भाषाक्षेत्रात गटे, शेक्सपिअर, लेस्सिंग, दान्ते आणि सर्वांतीसला ते आपले गुरू मानत. अगदी रोज त्यांच्या साहित्यकृती ते वाचत. हाईने, गटे आणि शेक्सपिअर त्यांना कंठस्थ होता. त्यांच्या संपूर्ण परिवाराचा शेक्सपिअर आवडता होता. जेनी शेक्सपिअरची अभ्यासक होती, मार्क्सच्या मुली देखील शेक्सपिअरच्या नाटकातील संवाद पाठ म्हणून दाखवत. मार्क्स अनेक चांगल्या कवींचे निष्ठावान वाचक होते. टॉम जोन्स, चार्ल्स लेवर, पोल द' कॉक, वॉल्टर स्कॉट त्यांचे आवडते कादंबरीकार होते. बाल्झाक आणि सर्वांतीसला मार्क्स सर्वोत्तम कादंबरीकार मानत. मार्क्सला सर्व युरोपीय भाषा येत असत. ग्रीक, लॅटिन, स्पॅनिश भाषांचे मार्क्स उत्तम जाणकार होते. सोबतच जर्मन, फ्रेंच, इंग्लिश सुद्धा उत्तम प्रकारे त्यांना येत असे. जीवन संघर्षात विदेशी भाषा एक हत्यार आहे असे ते नेहमी म्हणत. रशियन भाषा मार्क्सने वयाच्या 50 व्या वर्षी, आजारांनी पिडलेले असताना शिकली आणि पुश्किन, गोगोल, श्चेद्रिनच्या साहित्यकृतींचा आस्वाद घेतला. गणित आणि विज्ञान मार्क्सला अतीव प्रिय होते. जीवनाच्या दुःखी क्षणांमध्ये मार्क्स तासंतास गणितं सोडवण्यात बुडून जात असे. डार्विनच्या सिद्धांतावर, प्राकृतिक विज्ञानाच्या क्षेत्रात लागणाऱ्या नवनवीन शोधांवर मार्क्स न थकता चर्चा करत असे.

मार्क्सच्या मृत्यूनंतर फ्रेडरिक लेसनर या एका कामगाराने मार्क्स बद्दल लिहिले की, "कार्ल मार्क्सचा फार लवकर मृत्यू झाला हे सर्वांचेच एकमत असेल. मार्क्सला अगदी जवळून ओळखणारे बऱ्याच काळापासून त्यांच्या तब्येतीला घेऊन खूप चिंतित असायचे, पण जेव्हा प्रश्न त्यांच्या वैज्ञानिक साहित्याचा आणि कामगार वर्गाचा असे, तेव्हा मार्क्स स्वतःला सूट देऊ शकत नसत. त्यांचे कुणीही मित्र, कुटुंबातील सदस्य त्यांच्याशी ह्याबाबतीत जिंकू शकत नसत. मृत्यू नंतर देखील मार्क्स आपल्याला नवीन ज्ञान, नवीन दृष्टीकोन देत आहेत, त्यांचे साहित्य झपाट्याने लढणाऱ्या कामगार वर्गापर्यंत पोहचत आहे; सर्वत्र कामगार वर्गीय आंदोलन त्यांच्या साहित्याच्या प्रभावात येत आहे. मार्क्सने फक्त हा शक्तिशाली नारा 'जगातील कामगारांनो एक व्हा!' दिला नाही तर एक सैद्धान्तिक आधार दिला ज्यावर ही एकजूट होऊ शकेल आणि होत आहे. इंटरनॅशनल, जिचा मार्क्स आत्मा होते, पुन्हा उभी राहिली आहे, पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली आणि प्रबळ रूपात! जो झेंडा घेऊन आंतरराष्ट्रीय कामगार वर्गीय आंदोलनाच्या बटालियन पुढे कूच करत आहेत, तो झेंडा मार्क्सने 1848 मध्ये उचलला होता आणि संपूर्ण आयुष्यभर लढणाऱ्या कामगारांसमोर नेला. आज त्याच झेंड्याखाली कामगार वर्गाची सेना एका पाठोपाठ एक विजयाकडे कूच करत आहे."

### मार्क्स आणि जेनी - क्रांतिकारी प्रेमाचा एक अखंड निर्झर

मार्क्सची जीवनसाथी जेनी वेस्टफॉलन ही नेहमी मार्क्सच्या राजकीय, सामाजिक, वैयक्तिक आयुष्याचा अविभाज्य भाग होती. जेनी आणि मार्क्स लहानपणापासून मित्र होते, एकत्र मोठे झाले, 1843 साली त्यांनी लग्न केले आणि त्यानंतर ते नेहमी एकमेकांसोबत राहिले. एका अभिजात जर्मन परिवारात जन्म घेतलेली जेनी, जिचा भाऊ प्रशियाई मंत्री होता, समतेची अत्यंत आग्रही पुरस्कर्ती होती. कामगारवर्गाच्या सत्ता स्थापनेसाठी तिने स्वतःला वाहून घेतले होते. मार्क्स आणि जेनीच्या आयुष्यात सततचे निर्वासित जीवन, गरिबी, राजकीय घडामोडींमुळे अत्यंत चढउतार आलेत. मार्क्स आणि जेनीची 4 मुलं गरिबीमुळे आजारपणात हवे ते उपचार न घेता आल्याने, निरोगी हवा, प्रकाश यांच्या अभावामुळे दगावली. इतक्या कठीण काळात देखील जेनीने मार्क्स सोबत जीवन जगण्याचा मार्ग सोडला नाही, कारण जेनी सुद्धा मार्क्सप्रमाणेच क्रांतिकारी विचारांना वाहिलेली होती. जेनीची तर्कशुद्ध समीक्षा करण्याची क्षमता आणि बुद्धी यांचा मार्क्स खूप सन्मान करत असे. आपले प्रत्येक नवीन लिखाण मार्क्स जेनीला दाखवत असे व तिच्या सूचनेनुसार त्यात आवश्यक बदलही करत असे. मार्क्सने लिहिलेल्या लेखांचं, पुस्तकांचं, पत्रकांचं प्रेससाठी प्रती तयार करण्याचं, प्रूफरीड करण्याचं काम जेनीच करत असे. कामगार वर्गाच्या तत्वज्ञानाला आणि विज्ञानाला विकसित करण्याच्या कामाचे ऐतिहासिक महत्त्व जेनी अत्यंत सखोलतेने जाणत होती आणि त्यामुळेच मार्क्सचं काम थांबू नये यासाठी शक्य ते सगळे प्रयत्न ती करत होती. मार्क्स आणि जेनीच्या जगलेल्या तिन्ही मुलींनी मार्क्स-जेनी कडून त्यांना मिळालेल्या प्रेमाबद्दल भरभरून लिहिले आहे. मार्क्स-जेनीच्या मुलींनी पुढे जाऊन समाजवादाच्या प्रचार प्रसाराचे काम केले. त्यांच्या काळातील कामगार वर्गीय आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आणि त्यांचे जीवनसाथी देखील ह्याच उद्दिष्टाला समर्पित होते.

मार्क्स आपल्या मुलींसाठी नेहमी एक मित्र होते. मुली त्यांना प्रेमाने 'मूर' म्हणत असत. मुली लहान असताना तासंतास मार्क्स त्यांच्यासोबत खेळत असे. केवळ घरातीलच नाही तर परिचित अनेक लहान मुलांना ते प्रिय होते. मार्क्सच्या काही सहकारी, मित्रांच्या मुलांनी देखील त्यांच्या लाडक्या 'मार्क्स अंकल' बद्दल, त्यांच्या विनोदी, सर्वांमध्ये मिसळून जाणाऱ्या स्वभावाबद्दल लिहिले आहे. मार्क्सचे सहयोगी विल्हेल्म लिबनेख्त लिहितात की ,'ते जेव्हा कामगार, गरीब वस्त्यांमध्ये सभांसाठी, इतर कामांसाठी जात असत तेव्हा नेहमी मार्क्स तिथे उंबरठ्यावर बसलेल्या लहानग्यांना आंजारत, गोंजारत, त्यांच्याशी खेळत बसत. अपार प्रेमाने मार्क्सचे हृदय ओतप्रोत भरलेले होते.' मार्क्स-जेनीचा दुसरा मुलगा मूश दीर्घ आजारानंतर मृत्यू पावला तेव्हा मार्क्स दुःखाने विव्हळ झाले होते. लीबनेख्त लिहितात की त्या दिवशीचे दृश्य ते कधीच विसरू शकत नाहीत. मार्क्स दोन्ही हातांवर डोकं टेकवून उदास कुठेतरी हरवले असल्यासारखे बसून होते, हेलेन रडत होती, जेनी तिन्ही मुलींना जवळ घेऊन अस्वस्थ उभी होती, जणू मूशला त्यांच्यापासून हिरावणाऱ्या मृत्यूपासून तिला तिघी मुलींचे रक्षण करायचे आहे. मुली मौन क्रंदन करत होत्या. मूशला जर समुद्र किनारी, मुबलक निरोगी हवा आणि उजेड असलेल्या जागी राहायला मिळाले असते तर तो जगला असता परंतु निर्वासनाची शिक्षा झाल्यामुळे जीवनात सतत इथून तिथे जाणे, त्या जगण्यातील कठोरता, अनेक आर्थिक अडचणी, ह्या सर्वांत मार्क्स-जेनीचे प्रेम मूशला वाचवू शकले नाहीत. जेनी त्यांच्या एका वर्षाच्या मुलीच्या, फ्रांझिस्काच्या, मृत्यूबद्दल लिहिते की, "तिला गंभीर स्वरूपाचा ब्राँकायटिस झाल्याने खूप वेदना सहन केल्यानंतर तिचा मृत्यू झाला. फ्रांझिस्काच्या, आमच्या लहान-कोवळ्या चिमणीच्या मृत्यूच्या वेळी आमची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. मदत करू शकणारे कोणतेही मित्र जवळपास नव्हते. आमच्या छोट्याशा परीचे निष्प्राण शरीर दोन खोल्यांच्या लहान घरातील मागच्या खोलीत आम्ही ठेवले आणि मी, मार्क्स आणि आमच्या तिन्ही मुली पुढच्या खोलीत एकमेकांना जवळ घेऊन पडून होतो. तिन्ही मुली त्यांच्या लहान बहिणीसाठी रडत होत्या. दुसऱ्या दिवशी जवळ राहणाऱ्या एका फ्रेंच निर्वासित परिचिताकडून मी 2 पाउंड आणलेत आणि त्यानंतर आम्ही आमच्या बाळासाठी कॉफिन घेऊन तिला शांत निपचित पडून राहण्यासाठी एक हक्काची जागा देऊ शकलो. तिचा जन्म झाला तेव्हा तिला पाळणा देखील मिळू शकला नाही आणि मृत्यू झाला तेव्हा मृत्यू नंतर मिळणाऱ्या हक्काच्या जागेसाठी सुद्धा तिला वाट बघायला लागली."

### मार्क्सचा मृत्यू!

कार्ल मार्क्स, वयाच्या 65 व्या वर्षी, 14 मार्च, 1883 रोजी, काम करत असताना खुर्चीत बसल्या जागीच मृत्यूने त्यांना कवेत घेतले. मार्क्सच्या मृत्यूच्या काही महिने अगोदर जेनीचा कर्करोगाने मृत्यू झाला. प्रिय जेनीच्या जाण्यानंतर मार्क्स फार काळ जगू शकले नाहीत. मार्क्सच्या वैज्ञानिक समाजवादाच्या सिद्धांतांवरच स्थित पुढे रशियात (1917 साली) आणि चीन (1949साली) मध्ये क्रांती झाली, कामगारांचे राज्य आले आणि इतिहास घडवला गेला. आज चीन व रशिया कम्युनिस्ट राष्ट्रे नाहीत, कामगारांचे राज्य आज तिथे नाही, परंतु दोन्ही देशांच्या समाजवादी असण्याच्या काळातच त्यांची प्रगत राष्ट्रे म्हणून ओळख निर्माण झाली. विज्ञान, कला अशा सर्वच क्षेत्रांत कामगारांच्या राज्यांनी अभूतपूर्व प्रगती केली. आज भांडवलशाही तिच्या सर्वोच्च अन्यायी, मानवद्रोही, विनाशकारी, नवनिर्माणाची क्षमता नष्ट झालेल्या अवस्थेत पोहचली असताना त्यातून बाहेर येण्याचा, मानवतेला वाचवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मार्क्सवाद!

### आपल्या प्रिय मित्रासाठी एंगल्सचे मृत्यूसमयीचे शब्द

"मार्क्स सर्वात आधी एक क्रांतिकारक होते. आयुष्यात त्यांचे वास्तविक लक्ष्य ह्या नाहीतर त्या मार्गाने भांडवली व्यवस्था आणि तिने उभारलेल्या राज्यसत्तेच्या यंत्रणांना फेकून देण्यात, आधुनिक कामगार वर्गाला मुक्ती देण्यात अधिकाधिक सहयोग देणे हेच होते; कामगार वर्गात स्वतःच्या अस्तित्वाबद्दल आणि गरजांबद्दल, मुक्तीच्या पूर्व अटींबद्दल चेतना निर्माण करणारे ते पहिले व्यक्ती होते. लढणं हा त्यांचा पिंड होता. ते अशा उत्कटतेने, दृढतेने आणि यशस्वीपणे लढले की फार थोडे लोक त्यांना टक्कर देऊ शकले असते. त्यांचे रायनिशे झायटंग (1842), पॅरिस वोरवॉर्ट्स (1844), ड्यूशे ब्रुस्लर झायटंग (1847), न्यू रायनिशे झायटंग (1848 - 49), द न्यू यॉर्क ट्रीब्यून (1852 - 61) ह्या वृत्तपत्रांमधील काम आणि यात आणखीन भर म्हणून अनेक बंडखोर पत्रकांचे लिखाण, लंडन, पॅरिस, ब्रुसेल्स मध्ये संघटनात्मक काम आणि ह्या सर्वांवर जिरेटोप म्हणजे महान आंतरराष्ट्रीय कामगारांच्या संघटनेची (ग्रेट इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन) स्थापना! ही स्वतः मध्येच एक अभिमान वाटण्याजोगी कामगिरी आहे.

आणि परिणामी मार्क्स हा त्यांच्या काळातील शत्रूंकडून सर्वाधिक द्वेष आणि अपमानित केला गेलेला व्यक्ती होता! निरंकुश आणि प्रजासत्ताक दोन्ही सरकारांनी नेहमी मार्क्सला आपल्या राज्यांतून निर्वासित केले. भांडवलदार वर्गात, मग ते पुराणमतवादी असो किंवा अति-लोकशाहीवादी, मार्क्सला अपमानित करण्यात चढाओढ होती. त्याने ह्या सर्वांकडे एखाद्या जळमटाप्रमाणे दुर्लक्ष केले, अतिशय गरज भासल्यावरच त्याने उत्तरं दिली. करोडो क्रांतिकारी साथी आणि सायबेरिया ते कॅलिफोर्नियातील खाणींपासून, युरोप, अमेरिकेतील प्रत्येक भागातून कामगारांच्या मनातील अपार प्रेम, आदर आणि अश्रूंसोबत मार्क्सने मृत्यूशय्येवर विसावा घेतला, आणि मी आज हे निश्चितपणे सांगू शकतो की मार्क्सला अनेक विरोधक होते पण वैयक्तिक शत्रू कुणी नव्हते! मार्क्सचे नाव आणि मार्क्सचे काम युगानुयुग जिवंत राहील!"

# आम आदमी पक्षाचा जनद्रोही इतिहास व भांडवल-धार्जिणे राजकारण : एक दृष्टिक्षेप

पान 1 वरून

एनजीओ आणि साम्राज्यवादी कंपन्यांच्या देणग्यांच्या कुबड्या ल्यायलेले आंदोलन होते आणि व्यवहारात पाहता या आंदोलनाचा हिंदुत्वाच्या विखारी विचाराला वैचारिक विरोध तर नव्हताच; उलट या आंदोलनाला संघ परिवाराचा उघड उघड सक्रिय पाठिंबा होता. या आंदोलनात 'भ्रष्टाचार' या स्वतःमध्ये अमूर्त आणि निरपेक्ष स्वरूपात अर्थहीन असलेल्या मुद्द्याभोवती सामान्य जनतेला संघटित करून देशी व विदेशी भांडवलाच्या संयुक्त विद्यमाने खोट्या प्रचाराचे एक महागडे मृगजळ रचण्यात आले व आजवरच्या सरकारांचा भांडवली भ्रष्ट कारभार ज्या जनतेने जवळून पाहिला होता त्या जनतेच्या हाती 'भ्रष्टाचाररहित व्यवस्था' नावाचे एक आकर्षक लुसलुशीत गाजर देण्यात आले. 'लोकायुक्त' हे पद तयार झाल्यावर भ्रष्ट सरकारी व नोकरशाही यंत्रणेवर जादुई पद्धतीने वचक बसेल व जनतेच्या बहुतांश प्रश्नांची चमत्कृतीपूर्ण पद्धतीने सोडवणूक होईल अशा 'तर्कां'च्या आधारावर उभ्या राहिलेल्या या आंदोलनाने मध्यमवर्गीय शब्दावली व गाभ्यातच 'भ्रष्टाचार'रहित व्यवस्था आणि आदर्श भांडवली समाजाचे खोटे आणि म्हणूनच महागडे प्रतिबिंब उभे केले.

या आंदोलनाचे कित्येक नेते सुरुवातीपासून एनजीओच्या राजकारणामध्ये होते जे की शोषित जनतेकडे छोट्यामोठ्या सुधाराचे तुकडे भिरकावून जनतेचे लक्ष त्या विपन्नतेच्या मूळ कारणाकडे म्हणजे वर्गीय व्यवस्थेच्या वास्तवाकडे जाऊ देत नाही. केजरीवाल 'परिवर्तन', तर सिसोदिया 'कबीर' नावाची एनजीओ चालवत होते आणि दोघांना विदेशी फंडिंग एजन्सी कडून पैसा मिळत होता. इतर नेत्यांचे इतर जागी संबंध होते. आपचे एक पक्ष म्हणून सरळ सरळ अशा कित्येक एनजीओसोबत संबंध आहेत जे की सुधारवादाचे घृणीत राजकारण जनतेत पसरविण्याचे काम करतात. पक्षीय राजकारणात उतरण्याआधी अशा प्रकारच्या संधीसाधू व्यवहारवादी राजकारणात लिप्त असणाऱ्या या शासक-वर्गीय विचारकांकडून पुढे जाऊन प्रतिगामी राजकारण करण्याशिवाय अपेक्षाच काय केली जाऊ शकते?

## आम आदमी पक्ष आणि भ्रष्टाचार: भांडवली व्यवस्थेत भ्रष्टाचार उन्मूलन शक्य नाही, ही व्यवस्थाच स्वतः एक भ्रष्टाचार आहे.

"राजकीय क्रांती"च्या बाता करणाऱ्या 'आप'ने आपल्या सुरुवातीच्या काळात 'भ्रष्टाचार-भ्रष्टाचार' म्हणत रान माजवले होते. पण त्याचाच भ्रष्ट कारभार आज जगासमोर आहे. काही दिवसांपूर्वी पंजाबमध्ये भ्रष्टाचारप्रकरणी 'आप'च्या विजय सिंगला या आरोग्यमंत्रीपदी असणाऱ्या मंत्र्याला अटक झाली. आपचे पंजाबातील आमदार अमित रतन यांनाही नुकतीच लाचप्रकरणी अटक झाली आहे. विरोधकांकडून 'दिल्ली पॉवर सबसिडी स्कीम'मध्ये 8000 कोटींचा घोटाळा करण्याचे आरोप आता केजरीवाल सरकारवर होत आहेत. दिल्लीमध्ये मनिष सिसोदियांना झालेली दारू ठेकाप्रकरणीची अटक असो वा यांचेच मंत्री सत्येंद्र जैन यांना झालेली अटक असो, याचीच साक्ष आहेत की 'आप' सुद्धा इतर भांडवली पक्षांप्रमाणेच एक पक्ष असू शकतो. या कारवायांमागे भाजपने चालवलेले राजकीय सूडचक्र आहे, परंतु भाजप असो वा आप वा काँग्रेस, अशा सर्व पक्षांनी एखाद्या भांडवलदार लॉबीच्या हिताचे "धोरणात्मक" निर्णय घेण्यातच यांचा भ्रष्ट कारभार समाविष्ट असतो, आणि आपसात त्यांनी एकमेकांविरूद्ध



कारवाया केल्यामुळे यांच्या गुन्हेगारी कारवायांना प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र मिळत नाही!

'स्वच्छ' राजकारणाचा दंभ मिरवणाऱ्या आपमध्ये गुन्हेगारांचा भरणा आहे. नुकत्याच निवडल्या गेलेल्या पंजाब विधानसभेत 92 पैकी 52 आमदारांवर गुन्हेगारी खटले आहेत, ज्यापैकी 23 आमदारांवर गंभीर स्वरूपाचे (भ्रष्टाचार, बलात्कार, खून, अपहरण, 5 वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असलेले, इत्यादींपैकी) खटले आहेत. आता कोण स्वच्छ आणि कोण अस्वच्छ याचे प्रमाणपत्र वाटणाऱ्या 'आप'चे असे आकडे पाहून अनेकांच्या भुवया उंचावू शकतात.

> **23 आमदारांवर गंभीर स्वरूपाचे (भ्रष्टाचार, बलात्कार, खून, अपहरण, 5 वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असलेले, इत्यादींपैकी) खटले आहेत.**

भांडवली राजकारणामध्ये 'नैतिक आचरण' वगैरे या देखील आपच्या गप्पाच आहेत. एकतर वैयक्तिक इमानदारी आणि सत्यनिष्ठतेतून भांडवली राजकारणात काही विशेष निष्पन्न होत नाही कारण ते राजकारण हे मुख्यतः शोषण करणाऱ्या भांडवलदार वर्गाची आपापसातील रस्सीखेचच असते. तिथे इमानदारीचा अर्थ असतो व्यवस्थेप्रती व या व्यवस्थेतील प्रभू-वर्गाप्रती इमानदारी!! इथे अधिकाधिक शिताफीने खोटे बोलण्याची क्षमता सुद्धा भांडवली राज्यसत्तेतील व्यक्तीचे स्थान ठरवते कारण शोषणाचे जे वास्तव लपवायचे आहे ते एक अक्राळविक्राळ वास्तव आहे! तिथे प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठ असणे हे वैयक्तिक आणि सांघटनिक दोन्ही हितांना बाधक आहे. जो खोट्या शासक वर्गीय विचारांचे अधिकाधिक परिष्करण करू शकेल आणि त्याला प्रभावीरित्या जनतेत रुजवू शकेल तो शासक वर्गासाठी इष्ट राजकीय पर्याय असतो.

भाजपा ज्या प्रकारे राष्ट्रभक्ती प्रमाणपत्राचे वाटप करते तसे आप प्रामाणिकपणाच्या प्रमाणपत्राचे वाटप करते आणि दोघांना तर्क आणि वास्तवाचे समतुल्य अधिष्ठान आहे आणि ते म्हणजे दोघांच्या शून्यतेचे! भाजपामध्ये गेल्यावर पूर्वाश्रमीचा तथाकथित देशद्रोही व्यक्ती देशभक्त होतो आणि आप मध्ये गेल्यावर बेईमान व्यक्ती बनतो इमानदार!!

भांडवली व्यवस्थेत भ्रष्टाचार हा इतका सर्वव्यापी आणि सामान्य असतो की इथे व्यक्तींच्या रोजच्या जगण्यात तो सामील असतो. एका नफा, लोभ आणि लबाडीवर चालणाऱ्या आणि व्यक्तीला स्व-केंद्री बनवणाऱ्या व्यवस्थेत भ्रष्टाचार काही अपघात किंवा गैरजरूरी गोष्ट नसून आवश्यक परिघटना आहे. ज्या व्यवस्थेत कामगाराच्या श्रमातून निर्माण झालेली संपत्ती मालकाची बनते, जिथे उत्पादन प्रक्रियाच लूट असते, जिथे कायदाच लुटीला मान्यता देणारा असतो, तिथे "कायदाबाह्य" कमाई व्यवस्थेचाच भाग असते. खरेतर कामगार वर्गाच्या शोषणावर उभ्या असलेल्या या व्यवस्थेचे राजकीय पाईक बनणे व त्या गलिच्छ राजकारणापासून लाभान्वित होणे हा कोणत्याही नैतिक पातळीवर एक भ्रष्टाचारच मानला पाहिजे. तुरळक लाभ देणारे कित्येक कामगार कायदे सुद्धा आज अंमलबजावणीखेरीज धूळ खात पडून आहेत. कित्येक हॉस्पिटल्स, शाळा, महाविद्यालये इत्यादी या व्यवस्थागत भ्रष्टाचाराचे व भांडवली नेत्यांच्या खादाडपणाचे भक्ष्य बनले आहेत. 'आम आदमी पक्षा'ला एक पक्ष म्हणून आणि 'आप'च्या नेत्यांना व्यक्ती म्हणून, राजकारणी म्हणून भ्रष्टाचार करून, लबाड्या करून पुढे जाण्याची, विकास करण्याची उद्दीपने या व्यवस्थेत उपस्थित आहेत, आणि त्यामुळेच आज (लौकिकार्थाने) इमानदार असलेला व्यक्ती जेव्हा रोज धनिकांचे खिसे भरायचे काम करत जातो, तेव्हा इमानदारीच्या आवश्यकतेवर तो स्वत:च प्रश्नही उपस्थित करत जातो. 'आप'चे अनेक नेते स्वत: भांडवलदार आहेत, आणि म्हणूनच ते भ्रष्टाचाराचे निर्मातेही आहेत. ही स्पर्धेवर उभी असणारी व नफ्यावर चालणारी व्यवस्था ती भौतिक परिस्थिती आहे जी भ्रष्टाचाराला जन्म देते. म्हणूनच या व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार उन्मूलनाबद्दल बोलणे हे म्हणूनच एकतर बालिशपणाचे आहे अथवा धूर्तपणाचे आहे कारण भांडवली व्यवस्थेत भ्रष्टाचार उन्मूलन शक्य नाही, ही व्यवस्थाच स्वतः एक भ्रष्टाचार आहे.

## 'दिल्ली मॉडेल'ची वास्तविकता

ज्या 'दिल्ली मॉडेल'ला देशभरात व जगभरात मीडियाकडून प्रचारीत केले जात आहे त्याचे वास्तव आता जगासमोर उघड होत आहे. ज्या दिल्लीच्या आरोग्य मॉडेलचा हवाला आणि 'तथ्ये' देताना दिल्ली सरकार थकत नाही त्या दिल्लीमध्येच हजारोहजार सामान्य जनतेला साध्या इलाजासाठी सहन करावा लागलेला मनस्ताप आणि मोजावी लागलेली किंमत आपण कोरोना काळात पाहिलीच. क्लिअरन्स मिळून सुद्धा कित्येक सरकारी दवाखान्याचे प्रोजेक्ट्स पडून आहेत. या प्रकारची दिरंगाई सामान्य जनतेप्रती असलेले शासनाचे असंवेदनशील चरित्रच दर्शवते. केजरीवाल सरकारकडून 'मोहल्ला क्लिनिक'बद्दल ही भलामोठा भ्रमाचा महाल खडा केला गेला पण तो देखील जमीनदोस्त झाला. या 'मोहल्ला क्लिनिक'मध्ये नवीन डॉक्टर्स अथवा कर्मचाऱ्यांची भरती न करता आधीपासून सेवारत असलेल्या कर्मचाऱ्यांनाच तिथे राबवण्यात येत होते. परिणामी हे मोहल्ला क्लिनिक्स बंद पडत गेले. आता या मोहल्ला क्लिनिक्सची अशी अवस्था आहे की ती बहुतांश वेळा उघडतच नाहीत, उघडली तरी तिथे डॉक्टर्स, नर्स अथवा इतर सुविधांचा बहुतांशी अभावच दिसून येतो. दिल्लीतील सरकारी शाळा, महाविद्यालये, विद्यालये व इतर शासकीय संस्थांची स्थिती सुद्धा जेमतेम फरकाने हीच म्हणावी लागेल. दिल्लीतील ठीकठाक आर्थिक स्थिती असलेल्या क्षेत्रांमध्ये काही 'मॉडेल' शासकीय विद्यालयांची स्थापना केली गेली ज्यांचा प्रचार अशाप्रकारे केला गेला की जणू काही जागोजागी गल्लोगल्ली अशा शैक्षणिक संस्था उभ्या केल्या गेल्या आहेत आणि आता दिल्लीतील शिक्षण व्यवस्था पूर्णतः बदलून गेली आहे! नवी शैक्षणिक क्रांतीच जणू काही होऊ घातली आहे या थाटामाटात स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर याचा बोभाटा केला गेला. वास्तविक जमिनीवर अशी स्थिती आहे की अनेक ठिकाणी फक्त काही वर्गखोल्या बनवल्या गेल्या आहेत आणि त्यांचा प्रचार शाळा, विद्यालये बनवून जनतेला अर्पित केल्याच्या थाटात केला जात आहे. कामगार-कष्टकऱ्यांच्या वस्त्यांमध्ये शिक्षणाची स्थिती पूर्वीप्रमाणेच आहे आणि शाळासुधार मुखत्वे मध्यम व निम्न-मध्यम इलाक्यांपुरता सीमित आहे. स्थिती अशी आहे की जेवढ्या शाळा-महाविद्यालयांच्या स्थापनेची हवाई आकडेवारी केजरीवाल सरकारकडून प्रकाशित केली गेली त्यांचा ह्या पृथ्वीतलावरील पत्ता मागितल्यावर देखील हे सरकार निरुत्तर आहे.

> **पाणी, वीज आणि इतर सुविधा ज्या मोफत देण्याचा निर्लज्ज दावा केला जात आहे तो जनतेच्या पाठीवर करवाढीचे आसूड चालवूनच!**

दर महिन्याला 200 युनिट्स पर्यंत मोफत वीज पुरवठा करण्याचा सरकारचा अजून एक अस्मानी दावा आहे पण त्या दाव्याच्या पोटात गेल्यावर हा सुद्धा हवाई दावाच असल्याचे समजते. आपच्या सरकारने दिल्लीमध्ये काँग्रेसने लागू केलेल्या वीज वितरणाच्या खाजगीकरणाच्या धोरणाला लागू करतच त्याला पुढे नेण्याचे धोरण अवलंबले आहे. अंबानी आणि टाटासारख्या उद्योगपतींकडून सरकार अजूनही तेवढ्याच चढ्या किमतींवर वीज विकत घेत आहे आणि जनतेला 200

पान 15 वर

# आम आदमी पक्षाचा जनद्रोही इतिहास व भांडवल-धार्जिणे राजकारण : एक दृष्टिक्षेप

पान 14 वरून

युनिट्स पर्यंत 'मोफत' वीज पुरवण्यासाठी या कंपन्यांना ज्या सबसिडी देत आहेत त्या पण सामान्य कष्टकरी-कामगार जनतेच्या घामाच्या कमाईवर लावलेल्या वेगवेगळ्या करांतून प्राप्त पैशांतूनच तर येत आहेत. पाणी, वीज आणि इतर सुविधा ज्या मोफत देण्याचा निर्लज्ज दावा केला जात आहे तो जनतेच्या पाठीवर करवाढीचे आसूड चालवूनच!

## आप व भांडवली मिडियाचे फसवे प्रचारतंत्र

या 'क्रांतिकारी' 'दिल्ली मॉडेल'ला 'वास्तवात' उतरवण्यासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च हा जाहिरातबाजी वर करण्यात आला जेणेकरून नव्हत्याचे होते करून सांगता येईल. 2021-22 या वर्षामध्येच जवळपास 490 कोटी रुपये फ्लेक्सबाजी आणि जाहिरातबाजीवर खर्च केले गेले. ही स्पष्टपणे जनतेच्या पैशाची उधळपट्टी आहे. यातून आपल्याला भांडवली 'लोकशाही'च्या अमानुष अंतर्वस्तूचे, गाभ्याचे दर्शन घडते जिथे एकीकडे सामान्य जनता भयंकर शोषण आणि दमन सहन करत असताना दुसरीकडे ही भांडवली सरकारे आपल्या प्रतिमा-निर्मितीत मध्ये व्यस्त आहेत.

माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार पंजाब मध्ये सत्तेत आल्यावर 'आप'कडून वर्तमानपत्रे, रेडिओ, न्यूज चॅनल इत्यादींच्या माध्यमातून "पब्लिक परसेप्शन" (जनतेचे मत) बनवण्यासाठी पहिल्या दोन महिन्यांतच 37.36 कोटी रुपयांचा धुव्वा उडविण्यात आला. भ्रामक जाहिरातबाजीमध्ये हजारोहजार कोटी उडविण्यात तर आज अरविंद केजरीवाल साक्षात मोदींना टक्कर देताना दिसत आहेत.

'आम आदमी पक्ष' हा पुढे जाऊन किती 'आम आदमी'चा पक्ष आहे आणि किती 'खास आदमीं'चा हे व्यवहारातून दिसून आलेच. भांडवली पक्ष कितीही 'लोककल्याणाचे' मुखवटे लेऊन आला तरी त्याचे स्वतःचे राजकारणच त्या मुखवट्यांना फाडायचे काम करते. मग गरज पुन्हा हीच बनते की मुखवट्यांना वारंवार चढवलं जावं, वास्तवावर वारंवार पडदा टाकला जावा, पाणी वारंवार गढूळ केलं जावं. याच निर्धारित कामाला पूर्णत्वास नेण्यासाठी आज भांडवली मीडिया सामान्य जनतेला पायदळी तुडवत आपल्या मालकांच्या सेवेत लागलेला आहे. कधी केजरीवाल, कधी मोदी, तर कधी ममता अशा बहुविध रूपांनी, नानाविध नावांनी मालक वर्गाची निर्लज्जपणे राजकीय पाठराखण करणाऱ्या चेहऱ्यांना भांडवली मीडिया वेळोवेळी मालक वर्गाच्या दूरगामी हित-सिद्धी व त्यातील तत्कालीन अंतर्विरोध यांना लक्षात घेता प्रसिद्धीच्या आकाशावर चढवतो वा कधीकधी जमिनीवर देखील आपटतो. पण कामगारवर्गाशी व खऱ्या अर्थाने जनतेच्या हिताच्या राजकारणाशी याचे नाते हे शत्रुत्वाचेच असते. भांडवलाच्या माऱ्याने पीडित आक्रोशित जनतेच्या अनेक स्वतःस्फूर्त आंदोलनास या भांडवली मीडिया संस्थानांनी व आंदोलनाच्या संधिसाधू नेतृत्वकारी शक्तींनी सचेतन प्रयत्न करत व्यवस्थेअंतर्गत संकुचित मागण्यांमध्येच मर्यादित ठेवले, आणि व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करण्याकडे जाऊ दिले नाही. 'अण्णा' आंदोलनाच्या काळात, भांडवलदार वर्गाने आपल्या प्रसारमाध्यमांमार्फत कोट्यवधी रुपयांचा खुर्दा करून 'आप'च्या राजकारणाला प्रस्थापित करण्याची जमीन तयार केली. 'लोककल्याणाच्या' नावावर भांडवली लूट व शोषणावर पडदा टाकण्यात व आदर्श शोषणकारी व्यवस्थेचा हास्यास्पद भ्रम जनतेच्या माथी मारण्यात 'आप'ला लाभलेली भांडवली प्रसारमाध्यमांची व भांडवलाची साथ विलक्षण महत्त्वाची होती. यातून जणू काही स्वतंत्र भारताचा इतिहास याच दिवसाची वाट पाहत होता अश्या पद्धतीचा भ्रम रचला गेला. सीएए-एनआरसी विरोधी आंदोलनात 'आप'ने घेतलेली जनविरोधी भुमिका असो, वा वेळोवेळी दिल्लीमध्ये उभी राहिलेली इतर ही कामगार आणि कष्टकरी जनतेची आंदोलनांचे दमन असो, यामध्ये केजरीवालची प्रतिगामी आणि दमनकारी भूमिका व त्याला लाभलेली मीडिया प्रचाराची साथ या समन्वयाची धडधडीत उदाहरणे आहेत.

## 'आप'चे कामगार-विरोधी चरित्र

दिल्ली मॉडेलच्या गप्पा करणाऱ्यांनी येऊन बघावे की दिल्लीतील कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनाची स्थिती कशी हलाखीची आहे. कारखान्यांमध्ये श्रम-कायदे लागू होत नाहीत (अनेक कारखाने तर खुद्द आपच्या आमदार-मंत्र्यांचे आहेत!), नियमितपणे अपघातांमध्ये, आगी लागून कामगारांचे मृत्यू होत राहतात, किमान मजुरी वाढवल्याच्या गप्पा केल्या जातात, पण ती जमिनीवर दिसून येत नाही! कंत्राटी मजुरीविरोधात केलेल्या आंदोलनापासून ते दिल्ली अंगणवाडी कामगारांच्या आंदोलनाच्या दमनाचा इतिहास हेच दाखवतो की केजरीवाल कामगारांना दडपण्यात भाजपपेक्षा कुठेही मागे नाही!

**अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा ऐतिहासिक संप: भाजपने नेमलेल्या लेफ्टनंट गव्हर्नर सोबत मिळून हेस्मा कायदा लावण्यात आला**

'आप'च्या उदयापासून ते विचारधारा आणि राजकारणापर्यंत हा पक्ष नेहमीच भांडवलदारांचे हितरक्षण करणारा असल्याचेच पदोपदी सिद्ध होत राहिले आहे. याचवर्षी झालेला अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा ऐतिहासिक संप चिरडण्याचे उदाहरण तर अगदी ताजे आणि डोळ्यांदेखत घडलेले आहे. यावेळी संघर्षात सहभागी लोकांवर भाजपने नेमलेल्या लेफ्टनंट गव्हर्नर सोबत मिळून हेस्मा (HESMA, हरियाणा आवश्यक सेवा नियमन कायदा) कायदा लावण्यात आला ज्याद्वारे दिल्ली सरकार संपाला बेकायदेशीर ठरवून कर्मचाऱ्यांना तुरुंगात टाकू शकत होती. यावेळी आंदोलन तोडण्यासाठी केजरीवाल सरकारकडून योजण्यात आलेल्या वेगवेगळ्या क्लृप्त्या, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वारंवार दिल्या गेलेल्या धमक्या, या वेळी झालेले कार्यकर्त्यांचे अटकसत्र आणि त्यांना पोलिसांकडून ज्या दमनाला सामोरे जावे लागले ते तर दृश्यमानच होते.

यापूर्वी देखील वेळोवेळी झालेल्या जनतेच्या आंदोलनांना क्रूरपणे चिरडणे हा कोणत्याही सत्तासीन भांडवली राजकीय पार्टी सारखाच आपचा पण इतिहास राहिला आहे. लोकरंजकतावादी फसव्या नाऱ्यांना घेऊन आप सत्तेत येताना त्याने कामगार आणि कष्टकरी वर्गाला काही वचने दिली होती. त्यातील एक की सर्व कामगार कायदे लागू केले जातील, कामगारांना किमान वेतन दिले जाईल व नियमित पद्धतीच्या कामांतून कंत्राटी-पद्धत बंद केली जाईल, दिल्ली सरकारमध्ये रिक्त असलेल्या 55 हजार पदांवर भरती केली जाईल इत्यादी, इत्यादी. दिल्ली सरकारचा स्मृतिभ्रंश संपवण्यासाठी या वचनांची आठवण करून देण्यासाठी 25 मार्च 2015 रोजी दिल्ली सचिवालयावर हजारो कामगार येऊन थडकले तेव्हा या जनसागराला दाबण्याचा केजरीवाल आणि मोदींनी संयुक्त घाट घातला अन् कामगारांवर पोलिसांकरवी लाठीचार्ज व हवाई गोळीबार करण्यात आला.

## 'आप'चे हिंदुत्वाप्रती असलेले प्रेम

चलनी नोटांवर लक्ष्मी व गणेशाच्या प्रतिमा छापण्याचे हल्लीच केलेले हास्यास्पद वक्तव्य असो, जातीय अभिमानातून आलेले बनिया असण्यावरील वक्तव्य असो, हनुमान चालीसा पाठ असो, जनतेच्या आंदोलनांना दडपण्यासाठी हिंदुत्ववादी फासीवादी मोदी सरकारसोबत केलेली हातमिळवणी असो, कित्येक उदाहरणे आहेत जी आपचे लोकशाही व धर्मनिरपेक्षता विरोधी चरित्र दर्शवण्यासाठी पर्याप्त आहेत. या व्यतिरिक्त याचाच आणखी एक प्रत्यय आला जेव्हा दिल्लीतील आप सरकारमधील तत्कालीन मंत्री राजेंद्र पाल गौतम यांना बौद्ध धर्मामध्ये धर्मांतरणाच्या एका सामूहिक कार्यक्रमात उपस्थित राहून तिथे हिंदू 'देवी-देवतांचा' अपमान करण्याबद्दल गोदी मीडिया व संघी हिंदुत्ववाद्यांकडून लक्ष्य करण्यात आले त्यावेळी देखील आम आदमी पार्टी पुन्हा मूग गिळून गप्प राहिली, किंबहुना ती शांतताच काही खूप स्पष्ट सांगत होती. यानंतर गौतमना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

**राम मंदिर जमिन घोटाळ्यात यांनी भ्रष्टाचाराला मुद्दा न बनवता असे म्हटले की यामुळे 115 कोटी हिंदूंच्या आस्थेला ठेच लागत आहे!**

सीएए-एनआरसी विरोधी आंदोलनादरम्यान या पक्षाने व केजरीवालने घेतलेल्या संधीसाधू भूमिका देश कधीच विसरू शकत नाही. 'आप'ने कधीच या दोन्ही कायद्यांना विरोध केला नाहीच, उलट केजरीवालने म्हटले की दिल्ली पोलिस जर आमच्या ताब्यात असते तर एका तासात शाहीन बाग रिकामी केली असती. सोबतच संपूर्ण आंदोलनात उमर खालिद आणि इतर कार्यकर्त्यांच्या अटकेमध्ये त्यांनी भाजपचे समर्थनच केले. यांचा 'खरा-राष्ट्रवाद' सुद्धा दिसला, जेव्हा यांनी कलम अत्यंत गैर-लोकशाही पद्धतीने कलम 370 रद्द करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले आणि म्हटले की यामुळे काश्मिरचा विकास होईल. राम मंदिराच्या प्रश्नावरही यांनी सतत भाजपच्या सुरात सुर मिसळला आहे, आणि इथपर्यंत की राम मंदिर जमिन घोटाळ्यात यांनी भ्रष्टाचाराला मुद्दा न बनवता असे म्हटले की यामुळे 115कोटी हिंदूंच्या आस्थेला ठेच लागत आहे! आश्चर्याची गोष्ट नाही की हा पक्ष राम मंदिराच्या यात्रा आयोजित करत आहे.

मतांच्या ध्रुवीकरणाच्या खेळासाठी कधीच निर्णायकपणे धार्मिक अतिरेकपंथाच्या विरोधात न जाता, उलट अधून-मधून त्या दुराभिमानाला कुरवाळत केजरीवाल आणि कंपनी सत्तासन कवटाळून आहे. आजचे एकंदरीत राजकारण पाहता त्यात टिकण्यासाठी व भांडवलदार वर्गाचे अधिकाधिक समर्थन मिळवण्यासाठी केजरीवालचे हिंदुत्वाच्या राजकारणात उतरणे क्रमप्राप्त होते. आज कमीअधिक फरकाने उदारवादी म्हणवणाऱ्या राजकीय पक्षांचा हिंदुत्व व एकंदरीत प्रतिक्रियावादी राजकारणाशी असलेला अन्योन्य संबंध हा उघडच आहे आणि भांडवलशाहीच्या संरचनात्मक संकटाच्या काळात हा संबंध भांडवलदार वर्गासाठी गरजेचा बनतो.

आपचे हिंदुत्वाचे आणि जातीवादाचे धोरण नेहमीच शासक वर्गाच्या अखत्यारीत एका जनविरोधी अस्त्राचे काम करत आले आहे आणि करत राहील. म्हणूनच, 'आप' किती ही 'व्यवस्था' परिवर्तनाच्या बाता करू देत पण वास्तविकरित्या तो व्यवस्थेसाठी 'सेफ्टी वॉल्व्ह'चे काम करतो आणि भांडवलशाही व्यवस्थेचा दूरचा संरक्षक-सेवक आहे आणि म्हणून एका अर्थी जास्त घातक व यथास्थितीवादी आहे. कारण, सामान्य जनतेसमोर तो जाती आणि धर्म यांना घेऊन तेवढ्या भोंगळ स्वरूपात बाहेर येत नाही जेवढे की भाजपा व इतर काही स्थानिक-क्षेत्रीय पक्ष संघटना करतात. तो कल्याणकारी मुखवटा लेवून जनतेत जातो.

## 'आप': भांडवलदार वर्गाचा एक चलाख पक्ष

राजकारणातील 'गुड बॉय'ची प्रतिमा जी केजरीवालने भांडवलाच्या मदतीने बनवण्यात एका अंशी यश मिळवले आहे, त्याचादेखील 'आप'ला राजकीय फायदाच होतो. परिवर्तनाची आशा मनात घेऊन असणाऱ्या पण राजकारणाकडे पाहण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन नसलेल्या लोकांना मग केजरीवालमध्ये आशा दिसू लागते. अशा रीतीने आप हे भांडवलदार वर्गाच्या दृष्टीने जास्त दूरगामी दृष्टी असलेले संघटन आहे. फाशीवादाच्या काळात लोक 'तुलनेने कमी वाईटा'कडे आकृष्ट होतात कारण क्रांतिकारी पर्यायाच्या सक्षम अनुपस्थितीत तोच अधिक सोपा व तात्कालिकदृष्ट्या योग्य पर्याय भासतो. उदारमतवादी लोकांना या पद्धतीचे 'तत्काळ उत्तर' 'तत्काळ फायद्या'साठी पण गरजेचे असते.

परंतु, जसे आम्ही वारंवार सांगत आलो आहोत, कामगार-कष्टकरी वर्ग आणि व्यापक जनतेचे खरे हित हे त्यांच्या एकतेत आहे, संघटित होऊन योग्य कामगारवर्गीय विचारधारेशी प्रतिबद्धता पाळून केलेल्या संघर्षात आहे, वर्ग-संघर्षात आहे, ना की जाती-पातीच्या तुच्छ लढ्यांत स्वतःला मारून-कापून संपविण्यात वा क्षुद्र सुधारवादाच्या नादी लागून क्रांतिकारी राजकारण त्यागण्यात! कामगार कष्टकरी वर्गाने आणि समस्त जनतेने हे जाणले पाहिजे की अरविंद केजरीवालसारखे जनतेच्या रक्ताने नाक-गाल लाल करून लोकरंजन करणारे विदूषक हे तोवर उभे राहतच राहतील जोवर जनतेच्या संघटित संघर्षाच्या जोरदार लाटा या सुकलेल्या-वाळलेल्या रक्ताला धुवून काढत नाहीत; शोषणच्या बळावर तगलेल्या या व्यवस्थेच्या महालाच्या भिंती जनतेच्या क्रोधाग्नीमध्ये जळून भस्मसात होत नाहीत आणि मानवकेंद्रित समाजव्यवस्था नव्याने उभारली जात नाही!!

# अदानी समूहाचा लाखो कोटी रुपयांचा घोटाळा! मोदी सरकारच्या भ्रष्ट कारभाराची परिसीमा!

✎ सुस्मित

मोदी सरकारबद्दल आणि अदानीबद्दल इतके वर्षे राजकीय टीकेमध्ये सतत मांडलेच जात होते, ते आता अर्थजगतात जगजाहीरपणे मांडले जात आहे. अदानी उद्योगसमुहाच्या आणि त्यामागून मोदी सरकारच्या भ्रष्ट कारभाराचे बिंग आता जागतिक स्तरावर फुटले आहे. हिंडनबर्ग या अमेरिकेतल्या संशोधन संस्थेने गेली दोन वर्षे अभ्यास करून अदानी समुहाबद्दल एक अहवाल उघड केला आणि त्यानंतर अदानी समुहाचे शेअर बाजारातील भाव गडगडले, बाजारमूल्य 11 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्तने घटले आहे, लाखो लोकांनी गुंतवलेला पैसा बर्बाद झाला, बँका आणि एल.आय.सी. सारख्या जनतेचे पैसे "सांभाळणाऱ्या" संस्था धोक्यात आल्या आहेत, परंतु भाजपने आणि मोदी सरकारने मात्र याबद्दल थोडीही कारवाई केलेली नाही आणि विरोधाचे आवाज दाबण्याचेच काम चालवले आहे.

या अहवालामध्ये कशाप्रकारे अदानी समूह गेली दहा वर्षे भ्रष्टाचार, हिशेबाचे फेरफार आणि घोटाळ्यांमध्ये गुंतला आहे हे दाखवले आहे. या 32,000 शब्दांच्या अहवालात अनेक घोटाळ्यांचा पर्दाफाश केला आहे. तसेच यामध्ये सर्व स्तराच्या सरकारी नोकर, राजकारणी यांचा सहभाग होता हे उघड झाले आहे. इतकेच नाही तर कोर्टांनी सुद्धा अदानी समूहाच्या बाजूने कित्येक निर्णय दिले आहेत ज्यामुळे न्यायपालिकेचे वर्गचरित्र सुद्धा स्पष्ट होते. अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांच्या जवळचे समजले जातात. मोदी सरकारचे अदानी समुहाला असलेले समर्थन इतके मोठे होते, की अहवाल उघड होण्याअगोदर गौतम अदानी हा जगातल्या सर्वात श्रीमंतांच्या यादीत तिसऱ्या स्थानी होता. 2014 मध्ये काँग्रेसच्या भ्रष्टाचाराला विरोध करत सत्तेत आलेले फासीवादी मोदी सरकार भ्रष्टाचारात आणि जनतेला लुबाडण्यात काँग्रेस इतकेच किंबहुना अधिकच बुडालेले आहे हे एकदम स्पष्ट होते.

## कोण आहे हिंडनबर्ग संशोधन संस्था?

भांडवलदार वर्गाची आपसात सतत स्पर्धा सुरू असते, आणि त्याकरिता त्याचे विविध हिस्से वेगवेगळ्या उद्दिष्टांनी विविध प्रकारच्या संस्था उभ्या करतात. हिंडनबर्ग ही अशीच एक नफ्यासाठी चालणारी, परंतु इतर उद्योगांच्या 'लबाड्या' उघडकीस आणणारी एक संस्था. हिंडनबर्ग ही आर्थिक क्षेत्रात संशोधन करणारी संस्था असून मुख्यत: इक्विटी म्हणजे एखाद्या कंपनीत कुणाची किती मालकी आहे, क्रेडिट म्हणजे व्यक्तींचे किंवा कंपन्यांनी घेतलेले कर्ज, आणि डेरीव्हेटिव्स म्हणजे शेअर बाजारातील शेअर्समधून बनवलेले इतर आर्थिक उत्पाद, यांचा अभ्यास करते. कंपनीच्या म्हणण्यानुसार ज्याप्रकारे 1937 मध्ये अमेरिकेमध्ये हिंडनबर्ग नावाच्या एअरशिपचा अपघात झाला होता त्याचप्रकारचे बाजारातले मानवनिर्मित अपघात रोखण्यासाठी ही कंपनी काम करते. यासाठी हिंडनबर्ग कंपन्यांच्या खात्यातले गैरव्यवहार, भ्रष्टाचार, उघड न केलेले व्यवहार, बेकायदेशीर उद्योग इत्यादी गोष्टींचा अभ्यास करते. एवढेच नाही तर कंपनी स्वत: सुद्धा बाजारात भांडवल गुंतवते आणि शॉर्ट सेलिंग करते. शॉर्ट सेलिंग म्हणजे स्टॉक मार्केट मधले दलाल एखाद्याकडून शेअर उधार घेतात, तो सध्याच्या चढ्या भावाला विकतात या आशेने की लगेचच भाव कोसळतील, आणि नंतर भाव कोसळल्यावर कमी किमतीला तोच शेअर घेऊन परत



करतात. यामध्ये शेअरची किंमत भविष्यात कमी होईल असे गृहीतक असते. अदानी समुहावर केलेल्या अभ्यासानंतर हिंडनबर्गने अदानी समूहावरसुद्धा शॉर्ट सेलिंग केले आहे. असे शॉर्ट सेलिंग करून हिंडनबर्ग पैसा कमावण्याचे काम करते. थोडक्यात, हिंडनबर्ग सुद्धा एक नफेखोर, भांडवली उद्योगच आहे!

## अदानीबद्दल बाहेर आलेली गंभीर तथ्ये व निष्कर्ष: जनतेचे पैसे धोक्यात!

अदानी उद्योगसमूह हा भारतातील सर्वात प्रमुख उद्योग समूहांपैकी एक आहे. या समूहाची काही दिवस अगोदर शेअर बाजारातली किंमत 17.8 लाख कोटी होती. गौतम अदानी ह्या उद्योग समूहाचा प्रमुख असून जगातल्या श्रीमंतांच्या यादीमध्ये तिसऱ्या स्थानी तो होता. गौतम अदानी आणि त्याच्या कुटुंबियांची कागदावर संपत्ती 14 लाख कोटी इतकी दिसत होती. विशेष म्हणजे यातली 8 लाख कोटी इतकी संपत्ती गेल्या 3 वर्षात वाढली आहे. यात शेअर बाजारातील स्टॉकची किंमत अतिप्रचंड वाढल्याचा मोठा परिणाम आहे.

अदानी समूह वर सांगितल्याप्रमाणे अनेक क्षेत्रात कार्यरत आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचे प्रकल्प म्हणजे बंदर, खाणी, विमानतळे, डेटा सेंटर्स, ऊर्जा निर्मिती आणि पारेषण यांचा समावेश होतो. वर सांगितल्याप्रमाणे अनेक कंपन्यांचे शेअर भाव अतिप्रचंड वाढले आहेत. यात अदानी टोटल गॅस गेल्या तीन वर्षात 2121% वाढला, अदानी इंटरप्राईज 1398% ने, अदानी ग्रीन एनर्जी 908% ने वाढला, अदानी ट्रान्समिशन 729% वाढला आहे. शेअरची किंमत इतकी अवाढव्य वाढत असताना अदानीच्या उत्पादनात निश्चितपणे तुलनेने नाममात्र वाढच झाली होती. थोडक्यात सट्टेबाजीचा यात वाटा खूप मोठा होता.

अदानी समूहाने जाहीर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास केला तर हा समूह 85 टक्के ओव्हरव्हॅल्युड आहे म्हणजे शेअरच्या वास्तवातल्या किमतीपेक्षा बाजारातली किंमत 85 टक्क्यांनी जास्त आहे. अदानीच्या अनेक कंपन्यांनी खूप जास्त कर्ज घेतल्याने त्या देणी न देता येण्याच्या स्थितीमध्ये आहेत. यातून एखादी कंपनी जर बुडाली तर पत्याच्या बंगल्यासारख्या अनेक कंपन्या कोसळतील अशी स्थिती आहे. अदानी समूहाच्या एकूण कर्जापैकी 40 टक्के कर्ज हे भारतीय बँकांकडून घेतलेले आहे, यातील कर्जदारांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचा मोठा वाटा आहे. हिंडनबर्गने जाहीर केलेल्या अहवालानंतर लगेचच अदानीच्या संपत्तीमध्ये 50,000 कोटींची घट झाली, आणि हा लेख लिहिताना सुद्धा ती सतत चालूच होती व शेअर्सच्या किमती निम्म्याच्याही खाली गेल्या होत्या. एल.आय.सी ने सुद्धा अदानी समूहाच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. त्यामुळे अदानीच्या कंपन्यांसोबतच स्टेट बँक ऑफ इंडिया, एल.आय.सी. च्या शेअर किमतीत घसरण झाली आहे. महत्वाचे म्हणजे जे कर्ज घेतले गेले आहे ते अदानी समूहाच्या मालकांनी त्यांचे शेअर तारण ठेवून घेतले आहे. भारतीय बँकांकडून घेतल्या गेलेल्या कर्जाची एकूण किंमत 80,000 कोटी इतकी आहे. वर बघितल्याप्रमाणे शेअरची किंमत सध्या तिच्या वास्तव किमतीपेक्षा खूप जास्त आहे त्यामुळे एकूण वास्तव संपत्तीपेक्षा कर्जाची किंमत जास्त आहे. म्हणजे अदानी समूहाच्या शेअरचा फुगा फुटला तर स्टेट बँक, एल.आय.सी चे, म्हणजेच अंतिमतः कामगार कष्टकऱ्यांचे, सामान्य कामकरी मध्यम वर्गाचे मेहनतीचे पैसे बुडणार आहेत. यामुळे देशांतर्गत आर्थिक संकट तीव्र करून मंदीकडे अधिक वेगाने नेण्यातही हा घोटाळा भुमिका बजावणार आहे.

## अदानी समूहाच्या घोटाळ्यांची यादी

अनेक सरकारी तपास दाखवतात की अदानी समूहाचा सुरुवातीचा धन संचय जनतेचा पैसा चोरून, इकडचा पैसा तिकडे करून, आणि भ्रष्टाचार करून मिळवलेला आहे. अदानी उद्योग समूहावर एकूण 1.36 लाख कोटींच्या भ्रष्टाचाराचे, पैशांच्या हेराफेरीचे (मनी लौंड्रींग), जनतेचा पैसा चोरण्याचे सतत आरोप होत आले आहेत. यासोबतच सुरवातीच्या काळात हिरा, कोळसा, वीज निर्मिती, लोखंड यामध्ये इम्पोर्ट-एक्स्पोर्टच्या व्यापारात घोटाळे विविध सरकारी यंत्रणांनी तपासले आहेत. पण या सगळ्यांमध्ये तपासामध्ये दिरंगाई केली गेली आहे किंवा तो थांबवण्यात आला आहे. हिंडनबर्गच्या अहवालाने खालील घोटाळे पुराव्यानिशी सिद्ध केले आहेत.

## हिरा व्यापारातील घोटाळा

महसूल गुप्तचर संचालनालयाने 2004-06 मध्ये केलेल्या तपासात असे समोर आणले की अदानी समूह हिऱ्याच्या व्यापारात सर्क्युलर ट्रेडिंग (वर्तुळाकार व्यापार) करत आहे. म्हणजे अदानी समूहाच्या आणि इतर कंपन्यांनी मिळून हिऱ्याच्या किमती कृत्रिम पद्धतीने वाढवून, हिऱ्याच्या निर्यातीत वाढ दाखवून भारत सरकारच्या टार्गेट प्लस योजनेअंतर्गत —जिचे उद्दिष्ट होते निर्यातीला चालना देणे—6,800 कोटी रुपयाचे टॅक्स क्रेडिट्स मिळवले. टार्गेट प्लस योजनेचे मूळ उद्दिष्ट होते की एका मर्यादेवरच्या निर्यातीला करांमधून सूट देणे. याच योजनेचा फायदा अदानी समूहाने सुरवातीच्या काळात केला. सरकारी यंत्रणांच्या म्हणण्यानुसार हा घोटाळा पूर्णपणे नियोजित पद्धतीने, सरकारकडून पैसे लुबाडण्यासाठी होता. या घोटाळ्यामध्ये अदानी समूहाच्या आणि इतर कंपन्यांचा दुबई, हाँगकाँग मधल्या विदेशी कंपन्यांसोबत फक्त कागदावर व्यापार केला जायचा ज्याच्यामधून कृत्रिम पद्धतीने व्यापार वाढवला जायचा. या सगळ्या घोटाळ्यात गौतम अदानीचा मोठा भाऊ विनोद अदानी, लहान भाऊ राजेश अदानी, साला समीर वोरा यांचा हात होता. आज अदानी समूहाच्या प्रमुख स्थानी हेच लोक आहेत. या संपूर्ण घोटाळ्याचा तपास, साक्षी- पुरावे गोळा करणे यामध्ये 5.5 वर्षांचा कालखंड गेला. 2013 मध्ये अदानी एंटरप्राइस, राजेश अदानी, समीर वोरा यांना दंड सुद्धा करण्यात आला होता पण 2015 मध्ये ट्रायब्युनलने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. ट्रायब्युनलने सर्व पुराव्यांकडे दुर्लक्ष करून अदानी समूहाचा व्यापार खरा मानला. सरकारची एवढी मोठी फसवणूक झाली, पण जेव्हा सरकारच अदानीच्या पाठिंब्याने बनले असेल तर काय अपेक्षा ठेवता येईल!

## लोह खनिज घोटाळा

2011 मध्ये कर्नाटकचे लोकपाल संतोष हेगडे यांनी खाण व्यापारामध्ये कशा प्रकारे अवैधरित्या लोखंडाचे खनिज उचलले जाते, त्याची वाहतूक केली जाते आणि निर्यात केली जाते याचा 422 पानी अहवाल दिला. या अहवालामध्ये अवैध लोह खनिजाच्या निर्यातीमध्ये अदानी समूहाचा मोठा वाटा होता असे नमूद केले आहे. यात एकूण 60,000 कोटी रुपयांचा घोटाळा अदानी समूहाने केला. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा यामध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला तपासणीचे आदेश दिले होते. कर्नाटकाच्या बेलेकीरी बंदरावरून मुख्यत्वे करून हा व्यापार केला जात होता. लोकपालच्या या अहवालात सरकारी अधिकाऱ्यांपासून राज्याच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत (भाजपाचे येडीयुरप्पा) या भ्रष्टाचारात सहभाग असल्याचा उल्लेख होता. अदानी समूहाने पोर्ट विभाग, पोलिस, खाणी संबंधित लोक, स्थानिक राजकारणी या सर्वांना प्रत्येक जहाजामागे 5,000 ते 50,000 रुपयांची लाच दिली. लोकपाल संतोष हेगडे यांनी अदानी समूहाकडून बेलेकीरी बंदराची भाडेपट्टी (लीज) काढून घेण्याची तसेच भविष्यात कुठलीही भाडेपट्टी न देण्याची शिफारस केली.

पण या घोटाळ्याचे सुद्धा तेच झाले जे इतर घोटाळ्यांचे झाले. 2017 मध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सी.बी.आय.) ही केस बंद केली आणि या घोटाळ्यातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली. या घोटाळ्यातील सगळे आरोपी रेड्डी बंधू, येडियुरप्पा भाजपाच्या तिकिटावर पुन्हा निवडून पण आले. या घोटाळ्यात फक्त भाजपाचेच नाही तर काँग्रेस, जनता दल सर्वच पक्षांचे नेते सामील आहेत.

## विद्युत उपकरण घोटाळा

2014 मध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने केलेल्या तपासात अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड (APML) आणि अदानी पॉवर राजस्थान लिमिटेड (APRL) या कंपन्यानी विजेच्या निर्मितीमध्ये लागणाऱ्या उपकरणांची आयात किंमत वाढवल्याचे आरोप केले होते. या दोन कंपन्यांनी पैसे परदेशी वळवले आणि मनी लॉन्ड्रिंग केले याचे पुरावे विभागाने सादर केले. वीज उपकरणाच्या कृत्रिमरित्या वाढवलेल्या किमतीमुळे शेवटी जनतेलाच जास्त वीज बिल भरून भुर्दंड सहन करावा लागला. या घोटाळ्यात विजेची उपकरणे जरी

पान 10 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखला, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित